
मुंबई-म्हैसूर-मुन्नार-उटी-हंपी-मुंबई
साउथ राईड
150cc बाईक्सचा 3000+किमी प्रवास
लेखक - विशाल दळवी
SMK

- पुस्तकाचे नाव - साउथ राईड
- लेखन - संपादन - विशाल भिकाजी दळवी
- ई मेल - vshldalvi@gmail.com
- प्रकाशन - ई साहित्य प्रतिष्ठान
- छायाचित्रे - विशाल दळवी, महेंद्र बोंबले
- ई प्रकाशन - 24 मे 2020



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकातील किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकतो.**

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**



**संपर्क**

www.esahity.in

Vishal Dalvi Insta

esahity@gmail.com

Mahendra Bomble Insta



**©esahity Pratishthan® 2020**

# प्रस्तावना

दोन मित्र....दोन बाईक्स....10 दिवस...4 राज्ये आणि तब्बल 3,000 किमी पेक्षा जास्तची राईड ती सुद्धा 150 सीसी बाईक्सवरुन!

मुळात इतक्या मोठ्या राईडला कमी सीसीच्या गाड्या घेऊन जाणे म्हणजे नाही म्हटलं तरी भली मोठी रिस्कच असते. त्यात आम्ही तयार केलेला प्लान हा उष्ण आणि थंड अशा दोन्ही प्रकारच्या वातावरणातला.....खडकाळ, सपाट, डोंगराळ अशा सर्व प्रकारच्या भूभागावरुन घेऊन जाणारा होता. त्यामुळे आजवर फक्त महाराष्ट्रात फिरलेल्या आमच्या या बाईक्सना बाहेरच्या राज्यांचे रस्ते आणि वातावरण कितपत स्वीकारतील हे आजमावून पाहिल्या शिवाय कळणार नव्हतं.

शेवटी देवाचं नाव घेऊन निघालो आणि 10 दिवसांत भटक भटक भटकलो...भयंकर प्रमाणात गाडी चालवली. कित्येक गावं पाहिली. ठराविक किलोमीटरने बदलत जाणारं दक्षिण भारताचं रुप पाहिलं. त्यातून मिळालेला अनुभव, भन्नाट किस्से आणि प्रसंग यांनी नटलेला लाईफटाईम एक्सपीरीयन्स म्हणजे हे पुस्तक!

या राईडमागे जितक्या परिचित, अपरिचित व्यक्तींची साथ लाभली त्या सर्वांना आणि ज्यांच्याशिवाय ही साउथ राईड शक्यच नव्हती त्या आमच्या 150 CC बाईक्सना ही **शब्दरुपी सफर अर्पण!**

# मुहूर्तमेढ : नेपाळ रुसलं दक्षिण भारत हसलं!

“भाई माझं नेपाळला येणं कॅन्सल होतंय.” एखाद्या लहान मुला समोर कोणीतरी पिझ्झाचा तुकडा धरावा आणि मग म्हणावं की बाळा लहान मुलांनी हे असलं जास्त खायचं  नाही, तेव्हा त्या मुलाचं तोंड कसं होईल, अगदी त्याच अविर्भावाने ही गोष्ट मी महेंद्रच्या कानी घातली.


पूर्ण ऑक्टोंबर महिना आम्ही दोघांनी नेपाळचा प्लान बनवण्यात मेहनत घेतली होती. सगळी तयारी झाली होती. आवश्यक सदस्य संख्याही जमल्याने बजेट मध्ये सगळं होणार होतं, पण अचानक माझ्या घरातील एका लग्नकार्याचं ग्रहण लागलं आणि क्षणार्धात नेपाळ पालथी घालण्याची स्वप्न विरून गेली. माझ्या कॅन्सल होण्यासोबतच प्लान सुद्धा कॅन्सल झाला, पण आता इथे समस्या अशी झाली होती की महेंद्रने नेपाळच्या प्लानसाठी ऑफिस मधून जानेवारी १५ ते फेब्रुवारी २ अशी वाढीव सुट्टी टाकली होती आणि पूर्णच्या पूर्ण सुट्टी मंजूरही झाली होती. आता तुम्हाला समोर सोन्याचा खजिना दिसतोय पण मित्र म्हणतोय. “रस्ता कठीण दिसतोय, जाऊ दे नंतर प्रयत्न करू”' म्हणून तुम्ही थोडी न तुमच्या वाट्याचा सोन्याचा खजिना सोडणार??? अशीच काहीशी गत महेंद्रची झाली.

कसंही करून ही सुट्टी वापरायचीच असं त्याने ठरवलं होतं. शेवटी कोणत्याही प्रायव्हेट कंपनीच्या कर्मचाऱ्यासाठी मंजूर झालेली एवढी लांबलचक सुट्टी म्हणजे सोन्याच्या खजिन्यापेक्षा कमी नसते. अखेर हा सोन्याच्या खजिना या मार्गाने वापरता येत नाही ना तर मग त्या मार्गाने वापरायचा असा चंग बांधून त्याने ठरलेल्या कालावधीत कमी दिवसासाठी हंपीला जाऊन येऊ असा प्लान माझ्यापुढे ठेवला.

मी फ्रीलान्सर जमातीतला माणूस, त्यामुळे माझ्या सुट्टीचा प्रश्न नव्हताच. अट फक्त एकच की घरातील लग्नकार्य आहे त्याच्या एक दिवस आधी मुंबईत दाखल होणे. हंपीला कधीही जाऊ तेव्हा बाईकनेच जाऊ हे आमचं आधीच ठरलं असल्याने, प्रवासाची रुपरेखा आखणं सोपं जाणार होतं. ट्रेन तिकिट्स, बस तिकिट्सची काही झंझट नव्हती. पुढल्या दिवसाचं हॉटेल आदल्या दिवशी बुक करत जाऊ असं ठरवलं आणि दक्षिण भारताच्या राईडची मुहूर्तमेढ रोवली गेली. तर मंडळी अश्याप्रकारे आमच्या मनातील नेपाळ रुसलं पण दक्षिण भारत मात्र हसलं...!

# पूर्वतयारी : 150cc चा धुरळा उडणार की नाही?

२-३ दिवस गेले नसतील की महेंद्रने या हंपीच्या प्लानमध्ये अजून काही ठिकाणं जोडण्यास सुरुवात केली. पहिलं ठरलं फक्त हंपी नाही तर सगळं कर्नाटक फिरायचं. मग त्यात हंपी, वायनाड, बँगलोर, बदामी, गोकर्ण, उडुपी, मंगलोर हे सगळं आलं. पण मग प्लान भलताच वाढत होता आणि ठरलेल्या दिवसांत बसत नव्हता. इतक्यात महेंद्रच्या डोक्यात काय आलं माहित नाही आणि त्याने थेट मुंबई – मुन्नार – मुंबई असा प्लान समोर ठेवला आणि गंमत बघा ज्या हंपीने या राईडची मुहूर्तमेढ रोवली होती तेच ठिकाण वेळ मिळालं तर पाहू असं म्हणून या प्लान मध्ये आम्ही बिचाऱ्या हंपीलाच ऑप्शनला टाकलं. पण गोची अशी झाली की आम्ही दोघे शहाणे सगळीकडे दवंडी पिटवून झालो होतो कि, “आम्ही हंपी राईडला चाललो, हंपी राईडला चाललो” आणि ते हंपीच नाही म्हणजे सगळीकडे छी थू होणार होती. शेवटी आम्ही दोघांनी आपापल्या बौद्धिक कुवतीप्रमाणे आजवरच्या सर्व ट्रिप्सच्या नियोजन कौशल्याचा जोर लावून १६ जानेवारी ते २५ जानेवारी या १० दिवसांच्या काळात मुंबई-म्हैसूर-मुन्नार-उटी-कोइम्बतुर-हम्पी-मुंबई असा मस्त प्लान बसवला आणि स्वत:चीच पाट थोपटली.




प्लान तर सगळा तयार होता. एकूण अंतर ३००० किलोमीटर पेक्षा जास्तचं भरणार होतं. एवढं मोठं अंतर म्हणजे या पोरांकडे बाईक्स पण तगड्या असणार असं तुम्हाला वाटत असेल, एखादी बुलेट, हिमालयान, काहीच नाही तर ड्युक तरी! मंडळी चुकताय तुम्ही...! माझ्याकडे होती होंडा युनिकोर्न 150 आणि महेंद्रकडे सुझुकी जिक्सर 150!

हो खरंय, आम्ही 150CC च्या बाईक्स वरून ही महाराईड करायचा विचार करत होतो. बऱ्याचदा आमच्याही मनात विचार आला की खरंच एवढं करायची गरज आहे? पण पहिल्यापासून हट्टी वृत्ती! ठरलं म्हणजे ठरलं...काहीही करून जायचं! आजवर आम्ही अनेकदा असे बेभरवश्याचे ट्रेक्स, ट्रिप्स केल्या होत्या. पण हे काहीतरी भलतंच धाडस होतं. मात्र इथे आमचा बाईक्स पेक्षा स्वत:वर जास्त विश्वास होता हे महत्त्वाचं.

आम्ही जे काही संकट येईल त्याला तोंड देण्यास पूर्णपणे तयार होतो. त्यामुळे काय होईल? काय घडेल? या प्रश्नांची भीती मनातून आपसूकच निघाली. निघण्याच्या २ दिवसांपूर्वी गाड्यांवर सर्विसिंगचे सगळे सोपस्कार पार पाडले. नवीन लाईट्स, मोबाईल होल्डर, विंडशिल्ड वगैरे लावून माझ्या युनिकोर्नला मी जरा सजवलंच. सोबतीला एक्स्ट्रा कल्च केबल, इंजिन ऑईल, चेन ल्युब्रिकंट ही आणि अशी बरीच राईडसाठी महत्त्वाची असणारी साधने घेतली. सुरक्षेसाठी हेल्मेट, जॅकेट्स आणि अन्य गोष्टी होत्याच. महेंद्रने सुद्धा त्याच्या जिक्सरवर असेच संस्कार केले आणि अशाप्रकारे आजवर फक्त महाराष्ट्रात घौडदौड केलेल्या आमच्या बाईक्स तयार झाल्या होत्या दक्षिणेत धडकायला!

**पहिला टप्पा – मुंबई ते म्हैसूर (दिनांक 16-17 जानेवारी)**

## रेकॉर्ड ब्रेक वेळेत कोल्हापूरात दाखल!



१६ तारखेला रात्री १० वाजता मुंबई सोडायची असं ठरवलं. आम्ही दोघेही घाटकोपरचे त्यामुळे वेळेतच निघालो. १७ ला रात्री पर्यंत म्हैसूरला पोहोचायचे हे आमचे लक्ष्य! आमचं हे लक्ष्य जरा अतिचं होतं, कारण या आमच्या बाईक्स एका दिवसात एवढं अंतर खेचतील का? हा मोठा प्रश्न होता आणि दुसरं म्हणजे आम्हाला सतत बाईक चालवावी लागणार होती, शक्य तितके कमी ब्रेक घेऊन!

अखेर असा निर्णय झाला की उद्या दुपारपर्यंत शरीरात किती एनर्जी बाकी आहे त्यावरून म्हैसूर गाठायचं की नाही ते बघू, नाहीच जमलं तर हुबळीला स्टे करू. पण असं घडलं असतं तर पुढचा प्लान बिघडणार होता आणि आम्हाला प्लान २ चा अवलंब करावा लागणार होता. मात्र आम्ही ती तडजोड करायला देखील तयार होतो. शेवटी जीवाची काळजी पहिली.

मोबाईलमध्ये गुगल मॅप चालू केला. मोबाईल स्टँडला लावला. जॅकेट चढवलं. इयर फोन सेट केले. तोंडाला मास्क बांधला. ग्लव्ह्ज घातले आणि शेवटी हेल्मेट चढवून काच बंद केली. पुढील १० दिवस आम्हाला बाईकवर बसण्यापूर्वी याच क्रमाचे न चुकता पालन करायचे होते.

१० वाजता आम्ही घाटकोपर सोडलं आणि मानखुर्द-शिवाजी नगर मार्गे सवयीप्रमाणे मुंबईच्या ट्रॅफिक मधून वाट काढत NH 48 अर्थात मुंबई-पुणे/बॅंगलोर महामार्गावर आलो. पुण्याच्या दिशेने कुठेही राईडला, ट्रेकला जायचे असो आम्हा लोकांचा हा पहिला टप्पा. जर सोबतीला मुंबई भरातून कोणी येणार असेल तर सर्वांनी इथे जमायचं हा नियम. म्हैसूर गाठण्यासाठी पुढील किमान १२-१५ तास आम्हाला अगदी सरळ याच NH48 वरूनच सुसाट जायचं होतं. या महामार्गाची आणि आमची फारकत होणार होती कर्नाटकातील दावणगेरे येथे, तेथून हा रस्ता सरळ जाणार होता बॅंगलोरला आणि आम्हाला घ्यायचा होता लेफ्ट म्हैसूरसाठी! पण तिथपर्यंत पोहोचायला उद्याची दुपार वा संध्याकाळ उजाडणार होती.




तर एव्हाना आम्ही मुंबई पुणे महामार्गावर येऊन पहिला ब्रेक घेत होतो. आम्ही आजच्या सोशल मिडीयाच्या युगातील पोरं, त्यामुळे स्टोरीज अपडेट करणं तर आलंच. स्टोरी अपडेट केल्यापासून दुसऱ्या तिसऱ्या सेकंदालाच सुरक्षित प्रवासाच्या शुभेच्छा येण्यास सुरुवात झाली. अनेकांना हे स्टेट्स अपडेट करणं शो ऑफ वाटू शकतं, पण आपण एखाद्या प्रवासाला चाललो आहोत हे अभिमानाने जगाला सांगण्यात चूक ते काय? याची दुसरी बाजू अशी की अशा मोठ्या प्रवासात तुमच्याबद्दलची माहिती तुमच्या जवळच्या लोकांना कळत राहते. देव न करो पण काही झालं तर तुमचं लास्ट लोकेशन तरी माहित पडतं. त्यामुळे खास करून राईड करणाऱ्यांनी आपलं लाइव्ह लोकेशन व्हॉट्सअपला कोणासोबत तरी शेअर करून ठेवावं आणि सतत वेळ मिळेल तसे स्टोरीजच्या माध्यमातून आपले अपडेट देत राहावे.

महामार्गावर मुंबई बाहेर पडणाऱ्या ट्रक्स, कंटेनर, व्होल्वो गाड्यांची नुसती वर्दळ सुरु होती आणि थांबलेल्या गाड्यातून डोकावणाऱ्या नजरा आमच्यावर आणि भलंमोठं सामान बांधलेल्या आमच्या बाईक्सवर स्थिरावत होत्या. काही जण तर चौकशी पण करायला आहे. कुठे जाताय? किती दिवसासाठी जाताय? म्हटलं, असेच सगळ्यांच्या प्रश्नांना उत्तर देत बसलो तर इथूनच घरी जावं लागेल. म्हणून कश्याबश्या त्या अनोळखी लोकांच्या शुभेच्छा, काळजीवाहू सूचना स्वीकारत पुण्याच्या दिशेन प्रस्थान केलं.

रात्रीची वेळ असल्याने आजूबाजूला मनाला भूलवतील अशी काही दृश्य नजरेस पडणार नव्हती. दहा वाजून गेल्याने रस्ता पूर्ण खाली होता. महेंद्र आणि मी सतत फोनवरून एकमेकांच्या टच मध्ये होतो. ब्ल्यूटूथ डिव्हाईस खरेदी करायचा आमचा विचार होता. पण नंतर वाढतं बजेट पाहून तो विचार बाजूला पडला आणि इयर फोन्सच्या माध्यमातून एकमेकांशी कनेक्ट राहायचं हे जुगाड वापरलं. कधी तो लीड करायचा तर कधी मी आणि अश्याप्रकारे जुन्या मुंबई पुणे हायवेवरून खंडाळा घाटात प्रवेश केला. मुंबईसोबत एव्हाना मुंबईची सुमार दर्जाची थंडी मागे पडली आणि सुरु झाली घाटावरची बोचरी थंडी. थ्रोटलवर अगदी घट्ट पकड असणारे हात आता थरथरू लागले, दात वाजू लागले. अख्ख्या शरीराचा थंडी पासून बचाव करायचा म्हणून आम्ही पुरेपूर काळजी घेतली होती, पण ती हवा ओ, तिला कोण अडवणार? कुठून ना कुठून आत घुसून त्रास देत होती.

खंडाळा पार करून लोणावळ्यात प्रवेश केला. महेंद्र एव्हाना पुढे गेला होता. अख्खं शहर गाढ झोपेत होतं. लोणावळ्यात थांबायचं असं ठरवलेलं, पण लोणावळा शहर मागे पडलं तरी महेंद्र कुठे दिसत नव्हता. रस्त्याला काळाकुट्ट अंधार होता. एकही चहाची टपरी सुरु नव्हती. तेव्हा लक्षात आलं की काही सुरु नाही म्हणून हा थांबला नाही. जर तुम्ही खूप साऱ्या राईड सोबत केल्या की असा फायदा होतो. तुम्हाला एकमेकांच्या सवयी कळतात.




कानात कोणतं तरी गाणं किरकीर करत असताना अचानक महेंद्रचा फोन वाजला आणि म्हणाला देहू जवळ हायवेला एक चहाची टपरी आहे तिथे थांबलोय. या फोनने मी त्याच्या सवयीबद्दल लावलेला माझा अंदाज खरा ठरवला आणि मध्यरात्री बरोबर १२ वाजता आम्ही देहू अर्थात पुण्याच्या वेशीवरच म्हणा न, येऊन पोहोचलो होतो. म्हणजे दोन तासात अंदाजे १३२ किलोमीटर, नॉट बॅड..!

पुन्हा इथे अंगावरचा सगळा संसार उतरवून मस्त चहा बिस्कीट खाल्लं. गेले दीड तास आखडलेल अंग जरा मोकळं केलं. पुढच्या गोष्टी ठरवल्या आणि हे ठरवता ठरवता महेंद्रला म्हणालो, “आता थेट कोल्हापूर गाठू.”

तो सुद्धा हो म्हणाला खरा, पण त्याच्या मनात शंका होती. शंका एकच की एवढा ताण आपल्या बाईक्सना सहन होईल का? कारण देहू ते कोल्हापूर जवळपास २६० किलोमीटरचं अंतर होतं. अंदाजे ४ ते ५ तास. पण हा हायवे किती जबरदस्त आहे हे वेगळ्याने सांगायला नको.

राईड करताना असे चौपदरी, मोठे आणि सुसाट हायवे मिळाले की त्यावरून जास्तीत जास्त अंतर कमी वेळात गाठायची संधी सोडू नये. कारण इथेच तुम्ही तुमचा वाया गेलेला वेळ भरून काढू शकता. आमच्यासमोर तर सुवर्णसंधी होती, कारण आज विकेंड नव्हता तसेच १२ देखील वाजून गेले होते, त्यामुळे हायवेला फार कमी वाहने असणार होती. अखेर हे महाधनुष्य पेलून पाहायचं ठरवलं, कमीत कमी कंटाळा करून शक्य तितक्या लवकर कोल्हापूर गाठू या निर्धाराने पुन्हा एकदा बाईकचा ताबा घेतला आणि अगदी अविश्वसनियपणे सतत ४ तास बाईकवरचा थ्रोटल कमी न करता, पुणे, वाई, सातारा, कऱ्हाड मागे टाकत ४:३० वाजता कोल्हापूरमध्ये दाखल झालो. जेव्हा पोहोचलो तेव्हा आमचा स्वत:चाच विश्वास बसत नव्हता की आपण एवढं मोठं अंतर न कंटाळता या कमी सीसीच्या गाड्यांवर रेकॉर्ड ब्रेक वेळेत पूर्ण केलं. नाहीतर एरव्ही १५० किलोमीटरला ही थांबत थांबत जाऊन ४ तास लावणारी पोरं आम्ही, पण हे लक्ष्य वेगळं होतं....हि राईड वेगळी होती.!



कोल्हापूरला आलोच आहोत तर नाश्ता करूनच घेऊ म्हणजे परत थांबायला नको असा विचार केला आणि हायवेला रेस्टॉरंट शोधू लागलो. पण कसलं काय? आम्ही जरी लवकरात लवकर कोल्हापूर गाठलं असलं तरी कोल्हापूरकर मात्र कुडकुडणाऱ्या थंडीत छान साखरझोपेचा आस्वाद घेत होते. अखेर आमचं नशीब चांगलं म्हणून म्हणा, हायवे लगतच एका ऑमट पाव वाल्याने नुकतीच आपल्या दिवसाची सुरुवात केली होती. बाजूला पेटत असणाऱ्या शेकोटीची उब अंगात साठवत त्याच्याकडे मस्त २-४ ऑम्लेट हादडले. कोल्हापूरच्या चहाची चव घेतली आणि ती जिभेवर रेंगाळणारी चव चाखत चाखत बेळगावच्या दिशेने घौडदौड सुरु ठेवली.

**पहिला टप्पा – मुंबई ते म्हैसूर (दिवस दुसरा)**

## म्हैसूरला पोहोचणार की मध्येच गळपटणार?



आम्ही गेल्या ६ तासात ३५० पेक्षा जास्त किलोमीटर पूर्ण केले होते. म्हणजे पहिल्या दिवसाच्या ध्येयाच्या ३०% प्रवास! कोल्हापूरहून पुढचा टप्पा बेळगाव जवळपास १२० किलोमीटरचा होता. जसजसे कोल्हापूर सीमेजवळ येऊ लागलो तसतसे कानडी भाषेतील फलकही मध्येमध्ये दिसू लागले आणि आपला लाडका महाराष्ट्र आता मागे पडणार याची जाणीव झाली. ती जाणीव मनात घर करत असतंच त्या सरळसोट हायवेवर कधी महाराष्ट्र सोडून कर्नाटकात प्रवेश केला कळलंच नाही. हळूहळू तांबडं फुटू लागलं होतं. थंडी अजून काहीशी वाढली. रस्ता अधिक चांगला, नीटनेटका खड्डेविरहित झाला होता. आयुष्यात पहिल्यांदा बाईक वरून दुसऱ्या राज्यात येण्याची ही फिलिंग काहीतरी वेगळीच होती. आतापर्यंत रस्त्यावर अगदी सरळ राहणारी नजर नुकत्याच जाग्या झालेल्या आणि सूर्यनारायणाच्या प्रकाशात न्हाऊन निघालेल्या कर्नाटकी सौंदर्याला डोळ्यात सामावण्यासाठी चौफेर फिरत होती. इतक्यात हिडकळ जलाशयाजवळ सुर्योदयाचं लोभस दृश्य दिसलं आणि इथे फोटो काढण्यासाठी थांबण्याचा मोह आवरला नाही.



सकाळी ७ वाजता आम्ही बेळगावात प्रवेश केला. आलोच आहोत तर बेळगाव किल्ला पाहून घेऊ असं म्हणून बाईक्स शहराच्या दिशेने वळवल्या. शहरात फिरता फिरता नजरेसमोर येऊ लागला तेथील मराठी बांधवांचा कित्येक वर्षांपासून सुरु असलेला संघर्ष. बेळगाव फिरताना एक गोष्ट मनापासून वाटली की हा हिरा महाराष्ट्राच्या शिरपेचात असायला हवा!



आम्ही बेळगाव किल्ल्यापर्यंत पोहोचलो खरे पण त्याचं दर्शन घेणं आमच्या नशिबात नव्हतं. किल्ल्यात प्रवेशाची वेळ सुरु होण्यास अजून एक दीड तासांचा अवधी होता आणि आमच्याकडे तेवढा वेळ नव्हता.



शेवटी नाईलाजाने गाडयांनी पुन्हा NH48 धरला आणि लवकरात लवकर म्हैसूर गाठण्यासाठी आम्ही सज्ज झालो. कर्नाटकात प्रवेश केल्यावर एका गोष्टीतील फरक प्रकर्षाने जाणवतो. तो फरक म्हणजे रस्त्यांची गुणवत्ता! अगदी एकही खड्डा नाही, ना जास्त स्पीड ब्रेकर्स!

त्यामुळे सतत ८०-९० चा स्पीड कायम ठेवणं शक्य झालं होतं. हळूहळू सोबतीला असणारी गाड्यांची गर्दीही कमी झाली होती. असं वाटत होतं जणू हा पूर्ण रस्ता आपल्यासाठीच खुला करून ठेवला आहे की काय.

आपल्या महाराष्ट्रात फार कमी असे हायवे आहेत जिथे तुम्ही अशा स्पीडने सतत गाडी चालवू शकता आणि म्हणूनच आम्हा पोरांसाठी तर ही वेगळी पर्वणी ठरली. आम्हीही अगदी पुरेपूर त्याचा लाभ घेतला. पण अशा या मेगाहायवे वर एक उणीव जाणवते ती म्हणजे उजाड आणि निरस प्रदेश.



आसपास पाहण्यासारखं काहीच नाही. त्यामुळे कालांतराने अशी सुसाट गाडी चालवण्याची मज्जा कमी होऊ लागली. सकाळ सरून दुपारचा प्रहरही सुरु झाला होता. हुबळी देखील मागे पडलं होतं. तासाला आम्ही किमान ९०-१००

किलोमीटर पार करत होतो. पण आता शरीरानेही ‘भावांनो थांबा जरा” ही साद घालायला सुरुवात केली होती.

शरीर थकू लागलं होतं. बाईक चालवून चालवून १२ तास उलटून गेले होते. सरळसोट रस्त्याचा अक्षरशः वैताग आला होता. १०० ची स्पीड देखील कमी वाटू लागली. महेंद्र माझ्या मागेच होता. आम्ही खाणाखुणा करून थांबायचं असं ठरवलं. पण हायवेला एक हॉटेल दिसेल तर शपथ. खोटं वाटत असेल तर कधी या मार्गाने जा...! अहो कित्येक किलोमीटर एक हॉटेल नाहीये. थांबायला एक जागा नाही. एक साधं पेट्रोल पंपही नाही. एव्हाना मनावर पडलेली कर्नाटकची चांगली छबी आता मात्र पुसट होत चालली होती. अखेर बंकापूर या ठिकाणा जवळ हायवे लगतच एक छोटी झोपडी दिसली. कोणाची आहे, काय आहे, कोणी ओरडेल असा कसलाही विचार न करता सरळ आत जाऊन बस्तान मांडायचं ठरवलं थेट एका तासासाठी!

भूक मजबूत लागली होती. स्नॅक्स होतेच, पण पेटपूजेची सुरुवात केली महेंद्रच्या आईने घरून तयार करून दिलेल्या थेपल्यांपासून. महेंद्रने ते थेपले बाहेर काढताच त्यावर दोघेही तुटून पडलो. चांगलं पोटभर खाल्ल्यावर आता कुठे तरतरी आली. आम्ही मुंबईतून निघताना ठरवलं होतं की हुबळी पर्यंत पाहू अंगात किती ताकद आहे, त्यानुसार म्हैसूरकडे आज रवाना व्हायचं की नाही ते बघू आणि आमचा अंदाज होता की हुबळी पर्यंत पोहोचायला संध्याकाळ होईल, पण जास्त ब्रेक्स न घेतल्याने आम्ही किमान २-३ तास आधीच हुबळी मागे टाकून पुढे आलो होतो.




महेंद्र पुढे जाण्यासाठी तयार होता. मी पण तयार होतो. तरी मध्येच काही वाटलं तर जमेल तिथे थांबू असं ठरवून पुन्हा एकदा मुंबईपासून आमच्या सोबत धावत आम्हाला मार्ग दाखवणारा आमचा सारथी NH48 पकडला. उरलेला ४०० किलोमीटरचा टप्पा रात्र व्हायच्या आत आरामात गाठू असं आम्हाला आमच्या एकंदर स्पीड वरून वाटत होतं. पण मंडळी हे फक्त वाटलं आणि घडलं काहीतरी वेगळंच.

गेल्या १५ तासांपासून शरीराला झोप नाही, वर तळपतं उन आणि बाजूला निर्मनुष्य भकास परिसर! सगळी एनर्जी डाऊन झाली होती.  ताशी शंभरच्या वेगाने पाळणारे आम्ही आता ताशी ७०-८० वर आलो कारण आतापर्यंत मनात भरलेला तो NH48 अचानक खड्ड्यांनी भरला. पूर्ण हायवेवर काम सुरु होतं, दर ५ मिनिटांनी डायव्हर्जन होते. एव्हाना कानात वाजणाऱ्या गाण्यांचाही वीट आला होता.

ह्या स्टेजमधून प्रत्येक राईडर जावच लागतं, जर तो लांबचा पल्ला गाठत असेल तर....अशावेळी मन शांत ठेवणं, सतत चांगल्या गोष्टींचा विचार करणं, शरीर थकलं असले तरी त्यात कसाबसा जीव ओतणं, तब्बल ३०० किलोमीटर बाकी असतानाही "अरे हे काय आलंच...३ तासात पार करू" असं सांगणं गरजेचं असतं. जर तुमच्याने हे होत नसेल तर तुम्ही गप्प जिथे हॉटेल मिळेल तिथे थांबलेलंच बरं. आमच्यात मात्र अजूनही खूप ताकद बाकी होती. तरी सुरक्षितता म्हणून आम्ही दर १०० किलोमीटरला थांबून ब्रेक घेत होतो. चॉकलेट्स आणि कॅडबरीज खात होतो. अशा वेळी शरीरातील शुगर लेव्हल संतुलित ठेवणे गरजेचे असते. म्हणून कधीही छोट्या मोठ्या कोणत्याही राईडला गेलात तरी सोबत खूप सारी चॉकलेट्स, कॅडबरीज किंवा इलेक्ट्रोल बाळगावे. थकलेल्या शरीराला यातून बरीच उर्जा मिळते.




तर अखेर दरमजल करत आम्ही येऊन पोहोचलो दावणगेरे येथे. संध्याकाळचे ४ वाजले होते. इथून आम्हाला काल पासून सोबत करणारा NH48 आपला मार्ग बदलणार होता.

पुढे आमचा साथी होता कर्नाटक SH (स्टेट हायवे/राज्य महामार्ग) 76! आता NH48 ची पुन्हा गाठ पडणार होती मुंबईला परततेवेळी! तेव्हा भेटू असा निरोप घेऊन आम्ही खऱ्या अर्थाने प्रवेश केला कर्नाटकात, कारण आतापर्यंत आम्ही नॅशनल हायवेने प्रवास केला जो पूर्णपणे ओसाड प्रदेशातूनच आला. आता स्टेट हायवे सुरु झाल्याने तो ग्रामीण कर्नाटकातून आम्हाला घेऊन जाणार होता आपलं वेगळं रूप दाखवत!



आणि तसचं झाल. SH76 सूरु होताच नजरेस पडू लागली कर्नाटकातील गावं, तेथील बदललेली माणसं, त्यांची भाषा, गावांची चित्रविचित्र नावं आणि एव्हाना रेंगाळलेला आमचा प्रवास पुन्हा रोमांचकारी झाला. हळूहळू रस्त्याच्या बाजूची हिरवाई वाढत गेली. रस्ते नागमोडे होत गेले. त्यामुळे सरळ सरळ चालणाऱ्या बाईक्स देखील कॉर्नर घेत धावू लागल्या. मध्येच एखादी नदी पुलाखालून निघून जायची. तर कधी ती बाजूने आमच्या सोबत धावायची. रस्त्यालगत असलेल्या नारळीच्या, सुपारीच्या बागा पाहून काही

ठिकाणी तर कोकणाचाही फील आला. कालपासून ऐकून ऐकून डोक्यात जाणारी गाणी आता आसपासचं सौंदर्य खुलल्या बरोबर मनाचा ठाव घेऊ लागली. एकंदर आता खऱ्या अर्थाने साउथ राईडला सुरुवात झाली होती.

दावणगेरे सोडल्यापासून एव्हाना फक्त ११० किलोमीटर झाले होते आणि आम्ही येऊन पोहोचलो बिरूर मध्ये! या ठिकाणाचं नाव बऱ्यापैकी ऐकलं होतं. इथेच एक ब्रेक घेण्याचं ठरलं. NH48 ला जवळपास दीड तासाच्या आत आम्ही १०० किलोमीटर पूर्ण करायचो आणि स्टेट हायवेवर ११० किलोमीटरसाठी आम्हाला लागले जवळपास ३ तास.

आतमधल्या रस्त्यांमध्ये स्पीड कायम ठेवण्याची थोडी समस्या होतेच, पण इथेच खऱ्या अर्थाने आपण जे पाहायला आलोय ते रूप पाहायला मिळतं. इथून म्हैसूर राहिलं होतं अजून १८३ किलोमीटर म्हणजे किमान ५ तास. एव्हाना ३ वाजून गेले होते. म्हणजे नाही म्हटलं तरी रात्रीचे ८ वाजणार होते. रात्र व्हायच्या आत म्हैसूरला पोहचू, मस्त हॉटेलात जाऊन सामान ठेवून रात्रीचा शहरात एक फेरफटका मारू. या आणि अशा अनेक मनसुब्यांवर पाणी फेरलं होतं. आता आम्ही एवढ्या जवळ येऊन मध्येच स्टे करू शकत नव्हतो, काहीही करून लवकरच म्हैसूरला पोहचायचे हे एकमेव लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून चाकं पळू लागली.



मात्र हे काम नक्कीच सोप्पं नव्हतं. आमचा हा जोश पुढच्या तासाभरातच निवळला कारण संध्याकाळ असल्याने रस्त्यांवर गर्दी वाढली होती, सारखं एखादं छोटं मोठं गावं यायचं आणि तिथे बाजार भरलेला असायचा. मग त्यातून कशीबशी हॉर्न देत वाट काढावी लागायची. आपण एकतर दुसऱ्यांच्या प्रदेशात आहोत त्यामुळे गर्दीतून वाट काढताना विशेष काळजी घ्यावी लागत होती. उगाच कोणाला थोडासा जरी धक्का लागला तरी त्याचं भांडवल करणारी माणसं कुठेही असू शकतात.

किलोमीटर हळूहळू कमी होत होते आणि वेळ मात्र वाऱ्याच्या वेगाने पळत होती. सूर्य लयाला जाऊ लागला. अंधाराचं राज्य सुरु झालं आणि आम्ही अजून होतो ८० किलोमीटर दूर. ६ वाजायला आले असल्याने ७ वाजता पोहोचण्याची आशा मावळली होती. त्यात दुष्काळात तेरावा महिना म्हणून की काय सुरु झाला अर्सेकेरे-म्हैसूर रोड! अक्षरशः मंगळावर गाडी चालवतो आहे की काय असं वाटत होतं. एक एक खड्डा ३-४ फुटांचा. इतका खराब रस्ता आहे म्हणजे वाहन सावकाश जातील अशी अपेक्षा, पण कसलं काय? बसवाले, ट्रकवाले, अक्षरशः समोरून

कोण येतय की नाही हे न पाहताच ओव्हरटेक करत होते. एखादा रेसिंग गेम सुरु असावा अशी ती परिस्थिती होती आणि त्यात आम्ही दोन मुंबईचे पामर कसेबसे आपलं कौशल्य पणाला लावून शक्य तितक्या वेगाने वाट काढत होतो. सुदैवाने काहीही संकट न येता सुखरूपपणे आम्ही श्रीरंगपटनाला पोहोचलो. येथून म्हैसूर अवघं ३५ किलोमीटर वर आमची वाट पाहत होतं. अंगात अजिबात ताकद नव्हती, खूप झोप येत होती, भूक लागली होती. आम्ही शक्य तितकं शांत राहण्याचा प्रयत्न करत होतो. कुठे ते काल निघालो तेव्हा १००० किलोमीटर होते आणि कुठे हे ३५ किलोमीटरवर येऊन पोहोचलो. ही फिलिंग अधिक दिलासादायक आणि अभिमानास्पद होती.

एव्हाना अजून एक महत्त्वाचं काम बाकी होतं, ते म्हणजे आम्ही अजूनही हॉटेल बुक केलं नव्हतं. म्हणून थोडा वेळ थांबून पटकन जे मिळेल ते स्वस्तातलं हॉटेल बुक केलं, कारण आम्हाला फक्त एक रात्र झोपण्यासाठी जागा हवी होती. हॉटेल म्हैसूर शहराबाहेर असल्याने अंतर अजून १० किलोमीटरने वाढलं. म्हैसूरला पोहोचलो तेव्हा रात्रीचे ८ वाजले होते आणि हॉटेलात पोचलो कितीला तर ९:३० ला! दीड तास हॉटेल शोधत फिरत होतो. सापडतच नव्हतं, कारण एक म्हणजे रात्रीची वेळ! कुठल्या रस्त्याने आलो गेलो काही कळत नव्हतं. गुगल मॅपने पुरता विश्वास घात केला होता. सगळीच दुकानं एव्हाना बंद झाली होती. कोणाकडे चौकशी करावी तर रस्ते पूर्णपणे निर्मनुष्य होते. शेवटी एका नाक्याजवळ एक माणूस भेटला. पण इथे निर्माण झाली भाषेची समस्या. पहिलं हिंदीत विचारून पाहिलं, तो आपला कन्नड मध्ये बोलत होता. मग इंग्रजीत विचारलं तरी तो कन्नड मध्ये बोलत होता. काय करावं काही कळत नव्हतं. इतक्यात त्याने स्वतःच हाताने इशारा करून मला थांबायला सांगितलं आणि अजून एका तरुणाला घेऊन आला ज्याला इंग्रजी कळत होतं. तेव्हा कुठे सुटकेचा निःश्वास सोडला. त्या भल्या माणसाने योग्य रस्ता दाखवला आणि ९:३० च्या आसपास हॉटेलात येऊन स्थिरस्थावर झालो.

दाक्षिणात्यांच्या कडवट भाषाप्रेमाचा मला पहिल्याच दिवशी चांगलाच अनुभव आला. येणारे दिवस भाषेमुळे अजून काय काय अनुभव दाखवणार हा विचार करून धडकीच भरली. या सगळ्या गोंधळात आमच्या इच्छेप्रमाणे म्हैसूर शहराचा चांगलाच फेरफटका झाला व नजरेला पडलं जगविख्यात म्हैसूर पॅलेस! एवढ्या जवळ आहेच तर पहिलं हे पाहायचं आणि मग मुन्नारकडे निघायचं असं ठरवलं. एवढ्या रात्री सगळी हॉटेल बंद झाल्याने जेवणाची पंचायत झाली होती. सुदैवाने हॉटेल खालीच एका राईस वाल्याचं दुकान सुरु होतं, त्याच्याकडून कर्नाटकातील स्पेशल लेमन राईस हादडून जे बेडवर आडवे झालो ते थेट सकाळी ९ वाजता उठलो.

## दुसरा टप्पा – म्हैसूर ते मुन्नार (दिनांक 18 जानेवारी)

# अतिआत्मविश्वास नडला!

सकाळी ७ वाजता उठून मुन्नारच्या दिशेने निघू या आमच्या अजून एका प्लानवर आमची झोप आणि दमलेलं शरीर भारी ठरलं. ९ वाजता दोघांना जाग आली आणि उठल्यानंतरचे सगळे सोपस्कार पार पाडून आम्ही निघालो म्हैसूर पॅलेसच्या दिशेने!



काल रात्री पाहिलेलं म्हैसूर आणि आता सकाळी दिसणारं म्हैसूर खूप वेगळं वाटत होतं. काल अगदी निर्मनुष्य वाटणारे रस्ते माणसांनी अगदी गजबजून गेले होते. म्हैसूरला सिटी ऑफ पॅलेस सुद्धा म्हटले जाते. या शहरात तब्बल सात राजवाडे आहेत. यापैकी म्हैसूर पॅलेस हा सर्वात महत्त्वाचा! वडियार राजघराण्याच्या रहिवासाची ही ऐतिहासिक वास्तू.

म्हैसूर पॅलेसला जुना महल व ओल्ड फोर्ट असेही नाव आहे. ताजमहाल नंतरचं भारतातील सर्वात मोठं पर्यटन आकर्षण म्हणून म्हैसूर पॅलेस ओळखला जातो. हा राजवाडा अनेकदा उध्वस्त केला, नव्याने बांधला गेला. त्यामुळे याच्या स्थापत्यशास्त्रात द्रविडी, आशियाई कलेचा अद्भुत संगम दिसून येतो. राजवाड्याच्या सभोवताली भला मोठा देखणा बगीचा आहे. राजवाड्याला तीन गेट आहेत. इस्ट गेट आणि वेस्ट गेट जो दसऱ्याला किंवा खास प्रसंगी उघडला जातो आणि तिसरा गेट आहे साउथ गेट जो की सर्वसामान्य लोकांसाठी आहे.




राजवाड्याच्या आवारात प्रसन्न कृष्णा स्वामी आणि लक्ष्मीरमण स्वामी ही दोन लक्षणीय मंदिरे असून इतरही पाहण्यासारखी अनेक छोटी मोठी मंदिरे आहेत.



पूर्ण म्हैसूर पॅलेस फिरण्याची परवानगी नाही. अगदी मोजक्याच ठिकाणी जाण्याची परवानगी आहे आणि त्यातही फोटोग्राफीला अनेक ठिकाणी मज्जाव आहे. यापैकी सगळ्यात पाहण्यासारखं काय असं विचाराल तर म्युझीयम, ज्यात राजघराण्याच्या अनेक प्राचीन आणि ऐतिहासिक वस्तू जपून ठेवल्या आहेत. महाराजांचे कपडे, त्यांचे दागिने, उंची फर्निचर, आयुधं इत्यादी.

म्हैसूर पॅलेस बाबत सगळ्यात जास्त खटकणारी गोष्ट म्हणजे प्रत्येक भाग पाहण्यासाठी तुम्हाला पैसे देऊनच आत जावं लागतं आणि चांगले ५०-१५० रुपये प्रवेश शुल्क घेतात. सगळ्याच्या सगळा राजवाडा पाहायचा तर अंदाजे १००० रुपयांची खिशाला कात्री बसू शकते. कारण आम्ही २-३ वास्तू पाहिल्या त्यात आमचे २५० रुपये तरी खर्च झाले.



त्या दिवशी शनिवार असूनही तोबा गर्दी होती. त्यामुळे अगदी २-३ वास्तू पाहण्यातच २ तास गेले आणि वेळेसोबत आमच्या पुढील प्लानचे सुद्धा १२ वाजण्याच्या मार्गावर होते. आता जास्त वेळ न दवडता मुन्नारकडे निघू आणि वाटेतच जे पहिलं रेस्टॉरंट म्हैसूर सोडल्यानंतर दिसेल तिथे पेटपुजा करू असं ठरवलं. म्हैसूर पासून १०-१५ किलोमीटर पुढे आलोच होतो की नजर एका टुमदार रेस्टॉरंटवर पडली. बाईक्स पार्किंगसाठीही जागा होती. मग काय सकाळपासून लागलेली भूक भरून काढण्यासाठी आत शिरलो आणि मेनू ही न पाहता ऑर्डर केली व्हेज थाळी!
कधीही तुम्ही ज्या प्रदेशात जाता तेव्हा तेथील खाद्यपदार्थांची जास्त माहिती नसेल तेव्हा सरळ जेवणात व्हेज थाळी ऑर्डर करावी. ही अशी एकमेव डिश जिथे तुम्हाला खूप सारे पदार्थ तर ट्राय करता येतात आणि कशाचीच चव रुचली नाही तर भात आणि डाळ असतेच. म्हणजे कोणत्याही प्रदेशाची व्हेज थाळी ऑर्डर करण्यात धोका नसतो.

आम्ही दोघेही तसं पाहायला गेलं तर एक्सपीरीमेंट करणारे आहोत. मात्र आता भूक जोरदार लागलेली आणि मी एकदा गाणगापूरला गेलो तेव्हा कर्नाटकी व्हेज थाळी ट्राय केली होती. त्यामुळे महेंद्रच्या समंतीने व्हेज थाळीच

मागवली. थाळी पाहताच आम्ही दोघे खुश, कारण त्यात आरामात पोट भरेल इतके पदार्थ होते. भात, डाळ, चपाती, भोपळ्याची भाजी, फरसबीची भाजी, रस्सम, दही, लोणचं, चांगला भरपेट मेनू होता आणि किंमत फक्त १०० रुपये.




तर अश्याप्रकारे १०० रुपयांत भरपेट खाऊन आमच्या गाड्या धावू लागल्या मुन्नारच्या दिशेने. इथून मुन्नार होतं जवळपास ३०० किलोमीटर! हे अंतर कापायला गुगल मॅप्स दाखवत होतं जवळपास ९ तास! ३०० किलोमीटर साठी ९ तास म्हणजे गुगल काहीतरी फेकतंय राव असं आम्हाला वाटलं...पण गुगल बरोबर होतं आणि आम्हाला जास्त अहंकार झाला होता यावर नंतर शिक्कामोर्तब झालं.

म्हैसूर येतं कर्नाटकमध्ये, मुन्नार येतं केरळ मध्ये आणि तिथपर्यंत पोहोचायचं म्हणजे मध्ये अजून एक राज्य पार करावं लागतं ते म्हणजे तमिळनाडू. याचा अर्थ आज आम्ही या तीनशे किलोमीटरच्या प्रवासात एका दिवसात एकूण तीन राज्यांची सफर करणार होतो. १ वाजता आम्ही आमचा प्रवास सुरु केला आणि दीड तासात येऊन पोहोचलो बांदीपुर व्याघ्र प्रकल्प व राष्ट्रीय उद्यानात!




भारतातील अति महत्त्वाच्या व्याघ्र प्रकल्पापैकी एक असं हे संरक्षित जंगल. इथेच बेअर ग्रील्स आणि रजनीकांत यांचा मॅन व्हर्सेस वाईल्डचा एपिसोड शूट झाला होता. अभयारण्यात शिरताना आमची कर्नाटक प्रशासनाकडून ना कोणती तपासणी केली गेली ना विचारणा केली गेली. सरळ हातानेच निघा असं सांगितलं. आत शिरलो आणि मन प्रसन्न झालं, कारण गेल्या ३ दिवसांत पहिल्यांदाच डोळ्याला सुखावणारी चौफेर वनराई दिसत होती. आमचा पुढील किमान १०० किलोमीटरचा प्रवास हा असाच पूर्णपणे जंगलातूनच होणार होता.

ह्या वनक्षेत्रात खूप सारे निर्बंध आहेत. म्हणजे गाडी जास्त वेळ रस्त्याला थांबवू नये. प्राण्यांचे फोटो काढू नयेत. गाडी वेगाने पळवू नये. कोणताही नियम मोडताना आढळल्यास किमान ५००० रुपयांचा दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते असं लिहिलं तर होतं, पण तेथील ढिसाळ प्रशासन पाहता याची किती काटेकोर अंमलबजावणी होत असेल देव जाणे!

व्याघ्र प्रकल्प म्हणजे सहसा एक प्रकारचं खुलं जंगलच असतं, त्यामुळे आसपास प्राणी पाहण्याचा योग जुळून येतो. पण दुपार असल्याने आमच्या नशिबी प्राण्यांचे दर्शन नव्हते.  हे बांदीपुर म्हणजे कर्नाटकाचा शेवट.






बांदीपुर व्याघ्रप्रकल्प संपतं आणि लगेच सुरु होतं अजून एक वनक्षेत्र ते म्हणजे जगप्रसिद्ध मुदुमलाई व्याघ्र प्रकल्प! मुळात हे पूर्ण जंगल एकच आहे. पण राज्यांच्या सीमा संपत असल्याने दोन स्वतंत्र व्याघ्र प्रकल्पांची विभागणी करण्यात आली आहे. बांदीपुर व्याघ्रप्रकल्प कर्नाटकचा आणि मुदुमलाई व्याघ्र प्रकल्प तामिळनाडूचा. तर अशा प्रकारे पहिलं महाराष्ट्र, मग कर्नाटक मागे टाकून आम्ही प्रवेश करत होतो तामिळनाडू ह्या तिसऱ्या राज्यात.




इथल्या प्रशासनाचा मात्र कर्नाटक सारखा ढिसाळपणा जाणवला नाही. प्रवेश करताना बाईक साठी नाममात्र प्रवेश शुल्क घेण्यात आले. मुंबई वरून का आला आहात, किती दिवस राहणार आहात अशी नीट चौकशी करण्यात आली. वनक्षेत्रातून जाताना काय काय करू नका याची सक्त ताकीद दिली. पण हो जाताना सुरक्षित प्रवासाच्या शुभेच्छा देखील दिल्या. दक्षिणेत आल्यापासून पहिल्यांदा असं झालं की आम्हाला भाषेची काहीच समस्या आली नाही. इंग्रजीत छान संभाषण झालं आणि आता आम्ही निघालो मुदुमलाई वनक्षेत्राच्या सफरीला. इथेची तेच निर्बंध, तेच नियम!



बांदीपुर पेक्षा मुदुमलाई वनक्षेत्र अधिक हिरवं गार, नीटनेटकं वाटतं. रस्ता सुद्धा मस्त गुळगुळीत! रस्त्यांसोबत आता बाजूने सह्याद्रीच्या बेलाग डोंगररांगा देखील धावत असतात आणि आपल्या महाराष्ट्राचा सह्याद्री डोळ्यांपुढे तरळून जातो. अशा ठिकाणी फोटो घेण्याचा मोह न आवरता आल्याने मस्त एका टपरीवर थांबलो आणि समोर दिसणारा निसर्गाचा खजिना अनुभवत खास तामिळी लेमन टीची पार्टीच केली.



मुदुमलाई जसं जसं मागे पडत गेलं तसं तशी समोर दिसणारी निलगिरी पर्वतरांग अधिक स्पष्ट दिसू लागली. सरळ रस्ता हळूहळू खड्या चढणीचा झाल्याची जाणीव झाली. मघापासून अंगाची लाहीलाही करणारं उन नाहीसं होऊन गार वारे अंगाला झोंबू लागले आणि घाटातील नागमोड्या वळणांवर आडवे तिडवे होत आम्ही कधी धुक्याने वेढलेल्या उटीमध्ये येऊन पोहोचलो ते कळलंच नाही.



आमच्या प्लान मध्ये उटी सुद्धा होतं, पण आता नाही तर मुन्नार वरून परतीच्या प्रवासा दरम्यान आम्ही उटी अनुभवणार होतो. आता फक्त उटीवर एक धावती नजर पडणार होती.

एव्हाना म्हैसूरहून निघून आम्हाला ४ तास झाले होते. मगाशी आम्ही गुगलला ठेंगा दाखवत म्हणालो होतो की मुन्नार पर्यंतचं अंतर आम्ही आरामात ३ तासांत कापू, पण आता लक्षात आलं होतं की गुगलने अगदी योग्य अंदाज दाखवला होता. बांदीपूर आणि मुदूमलाईचा एका लेनचा लहान रस्ता, रस्त्यात ठिकठिकाणी गतिरोधक, त्यामुळे स्पीड ५० च्या वर गाठणे शक्य नव्हते. पुढे सुरु झाले उटीचे अगदी अरुंद घाट रस्ते, दोन मोठ्या गाड्या आल्या तर रस्ता पूर्ण ब्लॉक होऊन जाईल इतकी आखूड रुंदी आणि या घाट रस्त्यातील वळणे होती हेअर पिन बेन्ड प्रकारची. बरं मध्येच एखादं वळण असं येत असेल तर जास्त फरक पडत नाही पण एकामागून एक अशी वळणे असतात तेव्हा मात्र तुमचा वेग हा ताशी ३० किलोमीटर वर येऊन पोहोचतो.

हेअरपिन बेन्ड म्हणजे काय?



तुम्ही फोटोत जे वळण/टर्न पाहत आहात त्याला हेअरपिन बेन्ड म्हणतात. हा फोटो उटीच्या घाटातील आहे. जगातील सर्वात धोकादायक वळण म्हणून हेअरपिन बेन्ड ओळखले जाते. याला हेअरपिन बेन्ड का म्हणतात तर याच्या आकारामुळे! याचा आकार हा काहीसा हेअरपिनशी साधर्म्य दाखवणारा असतो. तुम्ही गुगलवर सर्च केलंत तर तुम्हाला अधिक चांगली आयडिया मिळेल. हे वळण धोकादायक व जीवघेणं यासाठी आहे कारण इथे वाहन पूर्ण १८० अंश कोनात फिरवावं लागतं. बाईक साठी हे मोठं दिव्य काम नसलं तरी तुम्हाला या वळणात घाई करून चालत नाही. कारण वळण घेताना गाडीवर कंट्रोल नसेल तर तुम्ही थेट दुसऱ्या लेन मध्ये जाल आणि त्या लेन मधून येणाऱ्या गाडीला तुम्ही न दिसल्याने अपघाताचा धोका संभवतो. खरा कस लागतो तो ट्रक्स आणि बस ड्रायव्हरचा. कारण हे वळण घेताना ट्रक वा बस अख्ख्या रस्त्यावर आडव्या रेषेत जातात. त्यामुळे पूर्ण रस्ता ब्लॉक होतो. ते जोवर पूर्ण वळण घेऊन निघून जात नाही तोवर पूर्ण रस्ता बंदच आणि जर चालक वळण घेण्यात अयशस्वी ठरला की मग तर २-३ तास रस्ता ब्लॉक! अश्यावेळी एक एक गाडी मागे घेऊन त्या ट्रक वा बसला जायला वाट करून दिली जाते. म्हणून या रस्त्यांवर मोठी वाहने चालवणारे चालक हे कुशल आणि अनुभवीच असतात. अशी वळणे त्या प्रदेशात बनवली जातात जेथे खूप तीव्र उतार व चढ आहे. वळण हे जरा लांबून जात असल्याने उतार व चढ कमी होतो. सुरक्षेसाठी अशा वळणावर मिरर अर्थात आरसे लावलेले असतात. म्हणजे वळणाच्या मागून समोरच्या दिशेने कोणते वाहन येत आहे त्यानुसार आपण आपली पुढील क्रिया करू शकतो. भारतभरात असे अनेक हेअरपिन बेन्ड रोड्स आहेत.

त्यापैकी मनाली ते लेह दरम्यानचा गाटा लुप्सचा रोड रायडर्स मध्ये प्रसिद्ध आहे. भारतातील सगळ्यात धोकादायक हेअरपिन बेन्ड आहेत कर्नाटकातील कोली हिल्स मध्ये! तब्बल ७० हेअरपिन बेन्ड या घाट रस्त्याला आहेत. थरार म्हणजे काय ते या बेन्ड्स वर खेळताना जाणवते! या सुरक्षित थराराची अट फक्त एकच! डोळे, कान सतर्क, हाताच्या थ्रोटल वर कंट्रोल, पाय नेहमी मागच्या ब्रेक वर आणि वेगाशी स्पर्धा नाही.

फोटोतील वळण तितकं धोकादायक नाही, यापेक्षा कैक पटीने धोकादायक वळणे या पूर्ण घाटात आहेत. पण तिथेबाईक थांबवून फोटो काढणे धोकादायक वाटले म्हणून एका ठिकाणी पासिंग जागा दिसली तर पटकन फोटो काढायचा चान्स घेऊन टाकला.

एक उदाहरण म्हणून खाली एक लिंक देत आहे ज्यात उटीच्या घाटातील एका हेअर पिन बेन्डची चित्तथरारक व्हिडिओ आहे.

https://www.youtube.com/watch?v=ebw7IRYmcCA




तर म्हैसूरपासून उटी पर्यंतच्या या रस्त्यात असे ३६ हेअर पिन बेन्ड आहेत. पण हे फक्त झाले उटी पर्यंतचा घाट चढण्यासाठी आता घाट उतरून मेट्टूपलयाम गाठेपर्यंत अजून असंख्य हेअरपिन बेन्डस आमची वाट पाहत उभे ठाकले होते.

एव्हाना घडाळ्यातील काट्याने ५ चा ठोका पार केला होता. आम्ही उटीचा घाट उतरायला सुरुवात केली आणि काही वेळातच अजून एका समस्येमध्ये अडकलो. ती समस्या म्हणजे घाटातील ट्राफिक! मगाशी वर सांगितल्याप्रमाणे एका हेअर पिन बेन्डला एक व्होल्वो बस चालक योग्य वळण घेण्यात चुकला. ते ट्राफिक आणि आसपास असणाऱ्या बाईक वाल्यांचे, कार वाल्यांचे वैतागलेले चेहरे, सोबत त्याच्या तोंडातून निघणारे फुत्कार ऐकून हे ट्राफिक जवळपास २ तास तरी बंदीवासात ठेवणार याची जाणीव झाली. मात्र १०-१५ मिनिटात कुठून तरी एका कार वाल्याला आम्हा सगळ्याच बाईक वाल्यांची दया आली. त्याने आपली कार कशी बशी मागे करून आम्हाला वाट करून दिली. हवं असतं तर तो आम्हालाही स्वत: सोबत २ तास अडकून ठेवू शकला असता पण खूपच देवमाणूस निघाला तो.

असो तर कशीबशी ५०-१०० गाड्यांतून वाट काढत आम्ही १०-१२ बाईक वाले निघालो आणि पुढे अख्खा रस्ता खाली मिळाला. अंधार वाढत चालला होता. गुगल मॅप उरलेले २०० किलोमीटरचे अंतर गाठण्यासाठी अजून ६ तास दाखवत होता. म्हणजे त्याच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही रात्री १२ ला मुन्नारला पोहोचणार होतो. तरी बरं आम्ही आमचा स्टे म्हैसूरला असतानाच बुक केला होता. यावेळेस आम्ही हॉटेल नाही तर एक मस्त होम स्टे बुक केला आणि पोहोचण्याची वेळ संध्याकाळी ७ पर्यंत कळवली होती. पण कसलं काय गेल्या ६ तासांत आम्ही फक्त अर्ध्या रस्त्यात पोहोचलो होतो. मनात सारखी शंकेची पाल चुकचुकत होती, की पुढे जावं की न जावं. कारण अनोळखी प्रदेशात रात्रीची राईड न केलेलीच बरी असते.

"आता घाट संपला आहे, किमान १५० किलोमीटर सरळ रस्ताच दाखवतंय तर १० वाजेपर्यंत जितकं जाता येईल तेवढं जाऊ, वाटेत हॉटेल दिसलं की जेवू आणि पुढे काय ते ठरवू" असं महेंद्र म्हणाला. मी देखील त्याला दुजोरा देत शक्य तितक्या वेगाने अंतर कापण्यासाठी थ्रोटल वर जोर दिला. ७ वाजले, ८ वाजले, ९ वाजले, पूर्ण अंधारही झाला. दोन तासांपासून वाटेत गावं तर खूप नजरेस पडली, पण रेस्टॉरंट एकही सुरु दिसलं नाही.

२ तासांत आम्ही १५० किलोमीटर अंतर कापलं आणि दाखलं झालो उदुमलपेठ या तामिळनाडू-केरळ सीमेवरील एका मोठ्या गावात. पण एवढ्या रात्री इथेही सगळं बंद. मुन्नार अजून ८०-९० किलोमीटर अंतरावर होतं आणि पोहोचायला लागणार होते ३ तास. म्हणजे गुगल अगदी योग्य वेळ दाखवत होतं. न कमी न जास्त...ते जणू सांगत होतं की, निघताना खूप उडत होतात ना! आता उडत जा किंवा कसेही जा, तुम्ही १२ लाच पोहोचणार!

दुपार पासून काही न खाल्लेले आमच्या पोटातील कावळे आता जागे झाले होते. काय करायचं काही कळत नव्हतं. थांबून काही होणार नाही पुढेच जातच राहू असं ठरवल आणि अर्ध्या तासाने आमच्या नजरेस पडलं एक छोटेखानी रेस्टॉरंट खरं सांगायचं तर ते छोटेखानी रेस्टॉरंट म्हणजे आमच्यासाठी एखाद्या ताज हॉटेल पेक्षा कमी नव्हतं. जे काही असेल आणि कितीही महाग असेल तरी ते खायला आम्ही तयार होतो इतकी भूक लागली होती. बाईक्स बाहेर लावल्या, आत जाताच एक आचारी मस्त उघडा होऊन डोसे बनवताना दिसला. एक पोरगा बसलेल्या ४-५ जणांना काय हवं नको ते पाहत होता आणि एक बाई गल्ल्यावर बसून त्या दोघांना कसल्या तरी सूचना करत होती.

आम्ही जसे आत जाऊन बसलो तश्या खाणाऱ्या सगळ्यांच्या नजरा आमच्यावर रोखल्या गेल्या. मात्र ज्यांच हॉटेल होतं त्यांना काही पडलेलीच नव्हती. कोणीतरी दोनं पोरं लांबून आलीयेत, आपल्याकडची दिसत नाहीत म्हणून त्यांची चौकशी वगैरे करायची की नाही? पण नाही, त्यांनी आम्हाला अक्षरशः फाट्यावर मारलं होतं. मला कुठेतरी असंही वाटून गेलं की आमच्या गरीब गाड्या पाहून त्यांनी आमच्या बद्दल वेगळं मत बनवलं असेल.

असो.....इथे शेवटी हातानेच त्या मुलाला बोलावलं आणि विचारलं, “खाने में क्या है?” हिंदीतच विचारलं, कारण यांच्या समोर इंग्रजी फाडून काही उपयोग नव्हता. त्यात त्यांना आमच्याबद्दल किती अप्रूप वाटतंय ते त्यांनी मगाशी दाखवून दिलंच होतं. तो मुलगा काहीच बोलला नाही फक्त हसला आणि तमिळ भाषेत काहीतरी बोलत त्याने गल्ल्यावर उभ्या असणाऱ्या त्या बाईकडे बोट दाखवलं. तिलाही तोच प्रश्न आम्ही हिंदीत केला. तिलाही काही कळलं नाही. एव्हाना खात असलेल्यांच्या नजर देखील खायचं सोडून आम्ही कश प्रकारे भाषेची ही लढाई लढतो आणि यशस्वी होतो हे पाहण्यास उत्सुक झाल्या. आता शब्द कळत नाही म्हणजे उरला एकच मार्ग. मग हात तोंडाजवळ नेऊन एखाद्या गरीब भिकाऱ्या सारखं खायला काही मिळेल का हे खुणेने विचारलं आणि व्वा हे त्या बाईला लगेच कळलं. तिने तिथूनच तमिळ मध्ये ५-६ ब्यापैकी वाक्य हासडली. त्यापैकी डोसा हा एकच शब्द आम्हाला कळला, आम्ही पुन्हा चौफेर नजर फिरवली आणि मघापासून जे आमच्या नजरेतून सुटलं होतं ते आमच्या लक्षात आलं, हॉटेलात बसलेली सगळीच माणसं फक्त डोसाच खात होती. तेव्हा कळलं ही हे रेस्टॉरंट नसून, एखादं डोसा सेंटर वगैरे असावं.

आता काही पर्याय नव्हता आणि डोसाचा देखील मस्त घमघमाट सुटला होता. म्हटलं चला काहीच नाही त्यापेक्षा डोसाच खाऊ आणि प्रत्येकी चांगले ३-३ डोसा मागवले. इतक्यात महेंद्रची नजर बाजूला ठेवलेल्या अंड्यांवर गेली आणि त्याने त्यांच्याकडे बोट दाखवत विचारलं, “ऑमलेट?” आता तमिळ मध्ये ऑमलेटला ऑमलेटच बोलत असूदे म्हणजे मिळवलं नाहीतर पुन्हा समजावण्याची कसरत करावी लागणार होती. पण नाही, इथे आम्ही नशिबवान ठरलो आणि खास आमच्यासाठी ती बाई ऑमलेट बनवायला तयार झाली. एव्हाना डोसेही तयार झाले होते. त्या पोराने छानपैकी केळीचं पान धुवून आणलं. त्यावर डोसे टाकले आणि सरळ चटणी ओतली. मला ही गोष्ट अजीबात आवडत नाही. मला चटणी आणि डोसा वेगळा वाढलेला लागतो. पण आता परत हे समजवत बसण्याची ताकदही नव्हती आणि वेळही नव्हती. त्यामुळे गपगुमान पहिला घास तोंडात टाकला आणि व्वा...अस्सल साउथ इंडियन डोश्याची चव गळयाखाली उतरताच मन तृप्त झालं. थोड्या वेळाने आमचे २-२ ऑमलेट पण आले. मुन्नारला पोहोचेपर्यंत एवढं जेवण आम्हाला पुरेसं होतं.



या सगळ्या गोंधळात अर्धा तास गेला. १० वाजता पुन्हा बाईकवर मांड ठोकली आणि निघालो तिसऱ्या राज्यात अर्थात केरळ मध्ये प्रवेश करण्यासाठी! उरलेले ८०-९० किलोमीटरचं अंतर दोन तासांत सहज पार करून, १२ नाहीतर जास्तीत जास्त १ वाजेपर्यंत पोहोचूच असा आमचा ठाम विश्वास होता. पण आमच्या या ठाम विश्वासाचं पानिपत करायला देवाने जणू मार्गात आमच्यासाठी वेगवेगळे टास्कच असाईन करून ठवले होते.

उदुमलपेठ वरून निघालो आणि दहा मिनिटांतच पावसाला सुरुवात झाली. ओले रस्ते पाहून समजलं की वरुण राजाने खूप आधीपासूनच इथे हजेरी लावलेली आहे. अचानक भेटलेल्या या पावसामुळे आमचा वेग मंदावला. रस्ते निसरडे झाले होते. वरून पावसाची रिपरिप चालू होती. तरी बरं आम्ही आधीपासूनच आमचं सगळं सामान वॉटरप्रुफ कव्हर मध्ये ठेवलं होतं. कारण या भागात कधीही पाऊस पडतो हे ऐकून होतोच. पुन्हा एकदा मॅप पाहिला. पुढे एकही मोठं शहर दिसत नव्हतं. यापुढे थेट मुन्नार पर्यंत होता फक्त आणि फक्त जंगल पट्टा!

आता मुन्नार गाठण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. पुन्हा मनाचा हिय्या करून निघालो आणि काही वेळातच सुरु झालं दिवसातलं तिसर वन क्षेत्र आणि तिसरा व्याघ्र प्रकल्प म्हणजेच अनामलाई व्याघ्र प्रकल्प! हा तामिळनाडू मधला दुसरा महत्त्वाचा व्याघ्र प्रकल्प होय. ज्या प्रमाणे कर्नाटक आणि केरळ राज्याने एकच व्याघ्र प्रकल्प विभागून घेतला आहे त्याच प्रमाणे इथे तामिळनाडू आणि केरळ राज्याने पूर्ण वन क्षेत्र विभागून घेतलं आहे. त्यापैकी तामिळनाडू कडील वनक्षेत्र ओळखलं जातं अनामलाई व्याघ्र प्रकल्प या नावाने! पण इथे रस्ता अगदी अभयारण्याच्या मधून जात नाही तर थोडा बाहेरून जातो. एका चेक पोस्ट जवळ नियमाप्रमाणे मुदुमलाईला झाली तशी फक्त आमची चौकशी होईल असं वाटलं. पण नाही इथे आमची पूर्ण कागदपत्र तपासली गेली. आमचा पूर्ण प्लान कसा आहे हे समजावून सांगावं लागलं. परत कधी जाणार, कुठे कुठे फिरणार असा अक्षरशः दहा मिनिटे प्रश्न उत्तरांचा तासच घेतला.

या वनक्षेत्रात प्रवेश करणारं प्रत्येक वाहन मग ती सायकल का असेना सगळ्यांची नोंद ठेवली जाते. मुळात ही गोष्ट खूप गरजेची सुदेखील आहे. असं का विचारताय? तर सगळ्यात पहिलं कारण म्हणजे ही संरक्षित वनक्षेत्रे आहेत, या वनक्षेत्रांत तुम्हाला साधी लघुशंका करण्याचीही परवानगी नाही. दुसरं कारण म्हणजे येथील प्राणी. नावावरूनच कळतं की हे व्याघ्र प्रकल्प आहेत. त्यामुळे साहजिक वाघ इथे अक्षरशः मोकाट फिरत असतात. ते जरी सहसा या रस्त्यावर येत नसले तरी काही प्रमाणात प्रवाश्यांच्या जीवाला धोका असतोच. बाकी इतर प्राणी देखील मध्ये मध्ये रस्ते ओलांडत असतात. त्यामुळे प्राण्यांचे अपघात होण्याची शक्यता असते. एकंदरीत काहीही प्रकार घडला तर त्या सबंधित व्यक्तीचा मागोवा घेणे सोपे जावे म्हणून हे सगळे सोपस्कार!

इथे आमचा बऱ्यापैकी वेळ गेला. पण अधिकारी तसे चांगले होते. रस्त्यात काय काय धोके होऊ शकतात याची त्यांनी वरवर कल्पना दिली आणि सुरक्षितपणे घाई न करता जाण्यास सांगितले. एक गोष्ट मात्र चांगली होती की

अशा महत्त्वांच्या ठिकाणी भाषेचा अडथळा येत नव्हता. इंग्रजी संभाषण इथे देवदूताप्रमाणे ठरत होतं. शेवटी त्यांचा निरोप घेऊन त्या काळोख्या रस्त्यावरून अतिशय हळूहळू मार्गक्रमण करत पुढे निघालो. पावसाने उसंत घेतली होती. पुढे महेंद्र लीड करत होता. रस्त्यावर एकही वाहन नव्हतं. आजूबाजूला सह्याद्रीच्या त्या उंच उंच महाकाय डोंगरांचे रात्रीच्या वेळेस दिसणारे अक्राळविक्राळ रूप पाहून मनात धडकी भरत होती.

सगळीकडे निरव शांतता. सोबतीला होती फक्त नागमोडी वळणे आणि कानात सतत वाजत असलेली भक्तीगीतं! अशा काळोख्या, थंड वातावरणात रोमँटिक गाणी ऐकायची सोडून हा भक्तीगीतं काय ऐकत होता असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर सांगतो, मी असल्या अंधश्रद्धेतून कधीच बाहेर आलो. पहिलं मलाही वाटायचं मध्यरात्री एकट्याने काळोख्या रात्री बाईक चालवत रोमँटिक गाणी ऐकणं किती भारी असेल ना? पण हा माझा भ्रम कधीच तुटला. रोमँटिक गाणी ऐकण्याची मज्जा तेव्हाच येऊ शकते जेव्हा मागे गर्लफ्रेंड किंवा आपली पत्नी असेल. एकटं असताना वर बसलेलाच मानसिक आधार देतो आणि हो अशा स्थितीत चुकूनही ऑटो प्ले, किंवा शफल ऑप्शन चालू ठेवू नये. अशावेळेसच बरोबर काहीतरी भयानक गाणी अचानक लागतात आणि बोट भर फाटलेली हातभर फाटायला वेळ लागत नाही. म्हणून सगळ्यात सुरक्षित म्हणजे भक्तीगीतं ऐकावीत. एरव्ही नाहीतरी ती अशीच पडून असतात, आणि कधी लागलीच तर आपण त्यांना स्किप करतो. त्यामुळे या भयानक वातावरणाच्या निमित्ताने का होईना त्यांचा वापर करावा या मताचा मी तरी आहे.




तर एखाद्या जुन्या बॉलीवूड भयपटात असाव्या अशा रस्त्यातून अजून अर्धा तास प्रवास केल्यावर पुढे अजून एक चेकपोस्ट दिसू लागलं आणि खात्री झाली की इथे तामिळनाडू संपलं आणि आलं केरळ...!

इथून सुरु झाला भल्या मोठ्या वनक्षेत्राचा केरळ कडील अध्याय अर्थात चिन्नार वन्यजीव अभयारण्य! आता इथे पुन्हा सगळी तीच चौकशी झाली. पण राज्य बदललं तरी इंग्रजीने इथेही तारून नेलं. फक्त इथे चौकशी दरम्यानचा एकच वेगळा प्रश्न विचारला गेला, जो इथवर येईपर्यंत अजूनही कोणी विचारला नव्हता. तो प्रश्न म्हणजे,
“Carrying Drugs? If you have then show me or you’ll be in trouble.”

महेंद्र आणि मी दोघांनी एकमेकांकडे पाहिलं, आम्हाला थोडं विचित्र वाटलं, आम्ही त्याला समजावलं की असं काही आमच्याकडे नाहीये. आम्ही बाईक वरून फक्त फिरायला आलो आहोत. पण त्याचा काही विश्वास बसेना. मग काय आमची चांगलीच झाडाझडती घेतली गेली. जॅकेट पासून पॅन्ट पर्यंत सगळ्या गोष्टी चाचपून झाल्यावर त्याने थेट बॅगा उघडायला सांगितल्या. बाईकवर सगळं सामान सेट करताना काय मेहनत घ्यावी लागते हे आमचं आम्हाला माहित होतं. आता पुन्हा सगळ काढा, लावा म्हणजे किमान अर्धा तास जाणार होता. त्यात १२ पण वाजून गेले होते आणि डोळ्यावर जबरदस्त झोप होती. मात्र पर्याय नव्हता. नियमानुसार सहकार्य करायला लागणार होतं.

झालं....रात्री १२ वाजता आमचा सगळा संसार आम्ही रस्त्यावर मांडून बसलो. मध्ये आम्हाला थोडी शंकाही आली की हा पैसे उकळण्याचा तर डाव नाही ना. पण सुदैवाने तसं काही झालं नाही. त्याला आमच्या सामानात काही आक्षेपार्ह आढळलं नाही.  नंतर सहज त्या अधिकाऱ्याशी बोलताना समजलं की तामिळनाडू मार्गे मोठ्या प्रमाणावर ड्रग्जची केरळ मध्ये तस्करी होते. मध्यंतरी ही गोष्ट उजेडात आल्यापासून या मार्गावर मोठ्या प्रमाणात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सध्या पंजाब आणि गोवा मागोमाग केरळ हे भारताचं ड्रग कॅपीटल होण्याच्या मार्गावर आहे. म्हणून येथील सरकारने बाहेरून येणाऱ्यांवर कडक तपासणीचे निर्बंध घातले आहेत. म्हणजे त्रास झाला असला तरी आपण एका चांगल्या कामात सहकार्य केलं याचं समाधानचं वाटलं. कर्नाटक आणि तामिळनाडू पेक्षाही केरळमधील अधिकाऱ्यांच्या या दक्षतेचं आणि प्रामाणिकपणे काम करण्याच कौतुक करायला हवं. रात्रीचे १२ वाजले आहेत, कंटाळा आलाय म्हणून त्यांनी कुठेच हलगर्जीपणा केला नाही. एवढचं नाहीतर मुन्नार हून तामिळनाडूच्या दिशेने जाणाऱ्या दोन तीन कार्सची पण अशीच कसून चौकशी केली.

आम्ही निघत होतो तेव्हा एक सावधगिरी म्हणून विचारलं कि, “What is road condition? How much time it will take?”  तो उत्तरला “2 Hours.” त्याने दोन तास म्हणताच आम्हा दोघांच्या डोक्यात कोणीतरी धोंडा घालावा असं वाटलं. इतकं दुःख तर कधी सह्याद्रीत ट्रेक करताना लागणारा वेळ ऐकूनही झालं नव्हतं. आम्ही गेले १२ तास बाईक चालवत होतो. शरीरातील ताकद संपण्याच्या मार्गावर होती आणि हे महाशय म्हणत होते की ५० किलोमीटर साठी तब्बल २ तास लागणार.

पुढे आम्ही निघताच ५ किलोमीटर मध्येच लक्षात आलं की त्या अधिकाऱ्याने आम्हाला काही चुकीचं सांगितलं नव्हतं. रस्ता हा अति अरुंद होता. एका बाजूला खोल मोठी दरी होती, मध्ये मध्ये तर सुरक्षा रेलिंग सुद्धा नव्हते. सगळीकडे नुसता काळोख. त्यात रस्ता सरळ नाही, तर ५० किलोमीटरचा पूर्ण तीव्र चढावाचा घाट रस्ता, मध्येच हेअरपिन बेन्डस!

चला, एवढे अडथळे कमी होते की काय म्हणून देवाने वरून वरुण राजाला आमच्यावर पुन्हा वर्षाव करायला सांगितलं आणि पाऊस सुरु झाला. आधीच निसरडे असलेले रस्ते आता अजून निसरडे झाले. रस्त्याच्या बाजूचे मातीचे ढिगारे चिखलाच्या रुपात वाहू लागले. आम्ही जस जसे वर चढू लागलो तस तसा एक फरक जाणवू लागला तो म्हणजे धुकं वाढत चाललं होतं. काही वेळाने तर अगदी फुट भर अंतरावरचं ही दिसून येत नव्हतं. आपण इथे येऊन चुकी केली हे राहून राहून वाटत होतं. कारण थोडा जरी अंदाज चुकला असता तरी आम्ही हजारो फुट खोल दरीत जाऊन कोसळणार होतो.



अर्थातच घाबरून जाण्याची ही वेळ नव्हती. सुदैवाने मी दोन नाईट व्हिजन गॉगल्स घेऊन ठेवले होते. नाईट व्हिजन गॉगल्सवर पिवळ्या रंगाची काच असते ज्यामुळे तुम्हाला रात्रीच्या वेळेस आणि धुके असणाऱ्या ठिकाणी अधिक स्पष्टपणे पाहता येतं. मघापासून आधीच ४० वर आलेला आमचा वेग आता चक्क १०-१५ वर आला होता. आम्ही अगदी सावधानपूर्वक एक एक किलोमीटर पार करत होतो. धुक्याची तीव्रता आता इतकी अति प्रचंड वाढली होती की मला माझ्या मिरर मध्ये मागून येणारा महेंद्र देखील दिसत नव्हता. एवढचं काय तर त्याच्या बाईकला त्याने लावलेले हाय बीमचे लाईट्स देखील माझ्या मिरर पर्यंत पोहोचत नव्हते. तो मागेच येतोय हाच विचार करून न थांबता मी पुढे जात होतो. पावसात तेरावा महिना म्हणून की काय अचानक रस्त्यावरचे खड्डे देखील वाढले. त्यामुळे कुठे धडपडू वगैरे ही भीती होतीच. काही वेळाने एक सुंदर चर्च दिसलं. रात्रीच्या मिट्ट काळोख्या अंधारात मस्त झगमगत होतं. तिथे थोडा वेळ थांबलो आणि आपल्या देवाला केली तशी येशूलाही विनंती केली की, “बाबा सुखरूप पोहचव.”

आजवरच्या आयुष्यातील हा अतिशय थरारक आणि जीवघेणा प्रवास होता. गेल्या कित्येक वर्षांत खूप घाबरणारे प्रसंग आले पण इतकी कधीच फाटली नव्हती. अशा स्थितीत जितकं माणूस शांत असतो आणि घाई करत नाही तितका तो सुखरूप राहू शकतो आणि आम्ही हेच केलं. त्याचं फळ म्हणून अखेर बोर्ड दिसला मुन्नार – ५ किलोमीटर.

हुश्श! ४५ किलोमीटरचा टप्पा आम्ही या नवख्या वातावरणात समाधानपूर्वक वेळेत म्हणजे दीड तासात पूर्ण केला. मुन्नार जरी ५ किलोमीटर असलं तरी अजून आमचा होम स्टे मुन्नार वरून ८ किलोमीटर आत होता. थोडा वेळ रस्त्याच्या बाजूला थांबलो. १० मिनिटांचा ब्रेक घेतला. रात्रीचे अडीच वाजून गेले होते. सातला पोहचू अशी आशा ठेवून असणारी आम्ही पोरं तब्बल सात तास मागे होतो. मुन्नार येताच चढ संपला आणि होम स्टे दिशेने जाणारा रस्ता खाली उतरू लागला. हळूहळू आमचं डेस्टिनेशन जवळ येत होतं. मात्र एक भीती देखील होती की एवढ्या उशिरा कोणाच्या घराचा दरवाजा ठोठावायचा म्हणजे शिव्या तर पडणार नाही ना? पण आपण पैसे भरले आहेत, ते कसे काय आपल्याला ओरडतील असा विचार मनात उसनं अवसान आणण्यात मदत करत होता.

मुख्य रस्ता सोडून आत मध्ये जाणाऱ्या एका कच्च्या रस्त्यावर बाईक्स घुसवल्या. कच्चा म्हणजे इतका कच्चा रस्ता की जणू काय आम्ही एका दुर्गम भागात आलोय असचं वाटू लागलं. बाईक्स धक्के खात होत्या आणि वर आम्ही हेलकावे खात होतो. पण आता शरीरातील ताकदीप्रमाणे मेंदूतील बुद्धीनेही साथ सोडली होती. जशी बाईक आपटत घेऊन जात होती तसे आम्ही त्यावरून जात होतो.

इथून अजून २ किलोमीटर बाकी होते. एक एक किलोमीटर हा प्रहरासारखा वाटत होता आणि हा प्रवास काही संपत नव्हता. शेवटी होम स्टे जवळ कसेबसे पोहोचलो आणि पाहताच खुश झालो. कारण एक छानसा टुमदार बंगला आमच्या समोर होता. रस्त्यापासून बंगल्यापर्यंत जायला एक तीव्र उतार दिसला. त्यावरून बाईक्स आत घेतल्या. बंगल्याबाहेर लावल्या आणि दबकतच डोर बेल वाजवली. काहीच प्रतिसाद नाही मिळाला. पुन्हा वाजवली, पुन्हा काहीच प्रतिसाद नाही. आम्ही सगळं समान वगैरे उतरून आत जायला तयार होतो, पण मालक इतका गाढ झोपेत होता की बाहेर यायचं नावच घेत नव्हता. फोन लावला तो पठ्ठ्याने उचलला नाही. आता सकाळ होईपर्यंत इथे व्हरांड्यातच झोपावं लागणार असं वाटलं. इतक्यात त्याचाच फोन आला आणि तो आम्हालाच सॉरी बोलला.

चला, म्हणजे एक चांगला मालक इथे आमच्या दिमतीला होता तर. तो बाहेर आला. आमची विचारपूस केली. ओळखपत्र पाहिली आणि आम्हाला वरच्या मजल्यावरची रूम दाखवली. मुळात तो सुशिक्षित आणि त्यातही ख्रिश्चन असल्याने त्याला इंग्रजी येत होतं आणि आमची भाषेची अडचण दूर झाली. बिचारा आमच्यासाठी बारा वाजेपर्यंत जागा होता. आम्हाला त्याने कॉल केला, पण मध्ये चिन्नार जवळ नेटवर्क नसल्याने संपर्क झाला नाही. त्याला वाटलं आम्ही काही येत नाही. पण एवढ्या उशिरा का होईना इतक्या धोकादायक रस्त्यावरून आम्ही आलो याचं त्याला खूप अप्रूप वाटत होतं. पावसाचा सिझन नसला तरी मुन्नार हे अति उंचावर असल्याने इथे कधीही वरूण राजा सरप्राईज व्हिजीट देतो आणि धुकं तर रोज संध्याकाळी पडतं ते थेट सकाळ पर्यंत असतंच असतं. म्हणून संध्याकाळ नंतर फार कोणी इथे प्रवास करत नाही, असं त्याने सांगितलं. माणूस खूप चांगला होता.

बोलका होता. आम्हालाही खूप काही विचारायचं होतं. माहिती घ्यायची होती. पण अंगात अजिबात त्राण नव्हतं. त्यालाही ते जाणवलं असावं म्हणून त्याने आमचा निरोप घेतला आणि आम्ही इकडे पटापट सामान बाजूला टाकून बेडला मिठी मारली.


**मुन्नार भ्रमंती (दिनांक 19 जानेवारी)**

## चिकन बिर्याणी...छास आणि भाषेचा गोंधळ!

४ वाजता झोपलो आणि सकाळी ९ वाजता जाग आली. फक्त ५ तासाची झोप, पण खूप फ्रेश वाटत होतं. महेंद्र माझ्या आधीच उठून तयारी करत होता. ब्रेड ऑम्लेट आणि चहा असा ब्रेकफास्ट आमच्या होम स्टेच्या भल्या मालकाने आधीच आणून ठेवला होतं. पटकन फ्रेश होऊन नाश्ता करण्यासाठी दोघेही बाहेरच्या गॅलरीत येऊन बसलो. आसपास पक्ष्यांच्या किलबिलाटा ऐवजी अजून कसलाच आवाज येत नव्हता. सगळीकडे मनाला सुखावणारी शांतता होती.



जेव्हा पासून मुन्नारचे कॉलेजला असताना फोटो पाहिले होते तेव्हापासून मुन्नार डोळ्यांनी भरभरून अनुभवायचं माझं स्वप्न होतं आणि आज ते स्वप्न पूर्ण झालं होतं. आज पूर्ण दिवस आम्ही मुन्नार फिरणार होतो. मात्र आमच्याकडे जास्त वेळ नव्हता. आम्ही सकाळ सकाळ मुन्नार भटकण्यासाठी



निघणे अपेक्षित होतं. पण दहा वाजले तरी आम्ही इथेच होतो. आता इथे कमी वेळात जास्तीत जास्त मुन्नार कसं फिरावं याची माहिती मालकाकडूनच घेऊ म्हणून खाली आलो तर तो आमचीच वाट पाहत खाली उभा होता. आणि आल्या आल्या म्हणाला, “You are from Mumbai? I have been there.”

बस्स तो इतकं म्हणताच आम्हाला पण कोणीतरी जवळचा माणूस भेटल्याची फिलिंग झाली. मग पुन्हा सगळी बाईकची तयारी करत करत गप्पांचा फड रंगला. त्यातून कळलं की तो काही महिन्यांसाठी मुंबईत आला होता. त्याने आवर्जून मुंबईच्या लोकलची आठवण काढली. गर्दी पाहून त्याची चांगलीच तरतरली होती. शेवटी आपलं मुन्नारच बरं म्हणून तो इथे पुन्हा परत आला आणि एक CA म्हणून प्रॅक्टीस करत होता. सोबतीला जोडधंदा म्हणून ही होम स्टे सर्विस!



पुढे तो म्हणाला, “लोकं इथे येतात आणि म्हणतात की मी खूप नशीबवान आहे, अशा सुंदर ठिकाणी माझा बंगला आहे. पण हे खरं नाही. इथे पैसे कमावण्याचे फार कमी स्त्रोत आहेत. इथे चहा सोडला तर दुसरी शेती करण्यासारखी स्थिती नाही. आजकाल लोकं गाईड म्हणून सुद्धा कोणाला सोबत घेत नाहीत. स्वतःच सगळं फिरतात. बाहेरची लोकं आली तर त्यातले फार कमी लोक २-३ दिवसासाठी स्टे करतात, बाकी सगळे एका दिवसात निघून जातात. कधीकधी तर एकही बुकिंग माझ्या होम स्टे ला नसते. त्यामुळे तुम्हाला वाटतं की इथे राहणारे नशीबवान आहेत पण असं नाही, उलट मुंबईत तुम्हाला कामाची कमी नाही. काही तरी करून तुम्ही पैसे कमवू शकता. इथे कधीकधी आयुष्य खूप खडतर वाटतं.”




त्याने या कटू सत्याची आठवण करून दिल्यावर गड्या आपली मुंबई तितकीही वाईट नाही हे स्वतःच स्वतःला समजावलं आणि निघालो आजच्या पहिल्या ठिकाणाकडे अर्थात अनामुदी शिखराकडे!

काल रात्रीच्या अंधारात भयाण वाटणारं मुन्नार सकाळी प्रकाशात मात्र हवहवसं वाटू लागलं. सगळीकडे नुसता हिरवागार गालिचा अंथरल्याचा भास होत होता. चहाचे मळे ज्या प्रदेशात असतात तो प्रदेश सदाबहार का दिसतो हे आज मुन्नारकडे पाहून कळत होतं. मुन्नार हे शहर वसलंय केरळच्या तामिळनाडू सीमेकडील इडुक्की जिल्ह्यात. उन्हाळी सुट्टीसाठी ब्रिटीश अधिकाऱ्यांचं हे आवडतं ठिकाण होतं, आणि का नसावं? ते आहेच असं की एकदा मनात कोरलं की पुसलं जाणारच नाही.



चहाच्या मळ्यांतून वाट मिळेल तसे जणू धावत सुटलेले अरुंद रस्ते, पायऱ्यांप्रमाणे एकावर एक असे विधात्याने रचलेले डोंगर, अनामुदी ह्या सह्याद्रीतील सर्वोच्च शिखराची लाभलेली छाया, बाराही महिने वाहणारे आल्हाददायक थंड वारे, दुपारच्या वेळेसही अख्ख्या प्रदेशाला कुशीत घेऊन विसावलेलं धुकं, मध्येच कुठूनसा येऊन त्यांना जागवणारा सूर्याचा कवडसा आणि ज्याचं वर्णन करता करता शब्दांनीही हार मानवी असं दक्षिणेचं काश्मीर म्हणजे मुन्नार.



येथे बाईक चालवणं खरंच सोप्पं नाही….!नाही, रस्ते नागमोडी आहेत, अरुंद आहेत म्हणून नाही तर इथल्या


स्वर्गाहूनी सुंदर अशा सौंदर्यामुळे!म्हणजे समोरून येणाऱ्या गाड्यांवर लक्ष ठेवू की आसपास दिसणारी निसर्गाची उधळण बघू असं होतं राहतं. या दोन्हीचा बॅलेन्स करणं सुरुवातीला कठीण जातं, पण हळूहळू तो ही जमून जातो आणि खऱ्या  अर्थाने मुन्नार मनाचा ठाव घेतं. असं गरजेचं नाही की बाईकनेच जायला हवं, तुम्ही सहज ट्रीप म्हणून फिरायला जाऊ शकताच, पण तिथल्या रस्त्यांवर स्वत:हून खेळण्यात जी मज्जा आहे ती काही औरच!




अजून एक महत्त्वाची गोष्ट हे मुन्नर नाही मुन्नार आहे आणि आम्हाला हे तेव्हा कळलं जेव्हा म्हैसूर वरून मुन्नारला जाताना मध्येच एका चौकात रस्ता विचारायची पाळी आली आणि आम्ही बापडे, “way to मुन्नर?” असा प्रश्न सगळ्यांना विचारत फिरत होतो आणि सगळ्याचं एकच उत्तर, “we don't know.” म्हटलं अख्ख्या भारताला हे ठिकाण माहित आणि यांना कसं नाही माहित? इतक्यात एका भल्या पोलीस लेडीला काहीतरी कळलं आणि तिने विचारलं, “going मुन्नारा?” तेव्हा आम्हीही मान हलवली आणि तिने रस्ता दाखवला....एका ‘काना’चा फरक आणि हा सगळा गोंधळ!

असो, तर पहिला आम्ही गाठला ‘अनामुदी व्ह्यू पॉइंट’! मुन्नार पासून ८ किलोमीटर असलेले हे ठिकाणी जेथून दिसतं सह्याद्री पर्वत रांगेतील वा पश्चिम घाटातील सर्वात उंच शिखर!

आता बरेच जण म्हणतील की सह्याद्रीतील उंच शिखर तर कळसुबाई आहे. पण नाही, ते महाराष्ट्रातील उचं शिखर आहे. सह्याद्री किंवा ज्याला पश्चिम घाट म्हणूनही ओळखले जाते, ती पर्वतरांग गुजरात पासून थेट केरळ पर्यंत पसरलेली आहे. या संपूर्ण पर्वत रांगेतील तब्बल ३३ सर्वात उंच शिखरे ही दक्षिण भारतातीलच आहेत. त्यापैकी सर्वात उंच ८,८४२ फुट अर्थात २६९५ मीटर उंचीचे शखर म्हणजे अनामुदी!




अनामुदीचा अर्थ होतो हत्तीचं मस्तक. आम्ही जिथे आलो तिथून फक्त अनामुदी शिखर पाहता येत होतं. बाकी तिथे विशेष असं काही नव्हतं, म्हणून आसपास चौकशी केली तेव्हा कळलं की हा खरा व्ह्यू पॉइंट नाही. इरविकुलम नॅशनल पार्क मधून अनामूदीच्या पायथ्याला जाण्याचा मार्ग आहे. पुन्हा काही किलोमीटर माघारीचा रस्ता धरला आणि इरविकुलम नॅशनल पार्क जवळ आलो.

तिथे कळलं की सध्या फक्त नॅशनल पार्क फिरता येईल, अनामूदीला जाण्याचा रस्ता बंद आहे. त्यामागचं विशेष कारण काही सांगितलं नाही. थोडा हिरमोड झाला खरा. पण अनामुदी इतकं उंच आहे की मुन्नार मधून कुठूनही दिसतं. त्यामुळे जवळून नाही बघता आलं तरी लांबून का होईना दर्शन झालं याचं समाधान होतं. नॅशनल पार्क फिरायचा आमचा तसा काही प्लान नव्हता. म्हणून तिथून थेट निघालो मुन्नार टॉप स्टेशनकडे!




हे अंतर होतं तब्बल ४३ किलोमीटर आणि पोहोचायला वेळ लागणार होता जवळपास दीड तास!



चला, पुन्हा एकदा नागमोडी वळणांची वाट धरली.

एव्हाना रस्त्यांवर वाहनांची वर्दळ वाढली होती. मुन्नार फिरायला पर्यटकांचे अक्षरशः लोंढे मोठमोठ्या बस मधून येत होते. आम्ही बापुडे कसे बसे त्या गर्दीतून वाट काढत हळूहळू पुढे जात होतो. याच रस्त्याला मुन्नार मधील अनेक बघण्यासारखी ठिकाणे नजरेस पडली. पण पहिलं टॉप स्टेशन पाहू व येताना एक एक ठिकाण बघत माघारी जाऊ असं ठरवलं.




टॉप स्टेशन म्हणजे मुन्नार मधील सर्वात उंच ठिकाण, जिथे पर्यटक बिनदिक्कत जाऊ शकतात. वर चढण्याचे कष्ट देखील नाहीत.

थेट वर पर्यंत गाड्या जातात. पण इतक्या उंचीवर रस्ता तयार केल्याने दिवसभर हा रस्ता धुक्यात असतो. आम्ही पोहोचलो तेव्हा दुपारचे २ वाजले असतील आणि त्या भर दुपारी अगदी पहाटे पडावं इतकं गच्च धुकं होतं. हे ठिकाण केरळ आणि तामिळनाडू या सीमेवर असल्याने येथून सह्याद्रीची पर्वतरांग आणि खाली पसरलेल्या तामिळनाडूचं विहंगम दृश्य दिसतं. तो सगळा नजारा एका उंच मनोऱ्यातून पाहता येतो.

अर्थात इथेही धुक्यामुळे आमची निराशा झाली, पण जे काही दृश्य दिसत होतं ते मनाला सुखावणारं होतं.





परतीच्या मार्गावर पहिलं ठिकाण भेटतं ते म्हणजे समुद्र सपाटी पासून १७०० मीटर उंचीवर स्थित असलेलं कुंडला धरण! हे आशियातील पहिलं आर्क पद्धतीचे धरण होय.



हे ठिकाण त्या दुर्मिळ प्रदेशांपैकी एक आहे जेथे दर वर्षातून एकदा नीलाकुरुंजी फुल फुलतं आणि वर्षातून दोनदा चेरी ब्लॉसमची फुल फुलून या धरण प्रदेशाची सुंदरता अधिक वाढवतात.

यांनतर तब्बल २४ किलोमीटर वर भेटतं अजून एक धरण ज्याचं नाव आहे मेट्टूपेट्टी धरण.

मस्तपैकी धरणाच्या पाण्यावर रहदारीसाठी छोटेखानी पूल बांधला आहे त्यावरून गाड्या सुद्धा घेऊन जाता येतात आणि अथांग पसरलेल्या त्या निळ्याशार पाण्याचे विहंगम दृश्य डोळे भरून पाहता येते. हायड्रो इलेक्ट्रिक प्रकल्पाचा भाग असल्याने हे धरण केरळ राज्याचा महसुलातही निर्णायक योगदान देतं.






दुपार पासून फिरत फिरत कधी संध्याकाळ झाली कळलचं नाही. मुख्य मुन्नार शहर येथून १३ किलोमीटर वर होतं व आता मार्गात कार्मेलागिरी एलीफन्ट पार्क वगळता पाहण्यासारखं काही खास नव्हतं.

आम्ही पोहोचलो तेव्हा वेळ संपली होती. पण तरी त्याने आम्हाला आत घेतलं. मग काय फक्त हत्ती बघून १० मिनिटात परत निघालो.  जेव्हा पार्क सुरु असतं तेव्हा चहाच्या मळ्यांतून छानशी एलीफन्ट राईड करता येते. एलीफन्ट बाथिंग अर्थात एवढ्या महाकाय हत्तींना अंघोळ कशी घालतात ते पाहता येतं.






असो, आता सूर्य अस्तास जाण्यास काहीच वेळ उरला होता. दुरून मुन्नार शहरही अंधाराला कवटाळण्यास सज्ज होण्यापूर्वी संधीकाळचं आपलं सौंदर्य दाखवत आम्हाला पुन्हा माघारी बोलवत होतं.



त्यामुळे जरी मनात कुठे जायचं असलं तरी जाता येणार नव्हतं. शेवटी मुन्नार शहरातील मार्केट फिरून, थोडीफार शॉपिंग करून जेवायचं आणि गप्प जाऊन झोपायचं असं ठरलं.

आम्ही दुपारी निघालो त्यापेक्षा जास्त संध्याकाळच्या वेळेस मुन्नार गजबजलेलं दिसतं होतं. पण ही गर्दी फक्त या ५ किलोमीटरच्या परिघातच, शहराच्या बाहेरचं जग पूर्ण वेगळं...फक्त शांतता आणि निसर्गाचं सौंदर्य!




मुन्नार मध्ये गैरसोय होईल अशी काही स्थिती नाही. आवश्यक सर्व दुकाने, हॉटेलाची भरपूर सोय आहे. फक्त गैरसोय एकच आहे ती म्हणजे गाडी वा बाईक पार्क करण्याची. सगळीकडे नो पार्किंगचे बोर्ड लावेलेले होते. आता हे तर कटू सत्य आहे की हे बोर्ड्स नावापुरती असतात. इथेच काहीशी तीच स्थिती होती. नो पार्किंग बोर्डच्या खाली बिनधास्त बाईक्स उभ्या होत्या. पे पार्किंगची चौकशी केली पण काही पत्ता लागला नाही. शेवटी विचार केला इथेच कुठेतरी उभ्या करू. भीती एकच की पोलीसांची गस्त सुरु होती आणि MH नंबर प्लेटच्या बाईक्स अशा नो पार्किंग मध्ये दिसल्या म्हणजे उचलायला नको. पूर्ण शहरात ३ फेऱ्या मारल्या, जागा मिळेना. शेवटी जिथे कोणाची नजर जाणार नाही अशा एका आतल्या रस्त्याला गेलो. तिथे एका बंद दुकानापुढे गाड्या उभ्या असलेल्या दिसल्या. खात्री म्हणून बाजूला चौकशी केली तर तो म्हणाला हे दुकान सकाळपर्यंत काही उघडणार नाही. अखेर जे होईल ते होईल असं म्हणून तिथेच बाईक्स लावल्या. अर्धापाऊण तास मार्केट फिरून मस्त शॉपिंग केली.

मुन्नार मध्ये घेण्यासारख्या तीनच गोष्टी. एक म्हणेज चहा पावडर, दुसरं म्हणजे मुन्नार स्पेशल होममेड चॉकलेट्स आणि तिसरं म्हणजे मसाले. बाकी सगळ्या गोष्टी आपल्या मुंबईला मिळतात तश्याच आहेत. किंमती देखील फार नाहीत, पण हो, जर समोरच्याने सांगितलेल्या किंमतीवर विश्वास ठेवत असाल तर खिसा चांगला रिकामा होईल. जमेल तितका भाव करा, मस्त कमी पैश्यात जास्त शॉपिंग होते. तर हे शॉपिंगचे सोपस्कार पार पाडून निघालो रेस्टॉरंटच्या शोधात. खूप सारे ऑप्शन्स उपलब्ध होते त्यापैकी एक प्रशस्त असं रेस्टॉरंट निवडलं.

आम्ही आत गेलो, आता इथे आपल्याला नक्की काय हवं, हे कसं समजवायचं यासाठी चांगले समजतील असे शब्द आणि हातवारे यांची जुळवाजुळत करत असतानाच हातात मेन्यू आला आणि अहो आश्चर्यम तो चक्क

इंग्रजी मध्ये होता. बऱ्याच स्थानिक खाद्यपदार्थांची त्यात नाव होती. पहिलं वाटलं व्हेज मागवू. पण नंतर विचार केला की आलोच आहोत तर केरळचं नॉनव्हेज ट्राय करू. बरीच चित्र विचित्र नावं होती, रिस्क नकोच म्हणून डिश निवडली चिकन बिर्याणी. डिश तशी परिचयाची होती, मुंबईला असताना महिन्यातून ४-५ वेळा खाणं होतंच. मुन्नार हे जरी ख्रिश्चन बहुल असलं तरी इस्लाम धर्मीय सुद्धा बऱ्यापैकी आहेत. त्यामुळे आशा होती की त्यांनी बनवलेली बिर्याणी म्हणजे लाजवाबच असणार! ऑर्डर दिली आणि १० मिनिटांनी आमची चिकन बिर्याणी टेबलवर हजर झाली.

सामान्यत: चिकन बिर्याणी कशी असते ओ? मस्त वर गुबगुबित चिकन पीस, मसाल्यात मस्त मिक्स झालेला लाल, पिवळा भात....बरोबर? पण नाही मुन्नारची चिकन बिर्याणी म्हणजे काहीतरी वेगळचं प्रकरण होतं. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे भात हा खूप जाड आणि तोकडा होता. त्यात अंड होतं. चिकनचे मोजून ३ पीस होते, पण ती हाडच दिसत होती, आणि सगळ्यात कहर म्हणजे त्यात काजू आणि मनुके घातले होते. म्हटलं ही कोणती बिर्याणी आहे नक्की? पण आता मागवलं तर खायला हवं कारण भूक तर लागली होती.



(अधिक चांगली कल्पना यावी म्हणून इंटरनेट वरील फोटो जोडत आहे)

शेवटी मनात देवाचं नाव घेऊन पहिला घास तोंडात टाकला. पहिल्या सेकंदाला वाटलं की हे नाही जमणार खायला. बाकी सगळं ठीक होतं पण काजू आणि मनुके कोण घालतं बिर्याणी मध्ये? त्यामुळे याची चव काहीशी गोड असणार याची शंका होतीच आणि तेच झालं, चव काहीशी गोडसर होती. शेवटी ठरवलं की जसं आहे तसं खाऊ, सांगणार कोणाला? म्हणून मनात कसलाही विचार न करता पटापट घास तोंडात टाकायला सुरुवात केली आणि हळूहळू बिर्याणी चांगली वाटायला लागली.

यावरून एक धडा घेतला की कोणत्याही प्रदेशात गेल्यावर तिकडचं स्थानिक जेवण ते चांगलंच आहे हा विचार मनात ठेवून खावं. कारण अख्खा भारत पालथा घालायचा लक्ष्य ठेवलेली आम्ही पोरं! कुठे आम्हाला सगळीकडे आपल्या चवीच्या आवडणाऱ्या डिश मिळणार आहेत. त्यामुळे ही सवय व्हायला हवी. नंतर कळलं की त्या चिकन बिर्याणीला मलाबार चिकन दम बिर्याणी म्हणतात.

तर ही बिर्याणी खाता खाता मला तल्लफ आली ताक प्यायची. महेंद्रला विचारलं. त्याने पण होकार दिला. आता छास तर या लोकांना माहित असेलच, असं वाटलं, म्हणून लांबूनच त्याला हाक मारून म्हटलं, “अण्णा टू छास.” पण त्याच्या तोंडावरचे भाव पाहून कळलं आपला अंदाज वाया गेला. छास काही याला कळलं नाही. तो जवळ आला आणि म्हणाला, “what?” मी म्हटलं, “छास…” तो बिचारा पुन्हा हसला आणि मान हलवून नाही म्हणाला. ताक हे दही पासून बनतं आणि दहीला इंग्रजीत काय हाणतात तर yogurt/curd. म्हणून ते शब्दही ट्राय केले.

फेसबुक अकाउंटचा पासवर्ड विसरल्यावर कसा तुम्हाला तो अंधुक अंधुक आठवत असतो आणि तुम्ही जे आठवेल ते ट्राय करत असता आणि फेसबुक तिकडून अगदी शांतपणे incorrect सांगत असतं. अगदी तसचं आमचं होत होतं. असे अजून २-३ वेळा विविध शब्द ट्राय करून पहिले. पण काही उपयोग नाही. इतक्यात त्याला काय आठवलं काय माहित. तो आत गेला आणि एका पोराला त्याने हाताला धरून आणलं आणि म्हणाला, “ask him.” मी तर डोक्याला हात लावला म्हटलं, “आता याला परत समजवायचं?”

त्याला काही नको असं सांगणारच होतो की इतक्यात तो आलेला पोरगा म्हणाला, “सर क्या चाहिये?” आयला इतकं स्पष्ट हिंदी बोलला? विश्वासच बसत नव्हता. तरी खात्री म्हणून परत विचारलं, “हिंदी आती है?” तर म्हणाला, “हा सर मैं झारखंड का हुँ.” मनात म्हटलं हा तर आपल्या पेक्षा लांबून आला आहे. त्याची लाईफस्टोरी जाणून घ्यायची खूप उत्सुकता होती, पण तो जरासा घाईत दिसला आणि आम्हालाही सध्या हे ताक प्रकरण लवकरात लवकर मिटवायचं होतं. त्याला म्हटलं, “जरा छास लेके आना.” आयुष्यात पहिल्यांदा छास हा शब्द ऐकला असला या अविर्भावात तो उत्तरला “क्या?” म्हटलं इथे केरळ मध्ये राहून हा सगळं विसरला की काय?

ताक मिळण्याची शेवटची आशा देखील धूसर होत चालली होती. शेवटचं त्याला समजवायचं म्हणून म्हटलं, “अरे वो गाय के दुध में से दही निकाल के बनाते है ना वो वाला छास. तुमको नही पता?” भाऊने परत नकारार्थी मान हलवली. गेले १० मिनिटे चाललेल्या या प्रकाराने आता आमचंच ताकावरून मन उडालं होतं. इतक्यात तो पोरगा बोलला, “मेन्यू में देखिये ना, उसमें जो है वो सब मिलेगा.” त्याने मेन्यूचं नाव घेताच लगेच डोक्यात ट्यूब पेटली आणि अजूनही आम्ही जो शब्द वापरला नव्हता, तो हुकुमाचा एक्का असणारा शब्द टाकला. म्हटलं बघू आता तरी डाव लागतो का. त्याला म्हटलं, “बटरमिल्क चाहिये.” तर तेव्हा त्याच्याही डोक्यात ट्यूब पेटली. त्याला कळलं, म्हणजे आता ताक मिळले हा आनंद मनात दाटलाच होता की त्याच्या चेह्र्यावरचे हाव भाव बदलले आणि निराश मुद्रेने तो बोलला, “अरे सरजी वो आज नही मिलेगा यहाँ”.

अखेर आम्हाला ताक मिळणार नाही यावर शिक्कामोर्तब झालं. आमचे पडलेले चेहरे पाहून तोच म्हणाला, “सर जी लेमन सोडा लीजिये ना. जबरदस्त है.” आता एवढं म्हणतो आहेच आणि काहीच नाही त्यापेक्षा ताकावरची तहान लेमन सोड्यावर भागवण्यास आम्ही तयार झालो. त्याने लागलीच त्या मुख्य वेटरला हाक मारली आणि

हातानेच बोलावले, तो वेटर येताच मल्याळम मध्ये त्या पोराने त्याला एका वाक्यात काहीतरी सांगितले आणि तो पोरगा निघून गेला. आम्हाला त्याच्या बोलण्यातील लेमन सोडा हा एकच शब्द कळला. तेवढ्यात तो मुख्य वेटर हसत हसत काहीतरी बोलला आणि त्याच्या हावभावावरून आम्हाला अंदाज आला की तो असं म्हणतोय, तुम्हाला लेमन सोडा हवा मग का छास छास म्हणून बोंबलताय?"

अप्रत्यक्षपणे आम्हाला येडे आहात असं म्हणून तो निघाला. तो लेमन सोडा घेऊन आला तरी त्याच्या तोंडावर ते हसू होतं. वाईट वाटतं होतं, पण काय बोलणार...! कारण बोलायला गेलं तर परत त्याला समजवायला वेळ जाणार. त्याला नाहीच समजलं आणि चुकीचा अर्थ घेतला तर राडे होण्याची दाट शक्यता होती. साउथ मुव्ही मी पण खूप पाहतो, त्यामुळे जरा सबुरीनेच घेतलं. तर अशा प्रकारे बिर्याणी, छास अन् लेमन सोडाच्या गोंधळात पोट मात्र गच्च झालं आणि तृप्तीचा ढेकर देत, हॉटेलमध्ये हलत डुलत पोहोचलेल्या, दमलेल्या शरीराने झोपेला जवळ केलं.

## तिसरा टप्पा – मुन्नार ते उटी (दिनांक 20 जानेवारी)

## बम बम बोले!

आज मुन्नारला  टाटा बाय बाय करून आम्ही निघालो होतो उटीकडे. पण या प्रवासात आम्ही आज अजून एका ठिकाणाला भेट देणार होतो ते म्हणजे कोइम्बतुर. इथे आम्हाला फक्त एकच ठिकाण पाहायचं होतं ते काय होतं हे तुम्हाला पुढे कळेलच. तर आजच्या प्रवासाचा पहिला टप्पा होता मुन्नार ते कोइम्बतुर १७१ किलोमीटर! ज्यासाठी किमान पाच तास तरी लागणार होते आणि म्हैसूर ते मुन्नार प्रवासा दरम्यान जो काही अनुभव आला त्यानुसार आम्ही बापजन्मात कधी गुगल मॅप वर संशय न घेण्याचं ठरवलं होतं. त्यामुळे गुगल मॅप सांगतं ५ तास म्हणजे ५ तासच लागणार हे आम्ही मनात बिंबवलं!

आणि हा अंदाज चुकीचा नव्हताच म्हणा, कारण आम्हाला उदमलपेठ या मुख्य गावापर्यंत पुन्हा तो अरुंद घाट रस्ता लागणार होता. ८० किलोमीटरचा हा रस्ता पार करायला ३ तास आवश्यक होते. त्यानंतर पुढे एकही घाट रस्ता नसल्याने अवघ्या २ तासात आम्ही कोइम्बतुरला पोहोचणार होतो.




सकाळी लवकर उठून, मस्तपैकी नाश्ता करून, आमच्या होम स्टेच्या त्या गोड मालकाचा निरोप घेऊन निघालो मुन्नारचं शेवटचं दर्शन घायला!

त्या दिवशी रात्री अगदी भयाण वाटणारा रस्ता अंधारात आपलं किती मौल्यवान सौंदर्य लपवून बसला होता ते आता कळत होतं. हे सौंदर्य पाहून वाटलं हो खरंच ‘दक्षिणेचं काश्मीर’ हे मुन्नारचं नाव अगदी सार्थ आहे. एकीकडे अनामुदी शिखर आमच्या सोबत धावत होतं आणि खाली दरीत वसलेली छोटी छोटी गावं अक्षरशः स्वित्झर्लंड मध्ये आहोत की काय असा फील आणत होती.



निघाल्यापासून पुढील १ तासात आम्ही किमान १०० वेळा थांबलो. घाटातलं संपणारं एक एक वळण निसर्गाचं असं काही अद्भुत रूप समोर दाखवत होतं की थांबून ते दृश्य कॅमेऱ्यात आणि डोळ्यात साठवायचा मोह आवरतच नव्हता. विश्वासच बसत नव्हता, त्या रात्री पावसात आपण ह्या रस्त्यावरून आलो होतो. उदमलपेठ पर्यंत पोहोचायला ३ काय ५ तास आपल्याला लागणार याची जाणीव आम्हालाही झाली. पण म्हटलं होऊ हे उशीर, परत कधी हे पाहायला मिळणार देव जाणे.

म्हणून अक्षरशः हाताशी मोजका असलेला वेळ उधळ उधळ उधळून आम्ही शेवटचं मुन्नार डोळ्यात साठवत पुढे निघालो.




मुन्नार मागे पडलं तसं हळूहळू उंची झपाट्याने कमी होऊ लागली आणि सुरु झालं चिन्नार अभयारण्याचं सौंदर्य. इथेही पुन्हा फोटो काढायचे मोह आवरले नाहीत. आता जस जसे खाली उतरू तसं तसं हे सौंदर्य संपत जाणार हे ठावूक होतं म्हणून आम्हीही बिनधास्त टाईमपास करत होतो.

टाईम पास करता करता हातावरच्या घड्याळाकडे पाहिलं आणि दहा वाजून गेल्याचं दिसलं. मागच्या दोन तासांत आम्ही ३५ किलोमीटर सुद्धा पूर्ण केले नव्हते. आता जास्त थांबायला नको नाहीतर त्या दिवशी रात्रीचं मुन्नारला पोहोचताना जे भोगावं लागलं ते उटीला पोहोचताना भोगावं लागेल अशी भीती मनात दाटली आणि बाईक वरूनच चिन्नारचं सौंदर्य अनुभवत आम्ही पुढे रवाना झालो.




चेकपोस्टला पुन्हा जशी येताना आमची चेकिंग झाली अगदी तितक्याच कडकपणे जाताना चेकिंग झाली. चेकपोस्ट वरून बाहेर पडताना मागे एकदा वळून पाहिलं. अजूनही अनामूदी शिखराचं टोक डोकावून पाहत होतं. जणू मान उचं करून खात्री करत होतं की पोरं आपल्या हद्दीच्या बाहेर सुखरुप गेली ना....!

डोळ्यानेच त्या शिखराला शेवटचा अलविदा करून, पुन्हा भेटू असं म्हणत तामिळनाडू मध्ये प्रवेश केला आणि सुरु झालं अनामलाई व्याघ्र प्रकल्पाचं क्षेत्र. आता घाट संपले होते. घाटांसोबत थंड वातावरणही मागे पडलं. सरळ रस्ता सुरु झाला आणि ११

वाजून गेल्याने उनही जाणवू लागलं. दोन दिवस ४०-५० च्या स्पीड वर धावणाऱ्या बाईक्सनी आता ८० चा स्पीड गाठला. काही वेळातच उदमलपेठ मध्ये आलो. त्या दिवशी ज्या गावात रात्रीची काहीच वर्दळ दिसली नाही ते गाव म्हणजे आता सकाळच्या वेळेस एक मोठी बाजारपेठ म्हणून आमच्या समोर उभं होतं.

उदमलपेठ वरून आम्हाला थेट उटीला जायचं असतं तर आम्ही ज्या रस्त्याने उटीहून मुन्नारला आलो त्याच रस्त्याने आम्हाला पुन्हा माघारी जावं लागलं असतं. पण आमचा प्लान काहीसा वेगळा असल्याने उदमलपेठच्या चौकातून आतल्या रस्त्याला वळत सेंजेरीमलाई मार्गे कोइम्बतुरच्या दिशेने रवाना झालो. हा रस्ता बऱ्यापैकी मोठा होता आणि निर्जन नव्हता. आसपास असंख्य गावही होती.

१२ वाजून गेले. जास्तीत जास्त ३ पर्यंत आम्ही कोइम्बतुर आरामात गाठू शकणार होतो. जसं जसं कोइम्बतुर जवळ येऊ लागलं तसं तसं आपण एका महानगरात प्रवेश करत असल्याचं जाणवू लागलं. महामार्गावर उड्डाणपूल सुरु झाले, वस्ती वाढली होती. इमारती दिसत होत्या. महामार्गाच्या दोन्ही बाजूस दुकान, हॉटेल्स, रेस्टॉरंटची कमी नव्हती आणि हा बदल दिसणारच होता, कारण दक्षिण भारतातील सर्वात झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असलेल्या कोइम्बतुर मध्ये आम्ही प्रवेश केला होता. भारतातील सर्वात मोठी टेक्सटाईल इंडस्ट्री असल्याने टेक्सटाईल सिटी ऑफ इंडीया किंवा मॅनचेस्टर ऑफ साउथ इंडिया म्हणून भारतभर कोइम्बतुरचा बोलबाला आहे. पुढे शहरही मागे पडलं आणि आम्ही हळूहळू आमच्या डेस्टीनेशनच्या जवळ जाऊ लागलो.



तर आता सांगतो थेट उटीला परत जाण्याचं सोडून असं आडवाटेने कोइम्बतुरला जाण्याचं काय प्रयोजन होतं ते! अनेकांनी मगाशीच ओळखलं देखील असेल. कारण सध्या कोइम्बतुर हे पर्यटकांत जास्त प्रसिद्ध झालं आहे ते एकाच ठिकाणामुळे. ते ठिकाण म्हणजे ईशा फाउंडेशन तर्फे उभारण्यात आलेला आदीयोगी स्टॅच्यु.

२ वाजण्याच्या आसपास रणरणत्या कडक उन्हात आम्ही कोइम्बतुर मध्ये प्रवेश केला होता. आदीयोगी स्टॅच्यु हा पूलकांड नावाच्या एका ठिकाणाजवळ स्थित आहे आणि हे ठिकाण




कोइम्बतुर वरून अजून ५० किलोमीटर अंतरावर आहे. पण रस्ता अगदी लोण्यासारखा गुळगुळीत असल्याने अगदी अर्ध्या तासात हे अंतर पार करता येतं. आम्ही जसे नरसीपुरम रोड पकडून काही किलोमीटर पुढे आलो असूच की आदीयोगींचे रस्त्याच्या दुतर्फा लावलेलं बॅनर दिसण्यास सुरुवात झाली. दर ठराविक अंतराने हे बॅनर दिसायचे आणि त्यावर किती किलोमीटर उरलेले आहे हे दिसताच मन अजून उचंबळून यायचं. पुन्हा एकदा डोंगराळ भाग पडून सपाटी सुरु झाल्याने माडांच्या झाडांची मांदियाळी दिसायला देखील सुरुवात झाली होती.

मी कोणी मोठा शंकरभक्त नाही. पण माहित नाही का पुतळा तयार होत असल्यापासून मला इथे यायचं होतं. मी इतकं खात्रीने सांगू शकतो की मी एकंदरीत मूर्तीच्या प्रेमात आहे. म्हणजे मला काहीही करून उघड्या डोळ्यांनी ही मूर्ती भरभरून पहायची होती आणि आज बकेट लिस्ट मधलं ठिकाण म्हणा की स्वप्न म्हणा ते पूर्ण होणार होतं, त्यामुळे साहजिकच हृदयाचे ठोके वाढत होते.

अखेर ठिकाण १ किलोमीटर वर येऊन ठेपल्याचा बॅनर दिसला आणि अंगात एक वेगळाच उत्साह संचारला. ईशा फाउंडेशनच्या गेट जवळ आम्ही पोहोचलो आणि तिथूनच आदी योगींचे लांबून दर्शन झाले. वाह! पहिली नजर पडताच जी भावना मनात उचंबळून आली ती अवर्णनीय होती. आतापर्यंतच्या संपूर्ण ट्रीपने मनात जागा केली होतीच पण या एका क्षणाने काळजाचा ठाव घेतला.




ईशा फाउंडेशनच्या गेटमधून गाड्या आत नेता येतात. आतमध्ये प्रशस्त पार्किंग आहे.




आणि समोर कुठूनही पाहिलं तरी दिसत असते ती कृष्णवर्णीय भगवान भोलेनाथाची मूर्ती.

गिनीज बुक मध्ये नोंद असलेली उंच आणि महाप्रचंड अशी ही 'आदियोगी'ची मूर्ती! शंकराला योग प्रवर्तक म्हटले गेले आहे आणि त्याच आधारावर या मूर्तीचे नाव आदियोगी म्हणजेच प्रथम योगी असे ठेवले गेले. ११२ फुटी (३४ मीटर) उंच अशी ही मूर्ती तब्बल ५०० टन स्टीलपासून बनलेली आहे. या मूर्तीची डिजाईन तयार करायला दोन वर्षे आणि मूर्ती अस्तित्वात आणायला आठ महिन्यांचा प्रचंड मोठा कालावधी गेला. या मूर्तीच्या ठराविक निर्माणामागे काही वैशिष्ट्ये सुद्धा दडलेली आहेत. ११२ फुटांची उंची म्हणजे आदियोगींनी मुक्ती मिळवण्यासाठी सांगितलेल्या ११२ मार्गांचे प्रतिक आहे.





हि मूर्ती तामिळनाडू आणि केरळाच्या सीमेवर स्थित असलेल्या पश्चिम घाटातील वेल्लियनगिरी पर्वतरांगेच्या पायथ्याशीच उभारण्यामागे देखील एक कारण आहे. दक्षिणात्य संस्कृतीमधील पुराणात वेल्लियनगिरीचा पवित्र स्थान म्हणून उल्लेख आहे. प्राचीन दक्षिण भारतात एक स्त्री रहायची. तिला भगवान शंकराचं वेड होतं. त्यांच्याशी विवाह करण्याची तिची इच्छा होती. एक दिवस तिने

प्रण केला की आज सूर्यास्तापर्यंत माझा शंकराशी विवाह झाला नाही तर मी प्राण त्याग करेन. शंकरांना हे कळताच ते तत्काळ तिच्याकडे जाण्यासाठी रवाना झाले. पण स्वर्गातील इतर देवांना हे रुचले नाही. भगवान शंकर दक्षिण भारतात गेले तर परत येणार नाहीत असा त्यांचा समज झाला आणि त्यांनी शंकरांना अडवायला सुरुवात केली. पण शंकर काही ऐकेनात. त्या स्त्री जवळ ते पोहोचणारच होते की इतर देवांनी एक खोटा सूर्यास्त निर्माण केला आणि शंकरांना आपण आपल्या भक्ताची इच्छा पूर्ण करू शकलो नाही याचे अतीव दुःख झाले आणि त्यांनी पुन्हा परतीचा मार्ग धरला. इकडे त्या स्त्रीने प्राण सोडले आणि तीच जागा आज 'कन्याकुमारी' म्हणून ओळखली जाते. चिडलेल्या भगवान शंकरांनी परतीच्या मार्गात एका पर्वतावर वास्तव्य केले आणि तोच हा वेल्लियनगिरी पर्वत होय. म्हणून या पर्वताला 'दक्षिणेचे कैलास' देखील म्हटले जाते आणि आज त्याच्याच पायथ्याशी भक्तांना दर्शन देतायत आदियोगी.




वेल्लियनगिरी पर्वतरांगेचे सात टप्पे आहेत. हा पर्वत चढताना आपण सात पर्वत चढल्याचा भास होतो. अगदी शेवटच्या शिखरावर नैसर्गिक रित्या तयार झालेले एक मंदिर असून त्यात एक छोटी पिंड आहे. ही अतिशय पवित्र जागा असल्याचे स्थानिक सांगतात. स्थानिकांच्या मते हा फक्त पर्वत नाही तर यात अनेक प्राचीन आणि रहस्यमय खुणा दडलेल्या आहेत. तर भगवान शंकराच्या पदस्पर्शाने पावन झालेली जागा म्हणून मूर्तीची स्थापना इथेच करण्यात आली.

तुम्ही स्वतःला कितीही नास्तिक म्हणवा पण आदियोगींच्या मूर्तीसमोर जाताच मनातील सारे मानाभिमान, स्वाभिमान गळून पडतात. नजर एकटक मूर्तीवर खिळली जाते. एक एक सेकंद हा भल्या मोठ्या काळासारखा वाटू लागतो. आपलं अस्तित्व आपण आदियोगी मध्ये जणू हरवत चालल्याचा भास होतो. नुसतं मूर्तीकडे पाहत राहावं हीच इच्छा होते. आता ही जादू नक्की मूर्तीची आहे तिथल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणाची आहे की कोणत्या पॉझिटिव्ह एनर्जीची आहे ते सांगता येणार नाही.



“जग्गी वासुदेव” संस्थापक असलेल्या “ईशा फाउंडेशन” तर्फे ही मूर्ती आणि एक छोटेखानी मंदिर स्थापन करण्यात आले आहे.

जग्गी वासुदेवांबद्दल अनेकांची मतमतांतरे असू शकतात. पण त्यांनी तिथे शिवभक्तांसाठी जी काही वातावरण निर्मिती आणि व्यवस्था केली आहे ती वाखाणण्याजोगी आहे.




कोइम्बतुरच्या त्या रणरणत्या उन्हात, आजूबाजूला पर्यटकांचा सतत गोंगाट असून देखील पार्श्वसंगीताप्रमाणे सुरु असणाऱ्या शिवनामावर लक्ष केंद्रित करून ध्यान लावून बसलेल्या परदेशी नागरिक, सुशिक्षित तरुण, तरुणींचा तर इथे मोठा राबता दिसतो. कधी तामिळनाडूला गेलात तर हे ठिकाण अजिबात चुकवू नका. तुम्ही शंकराचे भक्त असाल तर सणाच्या काळात आवर्जून भेट द्या, पण ही जागा शांतपणे अनुभवायची असेल तर गर्दी नसताना जाणे उत्तम, कारण तेव्हाच आदीयोगींना अगदी जवळून अनुभवता येते.

एव्हाना ३ ते ४ असा एक तास आदीयोगींच्या सानिध्यात व्यतीत केला होता. कितीही पाहिलं तरी मन भरत नव्हतं आणि निघावंस वाटत नव्हतं, पण हो प्रवास हा सुद्धा आयुष्यासारखा असतो. एका ठिकाणी थांबलं तर त्यातील गोडी निघून जाते. म्हणून पुढे जात राहायला हवं.

मुन्नार ते कोइम्बतुर अस प्रवासाचा एक टप्पा पूर्ण केल्यावर आता पुढचा टप्पा होता कोइम्बतुर ते उटी हा ११० किलोमीटरचा टप्पा, त्यासाठीही गुगल मॅप्स दाखवत होतं ३ तासाची वेळ. पहिले ६० किलोमीटर रस्ता अगदी

सरळ होता, आणि पुढचे ४० किलोमीटर होते उटीचे घाट रस्ते. ४ ला निघालो तर अंधार पडेपर्यंत म्हणजे ७ पर्यंत पोहचू असा विचार करून जास्त वेळ न दवडता लागलीच निघालो.

थोंडामुथूर, बिलीची, करमाडाई, मेट्टूपलयम या मार्गाने कोइम्बतुरची जीवनशैली पाहत आणि दाटीवाटीच्या गर्दीचा अनुभव घेत आमचा प्रवास सुरु होता. जस जसे आम्ही पुढे जात होतो तस तसे समोर दिसणारे निलगिरी पर्वतरांगेतील डोंगर अधिक स्पष्ट दिसू लागले. पुन्हा एकदा सपाटी सोडून आम्ही गाठणार होतो उंची, पुन्हा एकदा कोइम्बतुरचं रणरणतं उन मागे पडून सुरु होणार होती उटीची गुलाबी थंडी.

जस जसे आम्ही मेट्टूपलयम मागे टाकत निलगिरीच्या पायथ्याला पोहोचलो तस तसा वातावरणातील हा फरक जाणवू लागला. रस्त्याच्या दुतर्फा झाडांची दाटी वाढली होती. कोइम्बतुरचं ओकंबोकं रूप मागे पडलं होतं. अवघ्या तासाभराच्या आत आम्ही ६० किलोमीटरचा रस्ता पार केला. पण आता ह्या पुढचे ४०-५० किलोमीटरसाठी आम्हाला २ तास लागणार होते. घाट सुरु होण्यापूर्वी छोटासा ब्रेक घेण्याचं ठरवलं. उटी मध्ये मुक्कामाची अजूनही काही सोय केली नव्हती, म्हणून पटकन ते काम उरकून घेतलं आणि या वेळेला मुन्नार सारखं शहराच्या बाहेरचा मुक्काम न शोधता, उटी शहरातीलच हॉटेल शोधलं. त्यासाठी आमची अधिक पैसे द्यायची देखील तयारी होती. पण सुदैवाने उटी मध्ये हा पर्यटनचा काळ नसल्याने अगदी बजेट मध्ये एक मस्त स्टे मिळाला. बस्स मग काय, शरीर थकलेलं तर होतचं आणि भूकही लागली होती, त्यामुळे पटकन हॉटेल गाठून, फ्रेश होऊन सटकन जेवायला निघायचं हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलं.



पुन्हा एकदा हेअर पिन बेन्डस आमची परीक्षा पाहायला सज्ज होते. पण आता त्यांच्यावर खेळायचं कसब आम्ही दोन दिवसांत शिकलो होतो. त्यामुळे या वेळेस मनात भीती न बाळगता हेअर पिन बेन्डचा थरार मनमुराद लुटला. जस जशी उंची गाठत होतो तसं तसं उंचावरून अधिक खोलात जात असलेलं मेट्टूपलयम शहर आणि त्या पलीकडील कोइम्बतुर नजरेस पडत होतं आणि दूर कुठेतरी तिकडे मुन्नारचा प्रदेश भास्कराच्या साथीने विसावत होता.

दक्षिण भारताची ही बाजू नजरेत साठवण्याची ही आमची शेवटची संधी होती, कारण गेले २ दिवस अनुभवलेले प्रदेश पुन्हा कधी दिसतील न दिसतील याची शाश्वती नव्हती आणि हाच तो क्षण होता जेव्हा जाणीव झाली की अरेच्चा ५ दिवस संपले सुद्धा! किती भुर्रकन निघून गेले. मनात थोडी चलबिचलही सुरु होती. पण मगाशी म्हटलं तसं प्रवास आहे तो सुरुच राहिला पाहिजे.

अखेर सायंकाळी बरोबर ७ वाजता हॉटेल गाठलं. थंडी भयंकर प्रमाणात वाढली होती. एवढी थंडी तर मुन्नारला पण नव्हती. पण इथे अक्षरशः हिमाचल प्रदेशला असल्या सारखा फील येत होता. कसे बसे फ्रेश होऊन बाहेर निघालो. चालतच जवळपास जे पहिलं रेस्टॉरंट मिळेल त्यात ठाण मांडण्याचा प्लान होता. अपेक्षेप्रमाणे आमच्या या प्लानने आम्हाला तोंडावर पाडलं नाही आणि हॉटेल पासून १० मिनिटांच्या अंतरावर एक घरगुती खाणावळ असलेलं रेस्टॉरंट दिसलं. आमची जेवायची वेळ आली की मनात अक्षरशः धडकी भरायची. कारण समोरच्याला समजावणं म्हणजे आता दिव्य काम वाटू लागलं होतं, पण सुदैवाने इथे इंग्रजीने तारलं.

मुन्नार मध्ये नॉनव्हेजच्या नावाखाली बिर्याणी ट्राय करणं जरा अंगलट आलं होतं. ती बिर्याणी इतकीही वाईट नव्हती पण आपल्याला नॉनव्हेज मध्ये गोड चव म्हटली की प्रॉब्लेम होतो इतकंच. त्यामुळे इथे गप्प नेहमीप्रमाणे लोकल व्हेज थाळी मागवली. तामिळी परंपरेप्रमाणे स्वच्छ अशा केळीच्या पानात पूर्ण थाळी वाढली गेली.



इथे मी माझी अजून एक इच्छा पूर्ण करायचं ठरवलं. म्हैसूर वरुन निघाल्यावर आम्ही व्हेज थाळी खाल्ली ती ताटात वाढण्यात आली होती, पण इथे जशी हवी तशी मस्त केळीच्या पानात वाढली होती आणि पदार्थही थोडे वेगळे होते. भाजीचे दोन प्रकारे होते. सोबतीला कुटू (डाळीचा एक प्रकार), भात, टोमेटो रसम, सांबार, पापड आणि ताक होतंच. बहुधा देवाला आमची दया आली आणि इथे आम्हाला न मागता ताक मिळालं.

मी वर सांगितलं की मी साउथ मुव्हीज खूप पाहतो. तर त्यात बऱ्याच चित्रपटात ते अगदी हाताचा पूर्ण पंजा बुडवून मिटक्या मारत खातात हे मी पाहिलं होतं. आता त्या लोकांच्या चेहऱ्यावर खाताना एवढा आनंद दिसतो म्हणजे चांगलंच लागत असेल हा विचार करून माझी अतृप्त इच्छा पूर्ण करण्यासाठीही मी सुद्धा कुट्टू, भात, भाजी, रसम छान पैकी मिक्स केलं आणि मस्तपैकी अख्खा हात बुडवून भलामोठा घास तोंडात टाकला. अक्षरशः

आपणही साउथ इंडियन झाल्याची फिलिंग आली. अक्षरश: त्यांच्या स्टाईलमध्ये शेवटला बोटं तोंडात टाकून अगदी चोपून सुद्धा काढली.

बरं झालं मला हे इथेच करून पाहायला मिळालं, कारण समोर जर आई असती तर कधी हे करायला मिळालं नसतं, कारण तिला अख्खा पंजा घाण खाणारी माणसं बिलकुल आवडत नाही. असो, तर अश्याप्रकारे पुन्हा एकदा छान पैकी जेवण करून कुडकुडत हॉटेलात परत आलो आणि सकाळी उटून उटी भटकण्याची स्वप्न पाहत पुन्हा निद्राधीन झालो.


**उटी भ्रमंती (दिनांक 21 जानेवारी)**

## ....आणि उटी कायमचं मनात वसलं!

सकाळी लवकर उठून सगळं काही फिरायचं असं आम्ही नेहमीप्रमाणे ठरवलं आणि नेहमीप्रमाणेच आमचा तो प्लान फ्लॉप झाला. इथे आमच्या आळसाला सोबत मिळाली उटीच्या कुडकुडणाऱ्या थंडीची. मग काय ७ ला निघू म्हणणारे आम्ही १२ च्या आसपास निघालो. इथे येण्याच्या आधीपासून आम्हाला एक भीती होती की आमच्या गाड्या कश्या परफॉर्मन्स देतील, काही प्रॉब्लेम तर होणार नाही ना. सुदैवाने टायर मधील हवा जाणे, चैन ल्युब करायला लागणे आणि इंजिन ऑईल बदलणे या छोट्या मोठ्या गोष्टींशिवाय बाईक्सनी अजून तरी कोणतेही मोठे काम काढले नाही. पण उटीच्या थंडीत बाईक्स गळपटणार असं वाटलं. इतक्या थंडीत गाडी जास्त वेळ बंद स्थिती उभी असल्याने इंजिन थंड पडतं आणि बाईक सुरु व्हायला वेळ घेते. कधी कधी लगेच सुरु होते पण रेस सोडते. तर कधी कधी कधी नुसते फुत्कार सोडते.


महेंद्रच्या बाईक मध्ये फ्युल इंजेक्शन सिस्टम असल्याने त्याच्या बाईकने ५ मिनिटात सूरु होत 'अभी मैं जिंदा हुं" चा नारा दिला. पण माझ्या युनिकॉर्नचा काही केल्या जिवंत होण्याचा मूड नव्हता. स्टार्टरने सुरू होत नाही तर आता उरला किकचा पर्याय! अश्याने गाडी चालू झालीच पाहिजे होती नाहीतर आज महेंद्रच्या जिक्सर वरच डबल

सीट उटीची सफर करावी लागणार होती. मात्र ४-५ किक मध्ये तिचा गेलेला जीव परत आला आणि आमची स्वारी निघाली उटी भटकायला.



उटी हे तसं छोट शहर. मुन्नार सारखंच. तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल पण या शहराचं अधिकृत नाव उटी नाही. अधिकृत नाव आहे उदगमंडलम! आपण याला उटी असंच म्हणू. निलगिरी पर्वतरांगेत वसलेल्या अनेक छोट्या मोठ्या हिलस्टेशन्सपैकीच सर्वात प्रसिद्ध असं हे हिलस्टेशन. दिवसभर इथे असतं फक्त आणि फक्त थंड वातावरण, कारण ते वसलेलंच आहे ७३५० फुटांवर. इतकं थंड वातावरण, निसर्गाने मुक्त हस्ताने केलेली निसर्गाची उधळण आणि सगळं कसं आरामात असल्याने हे ठिकाण म्हणजे हनिमून स्पॉटला साजेसं आहे.

आपलं महाबळेश्वर, लोणावळा कसं? अगदी तसं. त्यामुळे भटक्यांसाठी इथे जास्त काही नाही. उटीमध्ये पाहण्यासारखी ठिकाणंही फार कमी आहेत, जी आहेत ती तुम्ही एक दिवसात आरामात पाहू शकता, पण उटीच्या आसपास काही जागा आहेत जसं की कुन्नूर वगैरे. ती सगळी ठिकाणं पहायची म्हटली तरी किमान २ दिवस मुकाम हवा. आमचा मुक्काम एकच दिवस होता. त्यामुळे फक्त उटी फिरायचं होतं आणि छानपैकी खाऊन पिऊन हॉटेलात जाऊन आराम करायचा होता.



आम्ही सगळ्यात पहिली कूच केली उटी बोट हाउसकडे! जे अवघं ५-६ किलोमीटरवर होतं. इथे आम्हाला मुन्नार सारखे २०-३० किलोमीटर लांब लांब जायची गरज नव्हती. सगळी ठिकाणे एकूण ३०-५० किलोमीटरच्या

परिघात वसलेली! पण एवढं फिरायला सुद्धा संध्याकाळ होणार होती. जी जी प्रसिद्ध ठिकाण आहेत ती पहिली पाहून घेऊ असं म्हणून भर दुपारी जाऊन पोहोचलो उटी बोट हाउसला. उटी लेक आणि उटी बोट हाउस हे एकच.



उटीचं हे बोट हाउस पाहिलं की काश्मीरमधल्या बोट हाउसची आठवण येते. इथे कमी फक्त बर्फाची आहे नाहीतर अगदी काश्मीरच वाटलं असतं. समोर दूर वर पसरलेला तलाव. काठावर गर्द वनराई, पाण्यावर अगदी हळुवार डोलणाऱ्या बोटी आणि दुपार असूनही अंग शहारून सोडणारं थंड वातावरण!

१८२४ साली हा तलाव कृत्रिम पद्धतीने बांधण्यात आला. इतक्या उंचावर प्रचंड मोठा नैसर्गिक तलाव निर्माण होण्यास इथली भौगोलिक स्थिती पुरेशी नाही म्हणून निलगिरी पर्वत रांगेतून वाहुन येणारे पाणी अडवून हा तलाव तयार केला गेला.



इथे करण्यासाठी एकच गोष्ट म्हणजे बोट हाउस राईड! पण आपण काही त्याच्या वाट्याला  जाणार नव्हतो. महागडी बोट हाउस राईड घ्यायची, ती पण मित्रासोबत?? छे..दोघांनाही हे पटतं नव्हतं. त्यामुळे फक्त मनसोक्त फोटोज काढून बोट हाउस ला रामराम ठोकला. आता तुम्ही म्हणाल करायची जी मुख्य गोष्ट आहे ती करायची नव्हती तर गेलात कशाला? तर आलोच आहोत तर भेट द्यावी हे एक कारण होतं, पण अजून एक कारण होतं ते म्हणजे बोट हाउसच्या आवारात भरणारं छोटं मार्केट! फॅन्सी वस्तू, खेळणी, इमिटेशन ज्वेलरी यांची

या मार्केटमध्ये नुसती रेलचेल आहे. उटीला आलात आणि ओळखीतल्या सगळ्यांसाठी काही न काही भेटवस्तू घ्यायची असेल तर इथे तुमच्यासाठी भरपूर स्वस्तात मस्त पर्याय उपलब्ध आहेत.




उटी बोट हाउसच्या बाजूलाच आहे मिनी ट्रेन स्टेशन! हो आपल्या माथेरानला आहे अगदी तसचं काहीसं.

पण थांबा तुम्ही चित्रपटात उटीची मिनी ट्रेन वगैरे पहिली असेल तर ती ही नाही. ही आहे मिनी ट्रेनचीही मिनी टॉय ट्रेन! अगदी १ किलोमीटर अंतरात फिरवून आणणारी. लहान मुलांसाठी परफेक्ट स्पॉट!





तर उटी बोट हाउस नंतरचा स्पॉट होता बोट हाउसच्या समोरचं 'द थ्रेड गार्डन. हे आहे उटी मधील सर्वात अनोखं ठिकाण आणि जगातील पहिलं धागा गार्डन! अँथोनी जोसेफ या अवलियाने हाताच्या सहाय्याने धाग्याने विणलेल्या कलाकृती इथे पाहायला मिळतात. मुख्य म्हणजे या विणताना त्याने सुईचा वापर केलेला नाही हे विशेष! म्हणजे विचार करा काय लेव्हलचं टॅलेंट आहे! खेदाची गोष्ट ही की आत फोटोग्राफीस मनाई आहे. पण एकप्रकारे ही बंदी योग्य वाटते. जर सगळं काही ऑनलाईन पाहण्यास उपलब्ध झालं तर त्या कलाकाराची मेहनत पाहायला येणार तरी कोण?

अशी ही २ ठिकाण फिरत आम्हाला २ तास कधी होऊन गेले कळलेच नाही आणि आता आम्ही निघालो उटीतील सर्वात मुख्य ठिकाणी अर्थात उदगमंडलम रेलवे स्टेशनला!

हेच ते मुख्य मिनी ट्रेन स्टेशन आणि इथूनच धावते मुख्य टॉय ट्रेन उदगमंडलम ते कुन्नूर पर्यंत! आम्हाला हॉटेल मालकाने उटीच्या मुख्य मिनी ट्रेनची सफर करायची असेल तर किमान अर्धा तास आधी जाऊन तिकीट काढा असे सांगितले होते. पण त्याने आम्हाला वेळ सांगतली नव्हती, न आम्हीही ती जाणून घेण्याचे कष्ट केले. दिवसभर फेऱ्या असतील असे समजून आम्ही २:३० वाजता च्या आसपास पोहोचलो आणि समजले की २ वाजून १० मिनिटांची शेवटची ट्रेन गेली आता पुढची ट्रेन होती संध्याकाळी ५ वाजून ४० मिनिटांची, पण आम्हाला कुन्नूरहून येताना कोणतीही ट्रेन मिळणार नव्हती, कारण कुन्नूरहून उदगमंडलमला येणारी शेवटची ट्रेन ही ४ च्या आसपास होती.




याचा अर्थ अगदी काही वेळासाठी आम्ही आमच्या सोयीची ट्रेन चुकवली. त्यासाठी दोघांनीही स्वत:ला ढीगभर शिव्या घातल्या. आम्ही पुढील ट्रेनने कुन्नूरला जाऊन येताना एखादे वाहन पकडून आलो असतो. पण मग आमचा सगळा वेळ यातच गेला असता आणि उटीच्या रस्त्यावर बाईक चालवण्याची हौस आणि उरलेली ठिकाणे पाहण्याची इच्छा यांवर पाणी सोडावे लागणार होते. पण नंतर असे कळले ही स्टेशन फिरण्यासाठी ट्रेन तिकीट हवे असे काही नाही. बस्स मग काय, पुन्हा एकदा कोमेजलेल्या आमच्या चेहऱ्यांवर हास्य फुलले आणि टॉय ट्रेनची सफर नशिबात नसली तरी ऐतिहासिक उदगमंडलम स्टेशन आतून पाहता येणार होतं.




उदगमंडलं स्टेशन हे जागतिक वारसा म्हणून घोषित झालेल्या निलगिरी माउंटन रेल्वेचा भाग आहे. भारतात असा दर्जा याआधी दार्जीलिंग हिमालयान रेल्वेलाही मिळालेला आहे. निलगिरी माउंटन रेल्वे १९०८ साली ब्रिटिशांनी सुरु

केली होती आणि आजही तत्कालीन पद्धतीनेच वाफेच्या इंजिनवर येथे रेल्वे चालवल्या जातात. स्टेशनच्या समोरच आपल्याला मूळ रेल्वेची प्रतिकृतीही पाहायला मिळते.



हि रेल्वे फक्त उदगमंडलम ते कुन्नूर अशी धावत नाही तर पुढे ती थेट पायथ्याशी असलेल्या मेट्टूपलयम पर्यंत धावते. पुढे मेट्टूपलयमची रेल्वे लाईन थेट कोइम्बतूर जंक्शन पर्यंत गेली आहे. स्टेशन मध्येच या रेल्वे लाईनचा ऐतिहासिक वारसा जपून ठेवणारे एक संग्रहालय आहे. ज्यात उदगमंडलमचा सगळा इतिहास उलगडतो.




भारतात दार्जीलिंग, शिमला, माथेरान आणि उदगमंडलम सारख्या हातावर मोजण्याइतक्या काही टॉय रेल्वेज आहेत ज्यांच्यात आयुष्यात एकदा तरी सफर प्रत्येकाने नक्कीच करावी. आमची सफर थोडक्यात हुकली पण पुन्हा येऊन ट्रेनमधून उटीचं सौंदर्य अनुभवायचंच असं मनाशी पक्का करून आम्ही कूच केली पुढच्या ठिकाणाकडे.

जसं मुन्नार मध्ये सह्याद्रीतील सर्वात उंच अनामुदी शिखर आहे तसं उटीमध्ये आहे सह्याद्रीतील सर्वात उंच असं चौथ्या क्रमांकाचं दोडाबेट्टा शिखर. कानडी भाषेतून या शिखराला दोडाबेट्टा हे नाव पडलं आहे. दोडा म्हणजे मोठा, बेट्टा म्हणजे डोंगर वा टेकडी. म्हणजेच मोठा डोंगर! उटी आणि आसपासच्या निलगिरी पर्वत रांगेतील हे

सर्वात उंच शिखर असल्याने आणि इथून पायथ्याशी पहुडलेल्या तामिळनाडूचं आगळं वेगळं सौंदर्य दिसत असल्याने उटीत येणारा माणूस हे ठिकाण चुकवत नाही. दोडाबेट्टा शिखराच्या माथ्यावर पोहोचणं अजिबात कठीण नाही. थेट गाडी रस्ता वर पर्यंत जातो. पण रस्ता फारच अरुंद आणि काहीसा धोकादायक आहे. जस जशी आपण उंची गाठतो तस तशी इथे थंडी जास्तच असल्याचंही जाणवू लागतं.




आम्हाला वाटलं होतं वर एखादं मोकळं पठार असेल, भन्नाट वारा असेल, पण कसलं काय इथे चक्क छोटेखानी बाजर भरला होता. गर्दीसुद्धा लक्षणीय होती. पण वरून नजरेत भरणारं सभोवतालचं दृश्य भन्नाट होतं. उटीसारख्या उंच ठिकाणी असणारी सावली आणि खाली कोइम्बतुरच्या प्रदेशात असणारं उन चक्क डोळ्यांनी ओळखता येत होतं. निसर्गाच्या प्रकाशाचा हा अद्भुत खेळ डोळ्यातच साठवण्यासारखा होता, कारण मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपले जाणारे फोटो त्या दृश्याला तितकासा न्याय देत नव्हते. इथेही एक मनोरा आहे जेथून एका मोठ्या टेलिस्कोप मधून तुम्ही लांबच दृश्य अधिक चांगल्या पद्धतीने निरखू शकता. मात्र तिथे असलेली गर्दी पाहून आपल्या डोळ्यांना जिथवरचं दिसतंय तेवढं सुद्धा पुरेसं आहे असं वाटलं.



इथे म्हणा किंवा पूर्ण उटीमध्ये म्हणा मला सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे स्वच्छता. दोडाबेट्टा सारख्या ठिकाणी इतक्या गर्दीतही कचरा अजीबात नव्हता. लोकंही ठिकठिकाणी ठेवलेल्या कचराकुंडीतच कचरा टाकत होती. याचं श्रेय येथील प्रशासनाला सुद्धा द्यावच लागेल, कारण ठिकठिकाणी दंड वसूल करण्याचे फलक लावले होते. तैनात असणारे स्वच्छता कर्मचारीही सर्वांवर नजर ठेवून आपलं काम

प्रामाणिकपणे करत होते. एकंदरीत दक्षिण भारतीय लोकं आपली ठिकाणं व आपला वारसा जपण्यात काटेकोर आहेत हे स्वतःच्या डोळ्यांनी अनुभवलं आणि आपल्याकडेही हा गुण प्रत्येकाच्या मनात लवकरात लवकर रुजू दे हीच प्रार्थना केली.




उटीच्या मुख्य बाजारात जाण्यासाठी आता वेळ नव्हता आणि दोडाबेट्टाला आयतं मार्केट समोर दिसल्याने इथेच काही शॉपिंग करु असं ठरलं. कारण आमची राईड आता हळूहळू संपण्याच्या मार्गावर होती. हंपीला खरेदीसाठी काही विशेष असं नाही त्यामुळे जे काही आवडेल ते इथूनच घेऊ असं म्हणून आम्ही खूपच शॉपिंग केली. निलगिरी पर्वतरांग ही औषधी वनस्पतींसाठी प्रसिद्ध आहे त्यामुळे उटीमध्ये किंवा दोडाबेट्टाला वनप्रशासनाच्या औषधालयातून तुम्हाला विविध आजारांवरची गुणकारी औषधं खरेदी करता येतात. सोबतीला थंडीचे स्वेटर्स, जॅकेट्स सुद्धा माफक दरात मिळतात. खवय्यांसाठी तर स्वीट्स, रानमेवा अशा अनेक निलगिरी स्पेशल पदार्थांची रेलचेल आहेच.

उदगमंडलमहून ४ च्या आसपास निघून दोडाबेट्टाला येऊन, इथे सगळं पाहून मग शॉपिंग करेपर्यंत ६ वाजले आणि आमचा दिवस संपला. सूर्यनारायणाच्या परतीच्या प्रवासासोबत आमचाही हॉटेलच्या दिशेने परतीचा प्रवास सुरु झाला. मी २ वर्षांपूर्वी हिमाचलला गेलो होतो तेव्हा धरमशाला हे ठिकाण माझ्या मनात खूप भरलं होतं. छोटेखानी शहर, मुख्य भागात लोकांचा राबता, बाकी सगळीकडे शांतता, अगदीच सुस्त आणि मस्त शहर. एकंदर सगळं पद्धतशीर आणि आरामात! तेव्हा मला कोणी तिथे अगदी पोटापाण्यापुरती पुरेल इतक्या पगारची नोकरी दिली असती तरी मी हसत हसत स्वीकारली असती. पण आज त्या धरमशालाला मागे टाकून उटी माझ्या मनात वसलं होतं.

उटीमध्ये सारं काही धरमशाला सारखंच आहे, पण एका गोष्टीत ते वरचढ आहे ते म्हणजे येथील पायाभूत सुविधा. धरमशाला आणि आसपासच्या प्रदेशात रस्त्यांची अवस्था बिकट आहे. नेटवर्कची समस्या आहे. इतर जगाशी

जोडलेलं राहण्यासाठी आवश्यक सुविधांचा अभाव आहे. दुसरी मुख्य गोष्ट म्हणजे तिथे हवामानाचा काही नेम नाही. कधीही तेथील जनजीवन ठप्प होऊ शकतं. उटीमध्ये मात्र त्यामानाने खूप चांगली स्थिती आहे. रस्त्यांची स्तुती तर तुम्ही वाचली आहेच. इथे राहण्याची आणि खाण्यापिण्याची आबाळ नाही. नेटवर्क उत्तम आहे. प्रशासनाचं नियोजन चोख आहे आणि सोबतीला एका भटक्या माणसाची मानसिक भूक भागवणारं अद्भुत निसर्ग सौंदर्य सुद्धा आहे. मी माझ्या मनातील धरमशालाची जागा उटीला देत असतानाच महेंद्रने सुद्धा हाच विषय काढला आणि तो म्हणाला, “काश इथे आयुष्यभर राहायला मिळालं असतं. बस्स कोणी नोकरी दिली तर इथेच राहीन.” दोन भटक्यांच्या मनात एकावेळी एकाच शहराबद्दल समान भावना निर्माण होत असेल तर समजून जा उटी किती स्पेशल आहे.



असो, तर उद्याच्या प्रवासाचा प्लान करत व्हेज थाळीवर भरपेट ताव मारत, पुन्हा एकदा थकून भागून बेडवर आडवे झाल्यावर आमचा उटीमधला दिवस संपला आणि सोबतीला आमच्या साउथ राईडचा उत्तरार्ध सुरु झाला. उद्यापासून पुढचा प्रवास आम्हाला हळूहळू घराच्या दिशेने घेऊन जाणार होता. गेल्या ५ दिवसांनी दिलेले क्षण आता यापुढे कधीच दिसणार नव्हते. हळूच राईडच्या आधीचे दिवस डोळ्यांपुढे आले. आपल्याने ही महाराईड या 150CC बाईक्सवरुन होईल की नाही हा विचार करणारी आम्ही दोन पोर कोणत्याही संकटात न सापडता चक्क २,००० पेक्षा जास्त किलोमीटर पूर्ण करून उटीपर्यंत पोहोचलो होतो. बाहेर उभ्या असलेल्या आमच्या बाईक्सनीही आम्हाला अविश्वसनीय साथ दिली होती. आम्ही त्यांच्यावर विश्वास दाखवला आणि तो त्यांनी सार्थ ठरवला होता.

चौथा टप्पा – उटी ते हंपी (दिनांक 22 जानेवारी)

## अखेर बाईकने दगा दिलाच!

आमच्या पूर्ण साऊथ राईडतील किलोमीटरच्या बाबतीत हा तिसरा सगळ्यात मोठा असा टप्पा होता. पहिला सगळ्यात मोठा टप्पा होता मुंबई ते म्हैसूर १००० किलोमीटर पेक्षा जास्त, दुसरा टप्पा होता हंपी ते मुंबई ७०० किलोमीटर पेक्षा जास्त, जो की अगदी शेवटचा टप्पा असणार होता आणि आता त्या आधी तिसरा टप्पा म्हणजे उटी ते हंपी हे ६०० किलोमीटर पेक्षा जास्तचे अंतर! ज्यासाठी गुगल मॅप्स अंदाजे १२ तास दाखवत होतं. आम्ही आदल्या रात्री ठरवलं होतं की ७ वाजता निघायचं आणि अहो आश्चर्यम आम्ही दोघेही सकाळी ६:३० वाजताच बाईक्सवर सामान सेट करत होतो.

पहिल्यांदा ह्या राईडला आम्ही ठरवल्या प्रमाणे उठलो होतो. अर्थात काल दिवसभर जास्त दगदग झाली नाही आणि रात्री लवकर झोपीही गेलो, त्यामुळे वेळेत झोप पूर्ण करून उठता आलं. बाहेर अगदीच कडाक्याची थंडी होती. तोंडातून वाफा मारत होत्या आणि या अशा थंडीत उघड्या हातांनी सामान सेट करताना अक्षरशः हात लुळे पांगळे झाले होते. बंजी कॉर्ड घट्ट धरून बांधताना बोटांनी जे अत्याचार सोसले ते त्यांनाच माहित!

कधी एकदा ग्लव्हज घालून इथून निघतोय असं झालं. चहा प्यावासा वाटत होता पण म्हटलं जरा पुढे जाऊन एखाद्या टपरी वरचा चहा पिऊ. हॉटेल मधला चहा महेंद्र आणि माझ्या, आम्हा दोघांच्या मते पांचटच! निघायची वेळ झाली. सामान सेट करण्याआधी थंड पडलेल्या गाड्या सुरु करून पाहिल्या. काल सकाळ सारखा माझ्या गाडीने आज दगा दिला नव्हता. त्यामुळे मी समाधानी होतो. ऑल सेट झाल्यावर गाड्या बाहेर काढल्या. हॉटेल मालकाचा निरोप घेतला.

हॉटेलच्या बाहेर पडताच २००-३०० मीटरचा एक मोठा चढ होता जो पुढे मुख्य रस्त्याला जाऊन मिळायचा आणि तिथूनच पुढे आम्हाला हंपीची वाट धरायची होती. गाड्या सुरु केल्या. थ्रोटल वर जोर दिला. पहिला गिअर टाकला गाडी पुढे निघाली, दुसरा गिअर टाकला गाडीने वेग घेतला. जसा स्पीड वाढवण्यासाठी तिसरा गिअर

टाकला, गाडीने रेसच सोडून दिली. गाडीच जीवच गेला म्हणा ना. कसं बसं त्या चढावावर गाडीला सावरलं. नंतर लक्षात आलं, थंडी खूप असल्याने इंजिन जास्त वेळ गरम राहत नाहीये आणि फ्युल मिक्श्चर सुद्धा नीट होत नाहीये. या दोघांचं संतुलन राखायचं असले तर मला असा तीव्र चढाव आला की गाडी पहिल्या किंवा दुसऱ्या गिअरमध्येच चालवावी लागणार होती. पण या सोबत एक अजून चिंता वाढली ती म्हणजे उटी मागे पडेपर्यंत आज माझं पेट्रोल चांगलंच जळणार होतं. मात्र दुसरा पर्याय नव्हता. अखेर आमचा प्रवास सुरु झाला हंपीच्या दिशेने. आता निघालो आहोत तर थेट म्हैसूरलाच मुख्य ब्रेक घेऊ असा विचार केला. जे की जवळपास १६० किलोमीटर वर होतं.




आम्ही त्याच रस्त्याने पुन्हा मागे जात होतो ज्या रस्त्याने आम्ही म्हैसूर वरून मुन्नारच्या दिशेने गेलो होतो. सकाळी ७ च्या आसपास आम्ही आमचा मार्ग धरला. थंडी भयंकर होती. अख्खा रस्ता मोकळा  होता. पण स्पीड ४० च्या वर आम्ही घेऊन जाऊ तर शपथ! का म्हणून विचारताय? अहो बाईक जशी ५०, ६०, ७० च्या स्पीडला पोहोचायची, तसं त्या जाड भल्या मोठ्या जॅकेटमध्ये गुरफटलेलं शरीर सुद्धा शहारून जायचं. महेंद्रला एका ठिकाणी थांबून फोन केला. तो मागेच होता. त्याचीही अवस्था माझ्या सारखीच झाली होती. आता जोवर उटी उतरत नाही तोवर काही ही थंडी कमी होणार नाही हे लक्षात आलं.

सकाळी भले थंडीत बाईक चालवण्यास त्रास होत असला तरी एकीकडे ही देखील जाणीव होत होती की धुक्याची दुलई पांघरून गाढ झोपेत असलेले उटी आणि त्याच्या हेअर पिन बेन्डवाल्या थरारक रस्त्यांवर भटकण्याचा हा आमचा शेवटचा अनुभव होता. पुन्हा कधी उटीला येऊ न येऊ माहित नव्हतं आणि आता थेट मुंबईला परतताना लोणावळ्याशिवाय मध्ये घाटरस्ते सापडणार नव्हते. अखेर मनाशी ठरवलं हा टाईम एन्जोय करायचा. थंडीच आहे न, करु सहन, पण मनापासून ही उटीची शेवटची राईड एन्जोय करू.

तो शाहरुखचा चक दे इंडिया मधला डायलॉग आहे ना की “यह बस सत्तर मिनिट है तुम्हारे पास. तुम्हारे जिंदगी के सबसे खास सत्तर मिनिट.” तसं जणू मी स्वत:ला सांगत होतो, “ विशाल पुढचा केवळ अर्धा एक तासच आहे तुझ्याकडे. तुझ्या आयुष्यातील सगळ्यात खास अर्धा एक तास. तो असा जग जसं की जणू ही वेळ पुन्हा कधीच

येणार नाहीये. ही उटीची थंडी, हा थरार, डोळ्यांना सुखावणारं दृश्य, ही नागमोडी वळणे, रस्ते हे सगळं अर्ध्या एक तासात संपणार आहे. घे जगून!"



बस्स मग काय स्वत:ला सज्ज केलं. मोठा श्वास घेतला. बॅकग्राउंडला भटक्यांच्या जमातीत फेमस असणाऱ्या गाण्यांची प्ले लिस्ट लावली आणि निघालो तो शेवटचा एक तास जगायला. ती बोचणारी थंडी आता गोड गुलाबी वाटू लागली. शहारणारं अंग अनोखी धुंदी चढवू लागलं, चेहऱ्यावर वेगळंच स्मित पसरलं. डोळे चहुबाजूंनी भिरभिरु लागले. प्रत्येक वळणानिशी दिसणारं उटीचं बदलतं रुप ते अधाश्यासारखे स्वत:त साठवू लागले.

१०-१५ किलोमीटर पुढे गेल्यावर हळूहळू रस्ता खालच्या दिशेने उतरु लागला आणि उटी मागे पडतंय याची जाणीव झाली. पुढे काही वेळातच शेवटचं वळण घेतल. उटी आता वर त्या निलगिरीच्या रांगेत कुठेतरी गुडूप झालं आणि ज्याने गेला अर्धा एक तास अगदी स्पेशल बनवला होता तो घाट रस्ता सुद्धा शेवटचा अलविदा करत होता. मागे वळून पुन्हा एकदा त्या महाकाय पसरलेल्या निलीगिरी पर्वत रांगेकडे पाहिलं आणि मनातच म्हटलं...उटी आय विल मिस यु....स्पेशली युअर रोड्स!

पुढे जाऊन महेंद्रला फोन केला. तो अंदाजे ४-५ किलोमीटर मागे होता. आतापर्यंतच्या रस्त्यात आम्हाला चहाची टपरी दिसली नव्हती. घड्याळ ८:३० वाजल्याचं सांगत होतं. अजून दीड एक तासात आम्ही म्हैसूर मध्ये प्रवेश करणार होतो. सल्लामसलत करून ठरवलं की आता थेट म्हैसूर मध्येच एखाद्या हॉटेलला थांबू आणि मजबूत नाश्ता करूनच निघू म्हणजे दुपारच्या जेवणाची चिंता नाही.

पुन्हा गाड्यांची चाकं धावू लागली. मुदुमलाई व्याघ्र प्रकल्प मागेच कुठेतरी सुरु झाला होता. पुढे बांदीपूरही आमची पुन्हा वाट पाहत होतं. म्हैसूर वरुन उटीला जाताना दुपारची वेळ असल्याने प्राणी दिसले नव्हते पण आता अगदीच सकाळची वेळ असल्याने आसपास बागडणारे प्राणी दिसतील अशी अशा होती आणि आमची ही आशा फोल ठरली नाही. हरणं, मोरं, काळवीट अगदी स्पष्टपणे बऱ्याच ठिकाणी दिसले. त्यांना जणू बाजूने इतक्या गाड्या जातायत, मनुष्य प्राणी फिरतायत याची फिकीरच नव्हती. "हा आपला एरिया हे" या अविर्भावातच जणू



ते सगळे प्राणी एकोप्याने भटकत होते. या वनक्षेत्रात गाडी बाजूला लावून फोटोग्राफी करण्यास परवानगी नसल्याने एक आठवण म्हणून अगदी काही सेकंदात कॅमेऱ्यात जे टिपता आलं ते टिपलं.

मध्येच रस्त्यात एक सुमो गाडी थांबलेली दिसली. ती थांबली असल्याने मला पुढे जाता येईना, छोटंस ट्राफिक जामच झालं. इतक्यात वन अधिकारी कुठूनशे आले आणि त्यांनी त्या सुमो वाल्याला पिटाळलं, नंतर एका व्यक्तीच्या इंग्रजी संभाषणातून असं कळलं की त्या सुमो वाल्याच्या गाडी समोरून वाघ धावत गेला आणि हा सुमो वाला तो वाघ पुन्हा इथून जाईल म्हणून त्याची वाट पाहत बसला होता. काय कोणाला कसला शौक मध्येच चढेल सांगता येत नाही.

असो, तर अश्याप्रकारे मुदुमलाई पार करून कर्नाटकाच्या बांदीपूर मध्ये प्रवेश केला. महाराष्ट्र मग कर्नाटक मग तामीळनाडू मग केरळ मग पुन्हा तामिळनाडू आणि आता परत कर्नाटक असं दक्षिण भारताचं एक सर्किटच आम्ही पूर्ण केलं होतं. बांदीपूरही मागे पडल्यावर सुरु झाला अगदीच सरळसोट रस्ता. एव्हाना रस्त्याच्या दुतर्फा धावणारे डोंगर, झाडे, ती सगळी वनराजी कोसो दूर निघून गेली होती. दूर दूर पर्यंत फक्त कर्नाटकचं ओकंबोकं रूप दिसत होतं. गेले ५ दिवस नुसती हिरवळ पहायची आणि थंडीत रहायची सवय झालेल्या आमच्या शरीरांनी आणि मनांनी हे भकास रूप आणि उन्हाचा तडाखा सुरु होताच म्हैसूर येण्याआधीच नांगी टाकली.

म्हैसूर  पासून काही किलोमीटर आधीच एक छानसं रेस्टॉरंट पाहून आत गेलो. काहीतरी वेगळं खायला मिळेल अशी आशा होती, पण नाही, इथेही आमच्या नशिबी डोसाच लिहिला होता. गपगुमान तो खाल्ला आणि १२ च्या सुमारास पुन्हा आपली वाट धरली.

म्हैसूर वरून अजून जवळपास ४०० किलोमीटरचा पल्ला बाकी होता. हळूहळू गेलो तरी ८ वाजेपर्यंत पोहचू असा आमचा कयास! वेग तर आम्ही ७०-८० चा धरला होता पण त्या जाडजुड जॅकेटच्या आणि घट्ट हेल्मेटच्या आत उन्हामुळे आमची अवस्था कुकर मध्ये शिजायला ठेवलेल्या भातासारखी झाली होती. वारा भयंकर खूप होता,

पण अंगाला लागेल तर शपथ! त्याच स्थितीत कसाबसा स्वत:वर ताबा ठेवत ३ वाजता टूमकुरु पर्यंत पोहोचलो. हे ते ठिकाण जेथे आमची पुन्हा भेट झाली आमच्या त्या दोस्ताशी ज्याच्याशी आमची ७ दिवसांपूर्वी ताटातूट झाली होती. हो NH 48 अर्थात मुंबई-पुणे/बँगलोर महामार्ग पुन्हा आमचं सारथ्य करण्यास सज्ज होता.

टूमकुरुला पोहोचल्यावर छोटा ब्रेक म्हणून एका झाडाखाली थोडा वेळ थांबलो. थांबण्यामागे अजून एक कारण होतं ते म्हणजे हंपी मधील स्टे आम्ही अजून बुक केला नव्हता. हंपी मध्येच राहिलो तर जास्त वेळ वाया जाणार नाही आणि कमी वेळात खूप काही बघू असा आमचा विचार. पण आमच्या त्या विचारांना सुरुंग लावला फुल्ल असणाऱ्या बुकिंग्जनी! हंपी मधला हा पर्यटनाचा काळ नव्हता तरी हॉटेल्स सगळी फुल का हे कळायला मार्ग नव्हता. आम्ही हार न मानता ज्या पद्धतीने शोधता येईल त्या पद्धतीने हंपीत स्टे शोधला, पण जणू नशिबात नव्हतं. अखेर हंपीच्या आधी १२ किलोमीटर वर असलेल्या होसपेट मध्ये गपगुमान स्टे निवडला. या सगळ्या गोंधळात आमचा छोटा ब्रेक तब्बल १ तासाचा झाला.

हंपीला पोहोचायला अजून ५ तासांचा अवधी होता. थेट आता जितकं नॉनस्टॉप जाता येईल तितकं जाऊ आणि दमलो की ब्रेक घेऊ असं ठरलं. चाकाखाली NH48 किलोमीटर वर असल्यामुळे टेन्शन नव्हतं. अगदीच सुसाट निघालो, ७०-८० ची स्पीड १०० पर्यंत कधी येऊन पोहोचली ते कळलीच नाही. थ्रोटल जो फुल केला होता तो खाली आणलाच नव्हता. हळूहळू स्पीडोमीटरचा काटा ११० वर गेला. अजून थोड्या वेळाने ११५ वर गेला. मी कधीच या स्पीडला युनीकॉर्न टच केली नव्हती. माहित नाही कोणत्या अदृश्य शक्तीकडून ही स्पीड मिळत होती पण बाईक ११० ते १२० च्या स्पीड मध्ये धावू लागली. एवढ्या स्पीडला ही बाईक जास्त वेळ कधीच पळवू नये ही गोष्ट मी या वेगाच्या स्पर्धेत विसरलो आणि शेवटी त्याचा व्हायचा तो परीणाम झाला. जेव्हा माझं लक्ष फ्युल मीटर वर गेलं तेव्हा मला धक्काच बसला. कारण पेट्रोलचा काटा E वर आला होता. पेट्रोल अगदी संपल्यात जमा होतं. मी स्वत:ला जितक्या शिव्या येतात तेवढ्या घातल्या. कारण काही गरज नसताना मी ही माती खाल्ली होती.

या महामार्गावर कित्येक किलोमीटर दूर पेट्रोल पंप नाहीत याची जाणीव झाल्यावर तर जास्तच फाटली. कारण जर गाडी बंद पडली असती तर काय होणार होतं देव जाणे. महेंद्रला खुणेनेच मी पेट्रोल संपल्याच सांगितलं. बाईक रिझर्व्ह वर टाकली आणि जेवढी घेऊन जाता येईल तेवढी घेऊन जात पुढचं पुढे ठरवू असं म्हटलं. पेट्रोल पंप वेळेत मिळाला नसता तर पुढच्या प्लानचा बट्ट्याबोळ होणार होता. कदाचित आज हंपी सुद्धा गाठू शकणार नव्हतो. मगाशी मायलेज हवं म्हणून कुत्र्यासारखी १२० ला बाईक पळवणारा मी आता मायलेज साठी लाचार होऊन ५०-६० च्या आयडीयल स्पीडला बाईक हाकत होतो. मेगा हायवेला या अशा स्पीडला बाईक चालवणे म्हणजे जगातील सगळ्यात बोरिंग काम आहे हे मला त्या दिवशी कळलं. १० किलोमीटर गेले, २० किलोमीटर

गेले, ४० किलोमीटर मागे पडले पण पेट्रोल पंप नाहीच. हे म्हणजे असं झालं होतं की आतापर्यंत सगळं नीट केलं आणि दरवाज्यात येऊन हगलो.

संकटात सापडल्यावर जेव्हा काहीच मार्ग दिसत नाही तेव्हा प्रत्येक माणूस वर बसलेल्याचाच धावा करतो. मी पण, जेवढ्या आठवतील तेवढ्या सगळ्या देवांचा धावा सुरु केला आणि माझं नशीब चांगलं म्हणा कोणत्या तरी देवाने पुढील ५ किलोमीटरमध्ये माझा धावा ऐकला. कारण, अगदी पुढल्या ५ किलोमीटरला इंडियन ऑईलचं पेट्रोल पंप नजरेस पडलं. तहानलेल्या माणसाला पाण्याचा झरा दिसावा तशी पटकन गाडी तिकडे वळवली. पेट्रोल पंप वरच्या पोऱ्याला म्हटलं, “फुल कर”. गाडीत ४ लिटरही पेट्रोल गेलं नसेल आणि बघतो तर काय टाकी फुल! हे काय चाललं आहे काहीच कळेना. बाईक ढकलतच बाजूला घेतली आणि स्टार्टर मारायला गेलो तर बाईक चालूच होईना. ना न्युट्रलची लाईट पेटत होती ना समोरच्या स्पीडोमीटर मधली. हॉर्नही वाजत नव्हता. मग शेवटी जोरदार किक हाणली. आता गाडी चालू झाली खरी पण तरी कोणत्याच लाईट्स दिसेनात. हॉर्नही वाजत होता. पेट्रोलचा काटा सुद्धा अजून E वरच मेल्यासारखा पडून होता. शेवटी शेरलोक होम्स सारखी थोडी बुद्धी चालवल्यावर डोक्यात ट्यूब पेटली खरी पण त्याचा मोठा झटका मलाच बसला. कारण मघापासून हाय स्पीडला गाडी चालवल्याने पेट्रोल संपलं म्हणून मी जी बोंब मारत होतो, ती मुळातच समस्या नव्हती. गाडीत खूप पेट्रोल होतं, गाडी अतिवेगाला चालवल्याने कदाचित बाईकची बॅटरी डेड झाली होती आणि ही खरंच खूप मोठी समस्या होती.



एकीकडे बॅटरी डेड झाली होती आणि दुसरीकडे सूर्यनारायणाचा प्रकाश पण डेड होत होता. अंधारात डेड बॅटरी वर गाडी चालवणे खूप धोकादायक होते. नेहमीप्रमाणे जाता येईल तितकं जाऊ पुढे काय करायचं ते बघू असं ठरलं. चित्रदुर्ग फाट्याजवळ पोहोचलेले आम्ही एव्हाना हंपी पासून २ तास दूर होतो. इथून पुन्हा एकदा आमचं सारथ्य करणारा NH48 एका दिशेला जाणार होता आणि आम्ही उजव्या बाजूच्या आतल्या रस्त्याला वळणार होतो. मुंबईला जाताना पुन्हा भेटू असं म्हणत आम्ही गाड्या कुडलीगी मार्गे हंपीला जाणाऱ्या हायवेवर वळवल्या. हाच रस्ता पुढे थेट सोलापूर पर्यंत जातो असंही कळलं.

म्हैसूरला सकाळी नाश्ता म्हणून डोसे खाल्ल्यापासून, मध्ये मध्ये चॉकलेट्स आणि पाण्याशिवाय आमच्या पोटात काही गेलं नव्हतं. त्यामुळे पोटातील कावळ्यांनी सदेखील, “शेठ आता दया करा” अशी कावकाव करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे रस्त्यावर जे पहिलं रेस्टॉरंट दिसलं त्यात सरळ धूम ठोकली आणि मस्त पोट गच्च करूनच बाहेर आलो.

रेस्टॉरंट मधून बाहेर पाउल ठेवलं तेव्हा संध्याकाळचे ७:३० वाजले होते. सूर्यनारायणाने आपली शिफ्ट चांदोमामाकडे हस्तांतरित केलेली पाहून माझ्या मनात धडकी भरायला सुरुवात झाली. हंपीला घेऊन जाणारा हा रस्ता होता तर प्रशस्त पण रस्ता दुरुस्तीचे कामही सुरु होते. त्यामुळे दर २-५ किलोमीटरला डायव्हर्जन आगंतुकासारखे मध्ये मध्ये दर्शन देत होते. दुसरी चिंतेची गोष्ट म्हणजे या रस्त्याला प्रवासी गाड्या फार कमी होत्या. सगळीकडे दिसत होते सुसाट वेगाने जाणारे डंपर, कंटेनर आणि ट्रक्स! या वेगात या गाड्यांना ओव्हरटेक करायचं म्हणजे तुमची गाडी पण त्या स्थितीत हवी ना. पण न माझे इंडिकेटर काम करत होते न हॉर्न वाजत होता. त्यात अजून बिकट परिस्थिती म्हणजे माझी गाडी काळी, मी घातलेलं जॅकेट काळं, हातातले ग्लव्हज काळे, एवढचं काय तर जीन्स सुद्धा मी काळीच घातली होती. या सगळ्यांच्या जोडीला काळाकुट्ट अंधार होताच. त्यामुळे मी कितीपत मागच्या येणाऱ्या गाड्यांना दिसेल याबद्दल मलाच शाश्वती नव्हती. धोका पत्करण्या ऐवजी आम्ही समजूतदारपणाचा मार्ग निवडला. ज्यानुसार महेंद्र लीड करणार होता आणि त्याच्या मागे तो ज्या हालचाली करेन त्या पद्धतीने मी देखील त्याच हालचाली करेन असं ठरलं. त्याने राईट इंडिकेटर दिलं की राईटला वळायचं, त्याने लेफ्ट दिलं की लेफ्टला वळायचं, त्याने स्पीड कमी केली की मी पण कमी करायची. अश्याप्रकारे एखाद्या धडधाकट माणसाच्या पाठीवर हात ठेवून एखाद्या दृष्टीहीन व्यक्ती कसा गप्प मान खाली घालून चालत असतो, अगदी तशीच त्या अंधारात आम्हा दोघांची स्वारी निघाली.

६ वाजता उटी वरून निघून निघालेली आम्ही पोरं १२ तासांत हंपी टच करू हा अंदाज लावून होतो, अर्थात ते झालंही असतं पण शेवटी निर्णायक क्षणी समस्या उभ्या झाल्या आणि त्यांना पार करत करत आम्ही ९:३० वाजता सुखरूपपणे हॉटेलमध्ये स्थिरस्थावर झालो. या प्रवासात मला दोन गोष्टी कळल्या. एक म्हणजे सगळ्यात मोठा धडा हा मिळाला की कधीच लिमिट पेक्षा जास्त आपल्या गाडीला खेचू नये आणि दुसरी गोष्ट म्हणजे रस्ता चुकल्याशिवाय जो ट्रेक पूर्ण होत नाहो तो ट्रेक नाही आणि बाईकमध्ये प्रॉब्लेम आल्याशिवाय जी राईड पूर्ण होत नाही, ती राईड नाही. (हे वाक्य मी माझ्या मनाला समाधान देण्यासाठी बनवलं, बाकी काही नाही!)

**हंपी भ्रमंती (दिनांक 24 जानेवारी)**

# जीवाची हंपी!

शेवटी त्या ठिकाणाच्या उंबरठ्यावर येऊन पहाटेच डोळे उघडले, ज्या ठिकाणाने या साउथ राईडची मुहूर्तमेढ रोवली होती. हो, अवघ्या १२ किलोमीटर अंतरावर होतं जगातील सगळ्यात प्रसिद्ध वारसा स्थळांपैकी एक असलेलं हंपी! कॉलेजला असताना कधीतरी एका प्रोजेक्ट दरम्यान हंपीचे फोटो पहिले होते आणि तेव्हापासून हंपीला यायचं असं मनाशी कुठेतरी पक्क केलं होतं. पण जर तेव्हा समांतर वेबसिरीज मध्ये सुदर्शन चक्रपाणी सारखा माझा भविष्यकाळ जगून झालेला एखादा व्यक्ती येऊन म्हणाला असता कि, “तू हंपीला जाणार आहेस ते सुद्धा बाईक वरून आणि सोबतीला भली मोठी राईड करणार आहेस.” तर त्याला डोक्यावरचे केस वर करून मी माझं कपाळ दाखवलं असतं. त्याचा अर्थ काय ते मिम्स कम्युनिटी मधल्यांना बरोबर कळला असेल. सांगायचं तात्पर्य हे की तेव्हा असं काही पुढे घडेल यावर मी अजिबात विश्वास ठेवला नसता. पण शेवटी आयुष्य आहे, ते असंच बदलत अनपेक्षितपणे!

राईड मधील कोणत्याही ठिकाणापेक्षा सर्वात जास्त माहिती आम्हाला हंपीबद्दल मिळाली होती, कारण बरेच मित्रमंडळी आधीच जाऊन आल्याने एकदंर हंपीची पूर्वकल्पना अनेकांनी दिलेली. त्यांच्या म्हणण्यानुसार शक्य तितक्या लवकर सकाळीच हंपी फिरायला निघावे. सगळी मंदीरं आणि इतर वास्तू पहाटेच उघडल्या जातात आणि तेव्हा गर्दी देखील नसते. बस्स हीच गोष्ट डोक्यात ठेवून आम्ही दोघेही सकाळी ७ वाजताच जीवाची हंपी करण्यासाठी बाहेर पडलो. माझ्या बाईक मध्ये बॅटरीचा जो प्रॉब्लेम झाला होता तो सुद्धा नीट करून घ्यायचा होता. पण होसपेट आतासं कुठे हळूहळू जाग होत होतं. त्यामुळे मॅकेनिक मिळण्याची शक्यता कमी होती.

शक्य तितकं दुपारपर्यंत फिरून घेऊन नंतर बाईकचं बघू असं ठरवून आम्ही हंपीच्या दिशेने निघालो. राईड मध्ये पहिल्यांदा असं झालं की जॅकेट ऐवजी आम्ही नॉर्मल शर्ट-टीशर्टस घालून बाहेर पडलो होतो. कारण येथील उष्ण

प्रदेशात जॅकेट घालून फिरण्याची आम्हा दोघांचीही हिंमत नव्हती. बाहेर पडताच येथील शुष्क वातावरण जाणवलं आणि दुपारी काय वाट लागणार आहे त्याचा अंदाज आधीच लागला.

हंपी जवळ वसलेली बाजारपेठांची दोन शहरे म्हणजे कमलापूर आणि होसपेट! कमलापूर हे हंपीला अगदी लागुनच, त्यामुळे हंपी वासियांना किंवा हंपी फिरणाऱ्या पर्यटकांना बेसिक काही गोष्ट हव्या असतील तर त्या कमलापूर मध्ये सहज उपलब्ध होतात. कमलापूरच्या मानाने होसपेट हे अधिक मोठं आणि पुढारलेलं शहर आहे. एखाद्या मोठ्या शहरात ज्या सोयीसुविधा हव्यात त्या सगळ्या इथे उपलब्ध आहेत. होसपेट मध्ये फिरताना अजिबात या गोष्टीवर विश्वास बसत नाही की हे शहर सुद्धा प्राचीन विजयनगराचाच एक भाग आहे. होसपेट शहराची स्थापना १५२० साली विजयनगरचा सम्राट राजा कृष्णदेव राय यांनी आपली आई नागलांबीका हिच्या स्मरणार्थ केली होती. त्यामुळे पूर्वी हे शहर नागलपुरा म्हणून ओळखले जायचे. परंतु सामान्य प्रजा या शहराला संबोधायची ‘होसा पेटे’, ज्याचा अर्थ होतो ‘नवीन शहर’! पुढे याच शब्दांत बदल होऊन आज त्याला मिळालेलं नाव म्हणजे ‘होसपेट’!




होसपेट मधून बाहेर पडून, हंपीच्या दिशेने जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर येताच दूरवर आम्हाला दिसली ती दगडांची नगरी, जसं जसे किलोमीटर कमी होत गेले तस तश्या त्या इवलुश्या दगडांनी आता डोळ्यांतही सामावणार नाही इतक्या महाप्रचंड अजस्त्र शिळांचे रूप धारण केले. हळूहळू चारी बाजूचं जग त्या महाकाय शिळांनी भरून गेलं. काही क्षण तर असा भास झाला की आम्ही २०२० मधून थेट टाईम मशीनने १४ व्या शतकात आलो आहोत की काय! कुठे ते प्राचीन असूनही आधुनिकतेला जवळ करणारं होसपेट आणि कुठे आपला इतिहास दाखवण्यासाठी आजही त्याच युगाची चादर पांघरून उभं असलेलं हंपी! कधी हंपीला गेलात तर होसपेट मध्ये राहा आणि तिथून हंपीला या. तुम्हाला हा फरक अतिप्रकर्षाने जाणवेल.

सकाळी आम्ही काही न खाता निघालो होतो आणि हंपी मध्ये शिरताच आमची नजर पडली भल्या मोठ्या दगडाचा आडोसा घेऊन आपलं दुकान थाटून बसलेल्या इडली डोसवाल्याकडे! हंपी मध्ये शिरल्यापासून पहिल्यांदा आम्हाला खाण्यासाठी काहीतरी दिसलं होतं, त्यामुळे इथे जास्त सोय नसावी असा विचार करून एक



एक प्लेट इडली आणि पिठात भाजलेली मिरची हादडली. सोबतीला चहा घेतल्यावर अजूनच तरतरी मिळाली. आता दुपार पर्यंत आरामात हंपीच्या इतिहासात हरवून जायला आम्ही सज्ज होतो.

हंपीला फक्त एक पर्यटन स्थळ म्हणणे म्हणजे हंपीचा एकप्रकारे अपमान केल्यासारखंच आहे. कारण ते केवळ एक पर्यटन क्षेत्र नसून भारताच्या शिरपेचात खोवलेला, आपल्या प्राचीन इतिहासाची महानता आजही ताठ मान करून अख्ख्या जगाला सांगणारा मानबिंदू आहे. मध्ययुगीन काळात बीजिंग नंतर सर्वाधिक मोठे आणि सुखवस्तू शहर म्हणून हंपीचा बोलबाला होता. राजा कृष्णदेवरायाच्या काळात हंपी आणि अख्ख्या विजयनगर साम्राज्याने सुवर्णकाळ पाहिला. बाजारात सोने, मोती, हिरे चांदी याचे अक्षरशः ढीगच्या ढीग विक्रीसाठी असायचे असे म्हटले जाते. जगभरातून व्यापारी हंपीमध्ये व्यापार करण्यासाठी यायचे. मात्र १५६० नंतर बहामनी राज्यांच्या आक्रमणापुढे विजयनगर आणि हंपीचा टिकाव लागू शकला नाही. तब्बल ३ महिने हंपी लुटले गेले. देऊळे, मंदिरे, वास्तू उध्वस्त केल्या गेल्या आणि त्यातून ज्या काही वास्तू बचावल्या ते म्हणजे आज दिसणारं हंपी!

हंपी जसे एक मोठे व्यापारी शहर होते तसेच ते हिंदू धर्मियांसाठी एक मोठे तीर्थक्षेत्र देखील होते आणि या तीर्थक्षेत्राची आजही साक्ष देत उभी आहेत येथील वैभवशाली मंदिरे! याच मंदिरांपैकी सर्वात प्रसिद्ध आणि हंपीत पाऊल ठेवल्या ठेवल्या ज्या मंदिराचे सर्वात प्रथम दर्शन घेण्याचे शास्त्रच आहे असं म्हणा हवं तर...ते मंदिर म्हणजे विरुपाक्ष मंदिर!



याच मंदिराच्या नावावरून हंपीला तत्कालीन प्रजा विरुपाक्षपुरा असंही म्हणत असे. मंदिराकडे जाणारा रस्ता हंपी बाजार मार्गातून जातो. मंदिरात प्रवेश करण्याआधी नजरेस पडणारं ५० मीटर उंचीचं गोपुर एकाच वेळीस डोळे विस्फारून सोडतं आणि डोळ्यांना सुखावतं सुद्धा.

मंदिरात पादत्राणे घालून जाण्यास परवानगी नाही. बाजूलाच एक रुपया देऊन पादत्राणे जमा करण्याची सोय आहे. विरुपाक्ष भगवान आणि त्यांची पत्नी देवी पम्पा यांना हे मंदिर समर्पित असून आत अनेक छोटी मोठी मंदिरे देखील आहेत. या मंदिराची स्थापना सम्राट विक्रमादित्य यांची दुसरी पत्नी लोकमाहदेवी यांनी केली होती. या मंदिराबाबत सगळ्यात आश्चर्य वाटणारी गोष्ट म्हणजे बहामनींच्या भयानक आक्रमात देखील हे मंदिर अगदी सुरक्षित राहिलं.

गोपुरातून आत गेल्यावर सगळ्यात पहिली नजरेस पडतात खूप सारी माकडं. पण बिचारी शहाण्या बाळासारखी आपल्या खाण्यात व्यस्त असतात. कोणाला काही त्रास देत नाहीत.

पुढे गेल्यावर मध्यभागी दिसतो एक छोटा दीपस्तंभ आणि नंदी! बाजूला अनेक इतर गोपुरे आणि मंडप नजरेस पडतात.




सरळ चालत गेल्यावर आपण प्रवेश करतो विरुपाक्ष मंदिरांच्या मुख्य मंडपात! या मंडपातील सगळ्यात लक्षवेधी कलाकुसर म्हणजे मंडपाचं छत, या छतावर कोरलेले आहेत अनेक धार्मिक प्रसंग. अगदी बारकाईने पाहिल्यास आपण सहज एक एक प्रसंग ओळखू शकतो. जास्तीत जास्त प्रसंग हे भगवान शंकराच्या कथांशी निगडीत आहेत.

या मंडपातील सोळा खांबांवरची स्थापत्य कला देखील नजरेतून सुटत नाही. या प्रत्येक खांबावर दिसून येतो एक सशस्त्र सैनिक जो आरुढ झाला आहे यालीवर! याली हा एक पौराणिक प्राणी असून

ज्याचं डोकं बकऱ्याच्या शिंगांसारखं, कान सश्यासारखे, डोळे ड्रॅगनसारखे, तोंड मगरीसारखं, नाक हत्तीच्या सोंडेसारखं, शरीर घोड्यासारखं आणि पाय सिंहासारखे असतात.

विविध प्राण्यांच्या अंगातून तयार झालेल्या यालीलाही आम्ही नियंत्रित करतो आणि याली प्राण्याच्या कानासारखे आमचे कान तीक्ष्ण आहेत, आम्ही घोड्यासारखे चपळ आहोत आणि सिंहासारखी झडप घालू शकतो अशी स्वतःच्या साम्राज्याच्या शौर्याची वैशिष्ट्ये अख्ख्या जगाला कळावीत म्हणून हे शिल्प विजयनगर साम्राज्यातील सर्वच वास्तूंमध्ये कोरले गेले. या मंडपातील एकही गोष्ट अशी नाही जिथे काही क्षण थांबून तुम्हाला निरखून पाहावंस वाटणार नाही.





मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात आहे एक शिवपिंड ज्याची इथे मुख्य पूजा केली जाते.

आता तुम्हाला वाटेल की झालं एवढंच हे मंदिर असेल तर थांबा ही झाली वरची बाजू अजून तळमंदिर बाकी आहे! यात आहे अजून एक मंदिर! या मंदिराचा तळाकडील मोठा भाग हा पाण्याखाली असल्याने जास्त आत जाण्यास कोणास परवानगी नाही असं तेथील स्थानिक पुजाऱ्याने सांगितलं आणि ह्या गोष्टीत शक्यताही दिसून येते, कारण तळाखालील भाग हा वरील भागापेक्षा जास्त थंड आहे!




मंदिराच्या बाहेरील उजवीकडील बाजूस आहे मनमाथा पुष्करणी! या पुष्करणी मध्ये अंघोळ करून मगच मंदिरात प्रवेश करण्याची प्रथा होती. परंतु यातील पाणी खराब झाले असल्याने अगदी ५ मिनिटांवर असलेल्या तुंगभद्रा नदीमध्ये अंघोळ करून मग काही भाविक या मंदिरात प्रवेश करतात. या पुष्करणीच्या भोवती देखील अनेक छोटी मोठी देऊळे आहेत. पण ह्या देऊळांमध्ये कोणत्याही प्रकारची पूजा सध्या केली जात नाही.

विरुपाक्ष मंदिराच्या भोवताली प्रदक्षिणा घालून आम्ही मोर्चा वळवला तुंगभद्रा नदीकडे. विजयनगराच्या भरभराटीमागे आणि समृद्धीमागे या नदीचं देखील महत्त्वपूर्ण योगदान होतं. ही नदी तेलंगणा आणि आंध्रप्रदेश राज्यातून वाहत जाऊन पुढे कृष्णा नदीला जाऊन मिळते.



पुन्हा विरूपाक्ष मंदिराकडे येऊन एव्हाना उन्हात पोळून अर्धमेल्या झालेल्या आमच्या पायात पादत्राणे चढवली आणि कूच केली मंदिरा बाजूलाच असणाऱ्या हेमाकुटा हिल कडे!

ग्रॅनाईट पासून निर्माण झालेली ही टेकडी विजयनगरातील एक पवित्र स्थान होतं. या टेकडीवर छोटी, मोठी वेगवेगळ्या देवांना समर्पित असलेली ३० पेक्षा जास्त मंदिरे पाहायला मिळतात.



या टेकडीवर लावलेल्या या मोठ्या फलकावर संपूर्ण हंपी मध्ये आजही अस्तित्वात असणाऱ्या ८३ वास्तूंची एकत्रित यादी नकाशासहित आढळते.

पूर्ण टेकडीवरील मंदिरे अगदी निरखून पहायची तर किमान ३ तास हवेत. आमचं हेच दुर्दैव होतं की आमच्याकडे वेळ जास्त नव्हता. एका दिवसात सगळं हंपी फिरणं निव्वळ अशक्य आहे. फक्त हंपी फिरायचं म्हटलं तरी २ दिवस हवेत आणि जर तुम्ही इतिहास अभ्यासक असाल आणि सगळं काही निरखून पहायची आवड असेल तर तुम्हाला किमान ४ दिवस हंपीत राहणं बंधनकारक आहे. विरुपाक्ष मंदिर आणि आसपासच्या परिसरातच आमचे २-३ तास गेले आणि त्यावरून आम्हाला दोघांनाही कळलं की आपण आज दिवसभर जास्तीत जास्त ४-५ वास्तू अजून पाहू शकतो. पण ही वेळ या गोष्टीने निराश व्हायची नव्हती. तिथल्या तिथे ठरवलं की खास हंपी ट्रीप साठी पुन्हा येऊ ३-४ दिवसासाठी तेव्हा खऱ्या अर्थाने हंपी जगता येईल, आता फक्त धावती नजर मारणंच आमच्या हातात होतं.

वेळ कमी असल्याने प्रसिद्ध वास्तू पहिल्या पाहून घेऊ असा विचार करून मोर्चा वळवला हंपीतील सर्वात सुप्रसिद्ध मंदिरांपैकी एक असलेल्या विठ्ठल मंदिराकडे! तुम्ही बाजार स्ट्रीट मार्गे शॉर्टकटने अदांजे अडीच किलोमीटरचं अंतर चालतही विठ्ठल मंदिर गाठू शकता. आम्हाला मात्र बाईक्स घेऊन विरुपाक्ष मंदिरापासून तब्बल ९ किमी गोल फिरून जावं लागलं. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर असणाऱ्या या दगडी कमानीकडे थांबून फोटो काढण्याचा मोह काही आवरला नाही.




आम्हाला वाटलं होतं बाईक्स मंदिरापर्यंत घेऊन जाता येतील, पण तिथे भ्रमनिरास झाला. मंदिरापासून १ किमी दूर पार्किंग आहे आणि पार्किंग पासून मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी तुमच्याकडे उरतात दोन पर्याय. एक म्हणजे

छोट्या इलेक्ट्रिक गाडयांमधून जा किंवा गप्प १० मिनिटे रखरखत्या उन्हात ११ नंबरची आपली गाडी सुरु करा. आम्ही सवयीप्रमाणे वायफळ खर्च नको असं म्हणत गप्प पायी प्रवास सुरु केला. पायी जाण्यामागे आणखी एक कारण होतं ते म्हणजे मार्गात अजून काही वास्तू दिसत होत्या.




पहिली वास्तू दिसली ‘कुडूरेगोंबे मंडप’ नावाची! हे ५०० वर्षे प्राचीन मंदिर म्हणजे स्थापत्यशास्त्राचा अस्सल नमुना आहे. विरुपाक्ष मंदिरासारखे या मंडपातील खांबांवरही यालीवर आरुढ झालेल्या सैनिकांचे शिल्प दिसते. हे मंदिर प्राचीन काळात एका अज्ञात हिंदू देवाला समर्पित होते असे म्हणतात.

पण हे मंदिर उध्वस्त असल्याने आणि आतील देवाची मूर्ती देखील भग्नावस्थेत असल्याने तो देव नक्की कोणता हे मात्र ठामपणे सांगता येत नाही. या मंदिराच्या मागे एक असा तर्क लावला जातो की या मंदिराच्या स्तंभावरील यालीवर आरुढ असणाऱ्या सैनिकांचे शिल्प आणि मंदिराचे नाव यांचा सबंध असावा. कारण स्थानिक भाषेत कुडूरेचा अर्थ होतो घोडा आणि कुडूरेगोंबेचा अर्थ होतो घोडेस्वार!




मंदिराच्या समोरच एक पुष्करणी आहे. या पुष्करणीमध्येच अंघोळ करून मगच प्राचीन काळात या मंदिरात आणि समोरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेश केला जात असावा.

या वास्तूवर धावती नजर टाकल्यावर आता ओढ लागली समोर दिसणाऱ्या विठ्ठल मंदिराची! विठ्ठल मंदिर म्हणजे प्राचीन इतिहासाची एक आगळीवेगळी खाण आहे. मंदिरात पाऊल ठेवल्यापासून ते बाहेर पडेपर्यंत तुमच्या चेहऱ्यावर फक्त आणि फक्त अचंबित झाल्याचे भाव असतात. ही भव्य दिव्य वास्तू आणि त्यातील छोट्यातील छोटी कलाकुसर एवढ्या बारकाईने कशी निर्माण केली गेली असेल हा प्रश्न तुम्हाला स्वस्थ बसूच देत नाही.



नावावरुनच कळतं की हे मंदिर विठ्ठलाला समर्पित आहे. या मंदिराला दोन बाजूला भव्य गोपुरे आहेत. मुख्य मंदिर हे मध्यभागी असून आसपास अनेक लहान देऊळे आहेत.

आत शिरताच मंदिराच्या समोरच आपल्याला ती वास्तू नजरेस पडते जी आज दिमाखात भारतीय चलनाच्या ५० रुपयांच्या नोटेवर विराजमान झाली आहे.




१५१३ मध्ये राजा कृष्णदेवराया यांनी ओडीसावर आक्रमण केले आणि कोणार्कच्या सूर्यमंदिरातील दगडी रथ पाहून ते इतके प्रभावित झाले की त्यांनी विजयाचे प्रतिक म्हणून हा रथ येथे उभारला. आणि म्हणून या मंदिरातला विजय विठ्ठल मंदिर असेही नाव पडले. भारतात तीन ठिकाणी दगडी रथ आहेत. एक आहे कोणार्क मधील सूर्य मंदिरात, एक आहे तामिळनाडूच्या महाबलीपूरम मध्ये आणि तिसरा हंपीमध्ये! ह्या दगडी रथामध्ये गरुडाची मूर्ती असल्याने हा रथ गरुड मंडप या नावाने ओळखला जातो. हा रथ एकमेवाद्वितीय यासाठी आहे कारण पहिल्यांदा पाहताना असं वाटतं की हा रथ एका

दगडातून कोरून काढला असावा. पण हा आपला निव्वळ एक गोड गैरसमज असतो. रथांचे एकूण २८ विविध दगडी भाग इतक्या चतुराईने एकमेकांत बसवले आहेत की अगदी जवळ जाऊन पाहिल्याशिवाय सांधे दिसत नाहीत. मुळात असा रथ निर्माण करण्यामागे एक कारण हेच होतं की रथाचे सगळे भाग काढता यावेत आणि तो दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाता यावा. सगळ्यात खास गोष्ट म्हणजे या रथाची दगडी चाके फिरायची बरं का! पण आता भारतीय पुरातत्व खात्याने या वास्तूला पर्यटकांपासून धोका निर्माण होऊ नये म्हणून सिमेंट लावून कायमचा चाकाच्या फिरण्याला चाप लावून टाकला आहे.



रथाच्या समोरच आहे रंग मंडप. यातच आहेत ते ५६ संगीतमयी खांब अर्थात म्युझीकल पिलर्स जे पाहण्यासाठी जगभरातून पर्यटकांचे जथ्थे इथे येतात. हे खांब विशिष्ट पद्धतीने वाजवल्यास त्यातून सारेगम स्वर ऐकून येतात. म्हणून या खांबांना सारेगम पिलर्स असेही म्हटले जाते. राजा कृष्णदेवराय यांची द्वितीय पत्नी चिन्ना देवी हिला नृत्याची आवड होती. या मंडपातील ५६ खांबांजवळ ५६ वादक हातात चंदनाचे छोटे लाकूड घेऊन उभे राहायचे आणि हलक्या हाताने हे खांब वाजवायचे. त्यातून निर्माण होणाऱ्या संगीताच्या तालावर चिन्नादेवी नृत्य करायची.



पूर्वी या मंडपात जाऊन तुम्ही स्वत:च्या हाताने विविध खांब वाजवण्याचा अल्टीमेट अनुभव घेऊ शकत होतात. पण पुरातत्व खात्याकडे तक्रारी आल्या की पर्यटक त्या वास्तूचे महत्त्व न ओळखता कश्याही पद्धतीने या खांबांवर हाताने, १-२ रुपयांच्या कॉईनने, लहान दगडांनी ठोकायचे. यामुळे बऱ्याच खांबातील

आवाजाचा ध्वनीही बदलला. आता अजून हानी नको म्हणून पुरातत्व खात्याने आत प्रवेश करण्यावर कायमची बंदी घातली आहे.



बाजूला अजून एक मंडप नजरेस पडतो ज्याला कल्याण मंडप म्हणतात. येथे प्राचीन काळात लग्न व्हायची. मंडपातील लक्षवेधी कलाकुसर म्हणजे खांबांवर कोरलेले रामायणातील प्रसंग!

शेवटी आपण येऊन पोहोचतो मुख्य मंदिरात. या मंदिराचे तीन मुख्य भाग आहेत गर्भगृह, अर्धमंडप आणि महामंडप! गर्भगृहामध्ये शिरताना नजरेस पडतात दोन मुर्त्या. या मुर्त्या आहेत भगवान विष्णुंच्या द्वारपालांच्या, ज्यांना जया आणि विजया म्हटले जाते.



इथून आपण थेट आत गेलो की मुख्य गाभाऱ्यात पोहोचतो जिथे होत्या विठ्ठल आणि रुक्मिणी यांच्या मुर्त्या!

इथून जर तुम्ही मागे वळून पाहिलंत तर बरोबर समोर दिसते दगडी रथामधील गरुडाची मूर्ती! ज्या प्रमाणे प्रत्येक शिवमंदिरात भगवान शंकराच्या पिंडी समोर अगदी बरोबर मंदिराबाहेर नंदी असतो अगदी तसचं! इथून खालच्या बाजूस उतरल्यावर दिसते अंधारी जागा. खास विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी अशी बांधकाम रचना केली गेली होती.

एव्हाना दुपारचे १२ वाजून सुद्धा गेले होते. अजून काही वेळ ह्या वास्तूच्या सहवासात घालवण्याची आमची इच्छा होती. पण वाढलेल्या गरमीसोबत चालून चालून दमल्याने पोटात ओरडणारे कावळे या इच्छेवर भारी पडले आणि आम्ही थेट गाठलं कमलापूर गाव.


गावाच्या मुख्य बाजारात पोहोचताच चांगलं रेस्टॉरंट शोधून काहीतरी वेगळं हादडू असा प्लान होता, पण फार काही चांगले पर्याय न वाटल्याने आणि भुकेशी मस्करी नको म्हणून गप्प व्हेज थाळीच खाल्ली. ही व्हेज थाळी आम्ही म्हैसूर वरून निघताना हादडलेल्या व्हेज थाळी पेक्षा जास्तच चविष्ट होती म्हणून अगदी चाटून पुसून सगळं खाल्लं आणि निघालो कमलापूर मध्येच असणाऱ्या पुरातत्व संग्रहालयाकडे!




पूर्ण हंपी पाहणं आमच्या काही नशिबात नव्हतं, त्यामुळे दुसरीकडे कुठे फिरण्यापेक्षा थेट संग्रहायालात जाऊन एकाच ठिकाणी हंपीचा सगळा इतिहास अनुभवण्याची आणि उत्खनन करताना सापडलेल्या प्राचीन वस्तू पाहण्याची ही संधी न सोडण्याचे ठरवले. अपेक्षेप्रमाणेच इथे आमचं येणं अजिबात वाया गेलं नाही. विजयनगर साम्राज्याचं सगळं वैभव एकाच ठिकाणी उन्हात न फिरता शांतपणे पहायचं असले तर बॉस इथे तुम्ही आलंच पाहिजे. आत फोटोग्राफीला परवानगी नाही, पण आत जे काही आहे ते असंच फोटो काढून व्हायरल करण्याच्या स्तरावरचं नाही हे देखील तितकंच खरं. ते स्वत: याची देहा याची डोळा अनुभवण्यासारखंच आहे.

संग्रहालयात तब्बल दोन तास घालवल्यावर बाहेर येऊन कुठे जायचं हा विचार करत असतानाच नाक्यावर मॅकेनिकचं दुकान दिसलं आणि तेव्हा अचानक डोक्यात क्लिक झालं, “आपल्या बाईकवर उपचार करणे बाकी आहेत कि!” लागलीच त्याच्याकडे गेलो आणि खरी समस्या कळली. सुदैवाने बॅटरी डेड नव्हती. बॅटरीला कनेक्ट असणारी एक वायर ओव्हर स्पीडमुळे थोडी जळली होती. म्हणजे समस्या जास्त मोठीही नव्हती आणि जास्त खर्चिक सुद्धा नव्हती. अर्ध्या तासात गाडी पुन्हा पहिल्यासारखी करून जेव्हा मॅकेनिकने होर्न वाजून दाखवला, सगळ्या लाईट्स पेटून दाखवल्या तेव्हा कान आणि डोळे अगदी तृप्तच झाले.


चला, एक मोठं काम तर झालं होतं, पण आता पुढे काय पहायला जायचं हा यक्षप्रश्न होताच? शेवटी त्या मॅकेनिककडेच चौकशी केली तेव्हा तो म्हणाला, “must see achyutaraya temple.” बस्स मग काय त्याच्यावर विश्वास ठेवून पुन्हा आलो विरुपाक्ष मंदिर परीसराकडे. येथूनच डावीकडचा रस्ता थेट घेऊन जातो अच्युतराय मंदिराकडे.



अच्युतराय मंदिराकडे जाताना आपल्या नजरेस पडते नंदीची एक अखंड मूर्ती! पाहताना आपल्या मनात प्रश्न येतो की नंदीचं हे स्वतंत्र मंदिर उभारण्यामागचं कारण ते काय? असं म्हणतात की हा नंदी विरुपाक्ष मंदिराचाच भाग आहे. आपणही जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा बरोबर समोर दिसते विरुपाक्ष मंदिर, नंदी सुद्धा तिकडेच तोंड करून स्थानापन्न झालेला असल्याने या म्हणण्यात तथ्यता वाटते.

नंदीच्या बाजूनेच सुरु होणाऱ्या दगडी पायऱ्या चढून वर गेल्यावर आम्ही हंपीच्या त्या गर्दीपासून खूपच दूर निघून आलो.

आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी गेलो, तिथे होती माणसांची गर्दी आणि गोंगाट, पण त्या पायऱ्या चढून वर आलो आणि तिथे एकाही माणसाचा मागमूस नव्हता आणि टेकडीच्या खाली नजर जाताच दिसलं शांत वातावरणात जणू आपल्याच जगात हरवलेलं अच्युतराय मंदिर!




सम्राट कृष्णदेव राय यांचे लहान बंधू राजा अच्युतराय यांनी १५३९ च्या आसपास या मंदिरांची स्थापना केली. हे मंदिर भगवान विष्णूचे रूप असणाऱ्या तीरुवेंगलनाथ देवाला समर्पित आहे. मंदिराच्या दोन बाजूला भग्नावस्थेत असलेली दोन उंची गोपुरे आहेत.

हे मंदिर मोठ्या जागेत पसरलेले असून मध्यभागी मुख्य मंदिर आहे. इतर मंदिरांप्रमाणे या मंदिरातही कल्याण मंडप असून ज्याचा वापर लग्नकार्यासाठी होत असे. अच्युतराय मंदिरातील



सर्वात लक्षणीय गोष्ट म्हणजे मंदिराची स्थापत्यकला! या मंदिराचा कोपरा न कोपरा तुम्हाला स्थापत्य शास्त्राचे अद्भुत दर्शन घडवल्याशिवाय राहत नाही.

अच्युतराय मंदिराच्या मागेच उभी आहे हंपीतील प्रमुख आकर्षणांपैकी एक असलेली मातंग हिल! या टेकडीला मातंग पर्वत असेही म्हटले जाते. यावर स्थित आहे प्राचीन वीरभद्र मंदिर! या पर्वताचा इतिहास आपल्याला थेट रामायणापासून पाहायला मिळतो. ऋषी मातंग यांचे इथे आश्रयस्थान होते.



मंदिरामध्ये अजून काही काळ थांबलो, पण पाय काही निघत नव्हता. तेवढ्यात घड्याळाने आठवण करून दिली की ६ वाजून गेले आहेत. एव्हाना सूर्य नारायणाच्या तप्त किरणांचे तांबड्या मोहक छटांमध्ये झालेले परिवर्तनही दिवस संपल्याची चाहुल देत होत्या. या चाहुली सोबतच हंपी मधील आमचा वेळ देखील संपल्याची देखील घोषणा झाली. आम्ही दिवसभरात हंपीचा फारच कमी अनुभव घेतला होता, पण जो काही घेतला होता तो पुन्हा इथे येईपर्यंत मन तृप्त करण्यास पुरेसा होता.

पुन्हा पुन्हा मागे वळत वळत, त्या दगडी नगरीला डोळ्यात शेवटच साठवत हंपीच्या बाहेर पडलो. मार्गात कमलापूर तलावाच्या काठी सुर्यास्ताच्या सौंदर्याचा नयनरम्य सोहळा नजरेस पडला आणि हा सोहळा चुकवण्याइतके आम्ही खुळे नक्कीच नव्हतो.



आमच्या संपूर्ण राईड मधील महाराष्ट्र राज्याबाहेरचा हा शेवटचा सूर्यास्त, त्यामुळे हा क्षण नक्कीच स्पेशल होता. इथे अधिकृतपणे राईड संपल्याची सांगता झाली. उद्या पुन्हा आम्ही घराकडे निघणार होतो. तो सूर्यास्त डोळ्यात साठवता साठवता गेल्या दहा दिवसातले सगळे क्षण नजरेसमोर तरळले.

पहिल्या दिवशी रेकॉर्डब्रेक वेळेत कापलेलं १००० किमीचं अंतर, दुसऱ्या दिवशी मुन्नार गाठता गाठता लागलेली वाट, तिसऱ्या दिवशी अनुभवलेलं स्वर्गाहुनी सुंदर मुन्नार, चौथ्या दिवशी आदीयोगींचे दर्शन घेऊन पूर्ण केलेलं बकेट लिस्ट मधील एक ठिकाण, पाचव्या दिवशी अनुभवलेले कधीही न विसरता येणारे उटीचे रस्ते, सहाव्या दिवशी बाईकने दिलेला दगा आणि आज आठव्या दिवशी केलेली जीवाची हंपी....आयुष्यातली ही पहिलीच इतकी मोठी राईड हळूहळू मनात बंदिस्त होत होती आणि आमची चाकं पुन्हा हॉटेलच्या दिशेने पळत होती.

## पाचवा टप्पा – हंपी ते मुंबई (दिनांक 24 जानेवारी)

## नशीबातलं दर्शन!

हंपी ते मुंबई हे अंतर तब्बल ७४३ किलोमीटर. तरी सोबतीला सुपरफास्ट NH48 असल्याने हे अंतर आपण जास्तीत जास्त १३ तासांत सहज गाठू शकतो. आमच्याकडे होते दोन पर्याय. एक म्हणजे हंपी वरून सरळ जाऊन

सोलापूर-पुणे मार्गे मुंबई गाठणे किंवा हंपी वरून गडद मार्गे हुबळी गाठून NH48 ने मुंबई गाठणे. नक्की कुठून जायचं हे ठरवत असताना महेंद्रच्या मनात काय आलं देव जाणे त्याने सुचवलं की आपल्याकडे खूप वेळ आहे तर चल कोल्हापूरला नरसोबाच्या वाडीला जाऊन येऊ. मी देखील लगेच होकार भरला, कारण ठिकाण मार्गातच होतं आणि कधीपासून नरसोबाच्या वाडीचे दर्शन घेण्याची इच्छाही होती. नंतर मॅप तपासताना असं दिसलं की प्राचीन कोपेश्वर मंदिर सुद्धा जवळचं आहे. चला, म्हणजे आज महाराष्ट्रातील दोन विशेष देवस्थानांची भेट आमच्या नशिबात होती.

मग काय सकाळी ७ वाजताच नाश्ता वगैरे भरपेट करून हंपीचे शेवटचे दर्शन घेत आमचा साथीदार NH48 ला येऊन मिळालो. आता पुढे तब्बल घरी पोहोचेपर्यंत आमचे सारथ्य करण्यासाठी तो देखील सज्ज होता. संपूर्ण रस्ता पूर्ण मोकळा होता, पण यावेळेस मी कानाला खडा लावून स्पीड १०० च्या आतच ठेवली.

एक तास गेले, दोन तास गेले आणि दुपारच्या त्या उन्हात पुन्हा आमचा सगळा उत्साह वाहत्या घामासोबत निघून गेला. सगळीकडे नुस्तं निरस वातावरण...ओकाबोका प्रदेश! पुन्हा एकदा मनावर ताबा ठेवून थांबत थांबत प्रवास सुरु ठेवला आणि अचानक संध्याकाळी ३ च्या आसपास कन्नड भाषेतील पाट्यांसोबत मराठी भाषेतील पाट्या, फलक दिसू लागले. मध्येच समोरून MH नंबर प्लेट मिरवत भरधाव वेगाने जाणाऱ्या गाड्या नजरेस पडू लागल्या. हे दृश्य पुढील 10 किमीच्या अंतरात अजूनच बदललं आणि फोटोत दिसणाऱ्या रस्त्यातच कुठेतरी सगळीकडे केवळ आणि केवळ मराठी भाषा आणि MH नंबर प्लेटच्या गाड्या दिसू लागल्या आणि खरंच खूप भारी वाटलं, कारण कर्नाटक कुठेतरी मागे पडून सुरु झाला होता माझा महाराष्ट्र!



महाराष्ट्रातून बाहेर पडतानाची ती फिलिंग आणि पुन्हा दुसऱ्या राज्यात भटकून महाराष्ट्रात प्रवेश करतानाच्या दोन्ही फिलिंग मध्ये खूप फरक होता. ती फिलिंग होती नवउत्साह पेटवणारी आणि ही फिलिंग होती त्या पेटलेल्या उत्साहाने थकलेल्या शरीराला आणि मनाला शांत करणारी...समाधान देणारी!

इथून अवघे काही किलोमीटर आतल्या रस्त्यांनी रांगडं कोल्हापूर अनुभवत येऊन पोहोचलो नरसोबाच्या वाडीत! कृष्णा आणि पंचगंगा या नदीच्या संगमावर वसलेले आणि दत्तात्रयांचे अवतार असलेल्या नृसिंह सरस्वतींच्या वास्तव्याने पावन झालेले हे तीर्थक्षेत्र! जास्त गर्दी नसल्याने अगदी काही मिनिटांतच नृसिंह सरस्वतींच्या पादुकांचे दर्शन झाले.






नरसोबा वाडीतून बाहेर पडत आमची स्वारी निघाली अंदाजे २० किलोमीटरवर असलेल्या खिद्रेश्वरकडे! इथे आहे महाराष्ट्रांतील अति प्राचीन आणि स्थापत्यकलेचा अद्भुत अविष्कार असलेलं कोपेश्वर मंदिर!

दक्षिण भारतातल्या मंदिरांसारखी पाहताक्षणी भान हरपून टाकणारी मंदिरं आपल्या महाराष्ट्रातही आहेत त्याचं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे श्री कोपेश्वर मंदिर होय.

चालुक्य राजवटीत या मंदिराचे बांधकाम सुरु होऊन पुडे शिलाहार राजवटीत ते पूर्ण झाले असावे असं एकूण बांधकामावरून दिसून येतं. हे मंदिर भगवान शंकरांना समर्पित असून, दक्ष कन्या सतीच्या जाण्याने व्यथित होऊन कोपलेले भगवान शंकर इथे येऊन बसले. म्हणून या ठिकाणी कोपेश्वर मंदिराची स्थापना केली केली अशी आख्यायिका सांगतली जाते. शंकराचं कोणतंही मंदिर असो समोर नंदी असतोच, पण या मंदिरात तो नाही. येथून १२ किलोमीटर दूर असलेल्या कर्नाटकातील यडूर या गावी नंदीचे एक स्वतंत्र मंदिर आहे. अनेकांचे असे मत आहे की तो नंदी याच मंदिराचा आहे. हा तर्क अधिक

ठोसपणे सांगण्यासाठी हे स्पष्टीकरण दिले जाते की कोपेश्वराचे मंदिर हे पूर्व दिशेला तोंड करून आहे आणि नंदीचे मंदिर हे पश्चिम दिशेला तोंड करून आहे.



मंदिराबाहेरील मंडपात ४८ खांब आहेत आणि वर वर्तुळाकार खुले छत आहे. यज्ञ करताना धूर बाहेर जावा म्हणून अशी रचना केली गेल्याची शक्यता वाटते. या मंडपाला स्वर्गमंडप असे म्हणतात. इतके सुंदर मंदिर आपल्या चित्रपटसृष्टीच्या नजरेतून थोडी न सुटेल? कट्यार काळजात घुसली या चित्रपटातील शिव भोला भंडारी गाण्याचे दृश्य सौंदर्य याच मंदिराने तर वाढवले आहे.

हे महाराष्ट्रातील सर्वात सुंदर मंदिरांपैकी एक आहे त्यामुळे प्रत्येकाने किमान एकदा तरी या मंदिराला आवर्जून भेट द्यावीच. आम्ही गेलो त्या दिवशी मंदिर परिसरात जत्रा भरली होती. कोपेश्वराचा पालखी सोहळा देखील पाहण्याचं भाग्य लाभलं. एकंदर दोन्ही देवस्थानांची भेट नशिबाने झाली आणि नशिबवान ठरली.



कोपेश्वराच्या सानिध्यात जवळपास दीड तास घालवल्यावर जास्तच उशीर झाल्याची जाणीव झाली. मुंबई अजून ८ तासांवर होतं. पण महेंद्रच्या म्हणण्यानुसार हा विकेंड असल्याने पुण्यात शिरताना आणि बाहेर पडताना जाम ट्राफिक भेटण्याची शक्यता होती. शेवटी ८ ला खिद्रेश्वर वरून निघून, इचलकरंजीच्या गजबजलेल्या शहरातून वाट काढत पुन्हा एकदा आमचा साथीदार NH48 ला येऊन भेटलो. जेवणाची वेळ झाल्याने भूक सुद्धा भयंकर लागली होती आणि कोल्हापूरात आमच्यासारखे नॉनव्हेज प्रेमी असताना तांबडा आणि पांढरा सोडून दुसरं काही खायचं तरी मनात येईल का?

गेले १० दिवस नुसतं व्हेज खाऊन सुक्या पडलेल्या गळ्याला कोल्हापुरी ठसका देणं बंधनकारक होतंच. मग काय हायवेलाच मस्त

झगमगतं हॉटेल शोधून मस्त कोल्हापूरी थाळीवर मनसोक्त ताव मारला आणि १० वाजता मुंबईच्या दिशेने घौडदौड सुरु ठेवली.

झाले फक्त ६ तास बाकी होते आणि कसलीही समस्या न येता, पुण्यात ट्राफिक न मिळता, पुन्हा एकदा कोल्हापूर ते पुणे नॉनस्टॉप गाठत, लोणावळ्याच्या थंडीत चहाचा शेवटचा भुरका मारून, गुगल मॅपचा अंदाज चुकवत अर्धा तास आधीच पहाटे ५ च्या ठोक्याला घर गाठलं. बाईक वरून उतरताच हेल्मेट उतरवत आम्ही दोघांनी एकमेकांकडे पाहिलं. डोळ्यावर भयंकर झोप असतानाही, सगळं शरीर थकलं असतानाही राईड यशस्वीपणे पूर्ण केल्याचं जे समाधान आम्ही एकमेकांच्या चेहऱ्यावर पाहिलं ते कायम आठवणीत राहणारं होतं. ही राईड जिच्याशिवाय अशक्य होती त्या युनीकॉर्न वर शेवटची कौतुकाची थाप मारली आणि पुढच्या राईड साठी तयार राहा असं डोळ्यांनीच सांगत साउथ राईडची सांगता केली.





============|| समाप्त ||============

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी शंभरहून अधिक पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो. जगाच्या कानाकोपऱ्यात मराठी पोहोचावी आणि जगाच्या कानाकोपऱ्याचं वर्णन मराठीत असावं.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, किंवा मामाचा गाव आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा.

**esahity@gmail.com**